पुणे, बुधवार, १२ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 105 • वर्ष ४ थे, अंक १०५ • किंमत ₹ ६ • पाने : १२



राष्ट्रसंचार IMPACT

नगर रोडच्या 'बीआरटी' चा 'अस्त'..!

P३


# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



आयपीएलबद्दल विचार केला नव्हता

१२



छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानभवनात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# डी पी यु मेडिकलवर आयोगाचे ताशेरे

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगांतर्गत पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण मंडळाने (पीजीएमईबी) पुण्यातील नामांकित डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्रावर कडक शब्दांत ताशेरे ओढले असून, महाविद्यालयावर जे गंभीर आरोप झाले आहेत, त्यांचे ७ दिवसांत उत्तर मागवले आहे.




## आर्थिक अनियमितता, सुविधांच्या कमतरतेसह स्टायपेंड अडविल्याचे गंभीर आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यावेतन न देणे, संस्थेतील आर्थिक अनियमितता, पायाभूत सुविधांची कमतरता आणि अपुऱ्या सुविधांसह देण्यात येत असलेले वैद्यकीय प्रशिक्षण यावर पीजीएमईबीने लेखी उत्तर मागवले आहे. तसेच संस्थात्मक गैरव्यवहाराच्या गंभीर आरोपांवर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकारामुळे पुण्यातील वैद्यकीय शिक्षणातील गैरप्रकार उघडकीस आले असल्याचे मानले जाते.

पीजीएमईबीने ४ मार्च रोजी लिहिलेल्या पत्रात थकित शिष्यवृत्ती आणि मानसिक छळाच्या तक्रारींबाबत पूर्व सूचना (३० जानेवारी) देण्यात आली आहे, असे नमूद केले आहे. तक्रारदाराने कागदपत्रे मिळवल्याचे कारण देत महाविद्यालयाने हा दावा खोटा असल्याचे म्हटले होते. तथापि, विद्यावेतन देयकाचे ठोस पुरावे सादर करण्यात महाविद्यालय अपयशी ठरले. दरम्यान, अनेक विद्यार्थ्यांच्या तक्रारींमुळे चौकशीची व्याप्ती वाढली आहे. पीजीएमईबीने महाविद्यालय प्रशासनाला ७ दिवसांत कागदोपत्री पुराव्यासह कृती अहवाल (एटीआर) सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचे पालन न केल्यास पुढील नियामक कारवाई होऊ शकते.

आयुर्वेदिक, नर्सिंग, होमिओपॅथी आणि फिजिओथेरपी अशी अनेक महाविद्यालये डीवाय पाटील कडून चालवली जातात. तथापि, यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुरेशा सुविधा दिल्या गेल्या नाहीत. त्यामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

प्रति विद्यार्थी एक लाख रुपये इतके शुल्क आकारले जाते. त्यासह परीक्षा शुल्क, वसतिगृह शुल्क, जास्तीची शिकवणी यासाठी मनमानी पद्धतीने शुल्क उकळले जाते. यूजीसीकडे सादर केलेली शिष्यवृत्तीचे कागदपत्र बनावट असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवासी विद्यार्थ्यांना जबरदस्तीने पैसे देण्यास भाग पाडले, असाही आरोप आहे.

महाविद्यालयाच्या मनमानी कारभारामुळे निवासी डॉक्टर खासगी ओपीडीला प्राधान्य देत आहेत. महाविद्यालय प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचा फटका तेथील विद्यार्थ्यांना बसत असल्याचे मानले जाते. त्याचबरोबर, आयुष्मान भारत योजनेचा लाभ दिला जात नाही, रुग्णांना पुरेशा सोयी दिल्या जात नाहीत अशा पद्धतीने रुग्णांची सुरक्षितता आणि आरोग्यही धोक्यात आले असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. » पान ७ वर

### वैद्यकीय आयोगाचे ताशेरे :

- मनमानी शुल्क आकारणी
- शिष्यवृत्तीचे बनावट कागदपत्र
- विद्यार्थ्यांकडून जबरदस्तीने वसुली
- निवासी डॉक्टरांची खाजगी ओपीडी
- ढिसाळ कारभाराचा फटका
- आयुष्मान भारत योजनेचा लाभ अडवला
- विद्या वेतन दिले नाही

## पाकमध्ये पॅसेंजर हायजॅक; १२० ओलीस

**नवी दिल्ली : पाकिस्तानमध्ये मंगळवारी दहशतवाद्यांनी पॅसेंजर ट्रेन हायजॅक केली आहे. रिपोर्टनुसार, बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) पॅसेंजर ट्रेन हायजॅक केल्याचा दावा केला आहे. बलुच लिबरेशन आर्मीने एका निवेदनात म्हटले आहे की त्यांच्या सैनिकांनी जफर एक्स्प्रेस हायजॅक केली आहे आणि किमान १२० प्रवाशांना ओलीस ठेवले आहे. रिपोर्टनुसार, बीएलएने पाकिस्तानी** » पान ७ वर

# शिंदे यांच्या तीन योजना बंद

## फडणवीसांनी महत्त्वाकांक्षी योजना बंद करून दिला शह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या तीन महत्त्वाच्या योजना आता बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे समोर आले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने या योजनांसाठी निधी दिला नसल्याने त्या बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या योजनांमध्ये आनंदाचा शिधा, १० रुपयांची शिवभोजन थाळी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थाटन योजना यांचा समावेश आहे.

शिंदे सरकारच्या कार्यकाळात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या योजना जाहीर करण्यात आल्या होत्या. मात्र, निवडणूक जिंकल्यानंतर



महायुती सरकारने त्यांचा आढावा घेतला आणि राज्याच्या आर्थिक तिजोरीवर होणारा ताण पाहता त्या केवळ कागदावर राहणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. विशेषत: आनंदाचा शिधा योजना, जी दसरा, दिवाळी, गणेशोत्सव, गुढीपाडवा आणि शिवजयंती अशा प्रमुख सणांच्या वेळी लागू केली जात होती, तिला यंदा निधी मिळालेला नाही.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सुरू केलेली १० रुपयांची शिवभोजन थाळी योजना एकनाथ शिंदे सरकारने पुढे चालू ठेवली होती. मात्र, या योजनेसाठीही निधी मिळालेला नाही. त्यामुळे राज्यातील अनेक ठिकाणी शिवभोजन केंद्रे बंद पडण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तीर्थयात्रा योजना देखील बंद होण्याच्या मार्गावर आहे. अर्थसंकल्पात या योजनेसाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे ती बंद पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत आणि शेतक-यांसाठी मोफत वीज योजना या योजना मात्र सुरू राहणार आहेत. या योजनांना सरकारने आवश्यक निधी मंजूर केला आहे. त्यामुळे या सुविधा महिलांसाठी आणि शेतक-यांसाठी कायम राहणार आहेत.


### विरोधक आक्रमक

- शिंदे सरकारच्या योजनांना निधी मिळत नसल्याने राज्यात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यावरून महाविकास आघाडी आणि महायुती सरकार यांच्यात जोरदार टोकाचे आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

## परिवारामध्ये परत आल्याचा आनंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शिवसेनेचा नगरसेवक म्हणून मी १० वर्षे काम केले आहे. परिवारामध्ये पुन्हा काम करण्याची संधी मिळाली असून याचा आनंद आहे



असे काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर म्हणाले. भाजपच्या लोकांनी मला त्रास दिला असल्याचाही आरोप त्यांनी यावेळी केला. धंगेकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदेसेनेत प्रवेश केला .

दरम्यान, ११ मार्च रोजी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसोबत शिवसेना शिंदे गटात प्रवेश घेतला. या वेळी बोलताना, रवींद्र धंगेकर यांनी सांगितले की, कर्ज काढून गणेश पेठेतील जागा विकत घेतली होती. त्या व्यवहारात कोणतीही फसवणूक नव्हती. » पान ७ वर

# भोंग्यांवर कारवाई

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा स्पष्ट इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईसह महाराष्ट्रातील विविध भागातील प्रार्थना स्थळे, मशिदींवरील भोंग्यांमुळे ध्वनिप्रदूषण होत असल्याचा मुद्दा विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी उपस्थित केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने २५ जानेवारी २०२५ रोजी आदेश देऊन मशिदींसह प्रार्थना स्थळांकडून ध्वनिप्रदूषण प्रतिबंध नियमांचे उल्लंघन होणार नाही, असे आदेश दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही, हा मुद्दा भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारा मांडला. उत्तर प्रदेश सरकारने ज्याप्रकारे भोंग्यावर कारवाई केली आहे, त्याप्रमाणे राज्य सरकारही कारवाई करणार का? असा प्रश्न आमदार फरांदे यांनी विचारला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले.



"पोलिस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थना स्थळात जाऊन भोंग्याची परवानगी घेतली आहे की नाही? याची तपासणी केली पाहिजे. भोंग्याचे डेसिबल मोजून आवाजाची मर्यादा ओलांडली असेल तर पहिल्या टप्प्यात प्रदूषण नियंत्रक मंडळाला सांगणे आणि दुस-या टप्प्यात पुन्हा परवानग्या न देण्याचा मार्ग अवलंबला पाहिजे."
**— देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कुठल्याही प्रार्थनास्थळावर » पान ७ वर


### कडक कारवाईसाठी नियमात बदल करणार

- प्रचलित कायद्यानुसार पोलिसांकडे फारसे अधिकार नाहीत. कारण कारवाईचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळाला आहेत. त्यामुळे नियमांमध्येही काही प्रमाणात बदल करणे अपेक्षित आहे. हे बदल झाल्यास भोंग्यावर अधिक प्रभावी कारवाई करता येईल. यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून नियमांमध्ये बदल करण्यास सुचविले जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## माधव भंडारी विधानपरिषदेवर?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकांनंतर




रिक्त झालेल्या विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी 27 मार्च रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपने तीन उमेदवारांची यादी दिल्लीला पाठवली असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. यामध्ये दादाराव केचे, अमरनाथ राजूरकर आणि माधव भंडारी यांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे आपल्या आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर महायुतीमधील आमदारांच्या जागांवर कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपासह सध्या शिवसेनेत आणि » पान ७ वर



## गौरव आहुजासह मित्राचा पोलीसांनी उतरवला माज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पोलिसांनी गौरव अहुजा



आणि त्याचा मित्र भाग्येश ओस्वाल यांचा माज उतरवला आहे. सोमवारी पुणे पोलिसांनी दोघांनाही घटनास्थळी नेलं. ज्या ठिकाणी गौरव अहुजाने भररस्त्यात लघुशंका करत अश्लील कृत्य केलं होतं. त्याच ठिकाणी घेऊन जात पोलिसांनी दोघांची धिंड काढली. पोलिसांनी त्यांचा माज उतरवला आहे. याचा व्हिडीओ आता समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पुण्याच्या येरवडा परिसरातील शास्त्रीनगर इथं रस्त्यावर उभं राहून लघुशंका करणाऱ्या गौरव अहुजाचा पुणे पोलिसांनी माज » पान ७ वर

# औरंगजेबाची कबर काढून टाका : खा. लंके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेली औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. हिंदुत्ववादी संघटनांसह शिवप्रेमींनी याबाबत सातत्याने आवाज उठवला आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार निलेश लंके यांनीही ही मागणी केली आहे. 'औरंगजेब राष्ट्रपुरुष होता काय?'असा परखड सवाल उपस्थित करत, त्यामुळे त्याची कबर हटवण्यात यावी, असे त्यांनी ठामपणे म्हटले आहे.

दरम्यान, खासदार निलेश लंके यांनी स्पष्ट केले की, औरंगजेब हा समाजसेवक नव्हता, त्यामुळे कबरला कोणतेही सामाजिक स्वरूप देता



कामा नये. या विषयाला धार्मिक वळण न देता, थडगे हटवले जावे, असे ते म्हणाले. विशेष म्हणजे, भाजप-शिवसेनेच्या नेत्यांनी यापूर्वीच ही मागणी केली होती, मात्र आता राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदारानेही हेच मत मांडल्याने राजकीय वातावरण अधिक तापले आहे. राज्यात सत्ताबदल झाल्यापासून अहिल्यानगरमधील सुपा एमआयडीसी परिसरात व्यावसायिकांना त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप निलेश लंके यांनी केला आहे.

# इंडिया नको भारत म्हणा

## संघ सरचिटणीसांचे मोठे विधान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरचिटणीस दत्तात्रय होसबळे यांनी देशाच्या नावावरून एक विधान केले आहे. ते विधान सध्या सर्वत्र चर्चेचा विषय बनले आहे. 'विमर्श भारत का' या पुस्तकाच्या प्रकाशनादरम्यान दत्तात्रेय होसबळे यांनी देशाला भारत आणि इंडिया या दोन नावांनी हाक मारण्यावर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी यावेळी, आपल्या देशाला भारत म्हटले पाहिजे, इंडिया नाही, असे म्हटले आहे.

दत्तात्रेय होसबळे यांनी या कार्यक्रमात, जी-२० शिखर परिषदेदरम्यान राष्ट्रपतींच्या निवासस्थानी होणाऱ्या मेजवानीसाठी



पाठवलेल्या निमंत्रणात 'भारताचे प्रजासत्ताक' असे लिहिले होते. देशाला 'इंडिया' नाही तर 'भारत' म्हटले पाहिजे कारण इंग्रजीत ते 'इंडिया' आहे आणि भारतीयांसाठी ते 'भारत' आहे. जगात कुठेही हे घडू शकते का? असा सवाल यावेळी त्यांनी उपस्थित केला.

दत्तात्रय होसबळे यांनी यावेळी, भारतीय संविधान, भारतीय रिझर्व्ह बँक... या सर्वांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले पाहिजे. ते म्हणाले की भारताला भारतच राहू दिले पाहिजे, असे त्यांनी म्हटले. मुघल काळात देशाला खूप नुकसान सहन करावे लागले; संस्कृती, स्वाभिमान, » पान ७ वर

# उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी शासन 'अलर्ट मोड' वर

उन्हाळा

**विशेष कक्ष उभारणार; शासकीय रुग्णालयात आपत्कालीन कक्ष सुरु करणार**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने उष्माघाताच्या धोक्यात वाढ झाली आहे. राज्यात आतापर्यंत उष्माघाताच्या चार रुग्णांची नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित आपत्कालीन उपचारांसाठी विशेष कक्ष उभारण्यात आले आहेत.

राज्यात ८ मार्चपर्यंत उष्माघाताचे ४ रुग्ण आढळून आले असून, त्यात जालना जिल्ह्यात २, ठाणे १ आणि नांदेड १ अशी




रुग्णसंख्या आहे. उन्हाळ्यामुळे तापमान वाढल्याने आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. उष्णता जास्त वाढल्याने उष्माघातासह आरोग्यविषयक इतर समस्या निर्माण होत आहेत. यामुळे उष्णतेपासून आपले संरक्षण करण्याचे आवाहन आरोग्य विभागाने नागरिकांना केले आहे. आरोग्य विभागाने सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष उभारण्याची सूचना फेब्रुवारीमध्ये केली होती. त्यानुसार सर्व रुग्णालयांमध्ये आतापर्यंत हे कक्ष सुरू झाले आहेत, अशी माहिती आरोग्य विभागाच्या सहसंचालिका डॉ. बबिता कमलापूरकर यांनी दिली.

उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृद्ध नागरिक, गर्भवती, स्तनदा माता, शारीरिक श्रम करणाऱ्या व्यक्ती, सहव्याधीग्रस्त अशांना होतो. त्यामुळे त्यांनी उन्हाळ्यात विशेष काळजी घ्यावी. लहान मुले आणि वृद्धांना पुरेसे पाणी पिण्यास द्या. गर्भवतींनी उन्हात जाणे टाळावे आणि हलका आहार घ्यावा.

### उष्माघाताचा तडाखा

| वर्ष | एकूण रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|
| २०२३ | ३,१९१ | १४ |
| २०२४ | ३४७ | १ |
| २०२५ (८ मार्चपर्यंत) | ४ | ० |

उन्हात काम करणाऱ्यांनी अधूनमधून विश्रांती घ्यावी. जास्त घाम येत असेल तरी ओआरएस, साखर-मीठ पाणी किंवा ताक प्यावे. आजारी व्यक्तींना या काळात अधिक त्रास होण्याची शक्यता असल्याने काळजी घ्यावी आणि गरज भासल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आरोग्य सहायक संचालक डॉ. प्रेमचंद कांबळे यांनी सांगितले. » पान ७ वर

"सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरील साथरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांचे उष्माघात विषयक प्रशिक्षण घेण्यात आले आहे. त्यांच्या मार्फत आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही झाले आहे. सर्व आरोग्य संस्थांना उष्णतेशी संबंधित आपत्कालीन समस्यांवर उपचाराच्या सूचना देण्यात आल्या आहेत."
**— डॉ. मयूरेश सासवडे,** सल्लागार, वातावरणीय बदल

#रा



## संभाजी महाराजांच्या बलिदान दिनी रक्तदान शिबीर

**पुणे :** धर्मवीर संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या कार्यालयात रक्तदान शिबिर घेण्यात आले. आ. शंकर भाऊ जगताप मित्रमंडळाच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराच्या प्रारंभी संभाजीराजे यांच्या प्रतिमेचे उन्नती संस्थेचे संचालक डॉ. कुंदाताई भिसे आणि संजय भिसे यांच्याहस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या शारदा मुंडे आणि सखाराम ढाकणे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सर्व दानांमध्ये रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असून संभाजी राजेंच्या बलिदान दिनाच्या औचित्याने उन्नतीतर्फे आयोजित रक्तदान शिबिराच्या उपक्रमाचे कौतुक केले. चाकण ब्लड सेंटरच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिर प्रसंगी डॉ. देवांशु चौधरी, डॉ. आकाश बोचरे, सोनाली जाधव, डॉ. सुभाष पवार, रमेश वाणी, बाळकृष्ण चौधरी आदि उपस्थित होते.

## अर्थसंकल्प : तरुणांच्या भविष्यावर अन्याय -आबनावे

**पुणे :** या वर्षीच्या अर्थसंकल्पात शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि तरुणांसाठी कोणतीही ठोस तरतूद नाही.



शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती, स्टार्टअप्स आणि महिला सुरक्षेसारख्या मुद्द्यांकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे, अशी टीका प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणिस प्रथमेश आबनावे यांनी केली आहे.

'लाडकी बहीण' योजनेसाठी ३६,००० कोटींची तरतूद करण्यात आली असली, तरी ही गेल्या वर्षीच्या तुलनेत १०,००० कोटींनी कमी आहे. एवढी मोठी तरतूद करूनही प्रत्यक्षात किती लाभार्थ्यांना निधी मिळणार याबाबत सरकारने कोणतीही स्पष्टता दिलेली नाही, त्यामुळे ही योजना देखील निवडणूकपूर्व जाहिरातबाजी ठरण्याची शक्यता आहे, असा टोलाही आबनावे यांनी लगावला.



## पतित पावन संघटनेचे स्वारगेट जवळ आंदोलन

**पुणे :** सार्वजनिक ठिकाणी लघुशंका आणि लज्जास्पद वर्तन करणाऱ्या गौरव अहुजावर कठोर कारवाई करावी,या मागणीसाठी पतित पावन संघटनेने लक्ष्मी नारायण चौक (स्वारगेट) येथे आंदोलन केले.पतित पावन संघटनेने या प्रकारच्या असंस्कृत व अप्रिय वर्तणुकीला कडवा विरोध करून समाजातील मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात ठोस कारवाईची मागणी केली आहे.यावेळी पतित पावन संघटना पुणे जिल्हा अध्यक्ष दिनेश भिलारे, जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण झवर,शहर कार्याध्यक्ष धनंजय क्षीरसागर,रवींद्र भांडवलकर,सरचिटणीस ललित खंडाळे,उपाध्यक्ष प्रसाद वाईकर,खडकवासला विभाग प्रमुख विजय क्षीरसागर,कसबा विभाग प्रमुख योगेश वाडेकर,छत्रपती शिवाजीनगर विभाग अध्यक्ष कारकूड,कसबा विभाग संपर्क प्रमुख स्वप्नील आंग्रे,गणेश बिबवे,हेमंत शिरोळे, संकेत पोटे,संजय कुडकर,शिवराज निवदेकर,यश चव्हाण,भारत मिसाळ,योगेश शिर्के,मंगेश शेलार,हर्षद हरपूडे उपस्थित होते.

## गॅस जोड देण्याच्या आमिषाने तरुणाची फसवणूक




**पुणे :** नवीन गॅस जोड देण्याच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी एकाची चार लाख ४० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका तरुणाने आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

तक्रारदार तरुण कात्रज भागातील आंबेगाव परिसरात वास्तव्यास आहे. चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. गॅस कंपनीकडून नवीन गॅस जोड देण्यात येणार आहे. गॅस जोड नोंदणीसाठी वैयक्तिक माहिती द्यावी लागेल, असे आमिष दाखवून चोरट्यांनी त्याला जाळ्यात ओढले. चोरट्यांनी तक्रारदार तरुणाच्या बँक खात्याची गोपनीय माहिती घेतली. त्यानंतर बँक खात्यातून ऑनलाइन पद्धतीने चार लाख ४० हजार रुपये चोरट्यांनी चोरुन नेले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने तपास करत आहेत.

# घरफोड्या आणि दुचाकी चोरही...!




पुणे शनिवार पेठेतून दुचाकी चोरुन पसार झालेल्या चोरट्याला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून तीन दुचाकी, दोन दूरचित्रवाणी संच, मोबाइल, लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## शनिवार पेठेतून दुचाकी चोरणारा चोरटा जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** शनिवार पेठेतून दुचाकी चोरुन पसार झालेल्या चोरट्याला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून तीन दुचाकी, दोन दूरचित्रवाणी संच, मोबाइल, लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरट्याने विश्रामबाग, सिंहगड रस्ता पोलीस ठाणे, तसेच लोणावळा शहरात दुचाकी चोरी, तसेच घरफोडीचे गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले.

मयूर अनंत डेरे (वय ३५, रा. कसबा पेठ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. डेरे हा सराइत चोरटा असून, गेल्या वर्षी ३० नोव्हेंबर रोजी त्याने शनिवार पेठेतून एक दुचाकी चोरली होती. या गुन्ह्याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी मयूर भोसले, आशिष खरात, सातप्पा पाटील यांना डेरे याने दुचाकी चोरीचा गुन्हा केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला लोणावळा परिसरातून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने विश्रामबाग, सिंहगड रस्ता पोलीस ठाणे, तसेच लोणावळा शहरातून गुन्हे केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून तीन दुचाकी, दोन दूरचित्रवाणी संच, मोबाइल संच, लॅपटॉप असा दोन लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# पालिकाच घालतेय रोगांना 'खतपाणी'..!

## दीड महिन्यात अवघ्या ५२ टाक्यांचीच साफसफाई; बाधीत क्षेत्रात

शहर आणि परिसरात 'जीबीएस' च्या आजाराने थैमान घातले असतानाच महापालिका प्रशासनाचा गलथान कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे; अस्वच्छ पाण्यामुळे या रोगाचा फैलाव होत असल्याची दाहक वास्तव उजेडात आले आहे. मात्र; तरीही प्रशासनाने पाण्याच्या टाक्यांच्या साफसफाईबाबत अद्याप वेग घेतलेला नाही. गेल्या महिना ते दीड महिन्यांच्या कालावधीत १४४ पैकी अवघ्या ५२ टाक्यांची साफसफाई करण्यास प्रशासनाला यश आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे बाधीत क्षेत्रातील अवघ्या २४ टाक्यांची स्वच्छता करण्यात आली आहे, त्यातूनच महापालिका प्रशासनच या रोगाला 'खतपाणी' घालत असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.



❝ शहरातील 'ईएसआर' (उन्नत पाण्याच्या टाक्या) आणि '0जीबीएस बाधित क्षेत्रातील पाणी पुरवठा करणाऱ्या टाक्याच नाही तर संपुर्ण शहरातील पाण्यांच्या टाक्यांची स्वच्छता करण्यात येत आहे. त्यापैकी ५२ टाक्यांची स्वच्छता पुर्ण झाली आहे. तर बाधित क्षेत्रात ४४ पाण्याच्या टाक्या असुन, यापैकी २४ टाक्यांची स्वच्छता करण्याचे काम पुर्ण झाले आहे. पाण्यांच्या टाक्यांची स्वच्छता सुरु असल्याने नागरीकांना पाणी काळजीपुर्वक वापरावे लागणार आहे.

**-नंदकिशोर जगताप,** प्रमुख पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अशुद्ध पाण्यामुळे उदभवलेले जीबीएस आजाराचे संकट दुर करण्यासाठी प्रशासनाने शहरातील पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्यास सुरुवात केली आहे. तर जीबीएस बाधित क्षेत्रातील वीसहून अधिक टाक्या अद्याप अस्वच्छ आहेत. जानेवारी व फेब्रुवारी महीन्यात शहरात जीबीएस आजाराचे संकट निर्माण झाले. अद्याप हे संकट पुर्णपणे दुर झाले नाही. जीबीएस आजार हा अशुद्ध पाणी पुरवठ्यामुळे होत असल्याची माहीती पुढे आली आहे.

या पार्श्वभुमीवर महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने जानेवारी, फेब्रुवारी महीन्यात जीबीएस बाधित क्षेत्र असलेल्या सिंहगड रस्ता भागातील उपनगरातील पाणी पुरवठा यंत्रणेची माहीती घेतली. यंत्रणेतील त्रुटी दुर करण्याचा प्रयत्न केला गेला. टँकर द्वारे पाणी पुरवठा करणारे, तसेच आर ओ प्लांट मधून केला जाणारा पाणी पुरवठा यांच्याकरीता नियमावली तयार केली. त्याचवेळी महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्याचा निर्णय घेतला होता.

### अशी आहे उपाययोजना...!

- बाधित क्षेत्रात शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी चार क्लोरींन प्लांट उभे करणार
- नांदेड गाव येथील विहीर व बारंगणे मळा येथील विहीर येथे प्लांट बसविणार
- खडकवासला आणि धायरी येथील टँकर पॉईंट येथे क्लोरींन प्लांट बसविणार
- ९५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित
- वडगाव उड्डाणपुला खालील रॉ वॉटरच्या लाईनमधुन होणारा पाणी पुरवठा थांबविणार
- लाईनला शुद्ध पाणी पुरवठ्याची वाहीनी जोडणार

दरम्यान, शहराच्या उपनगरांत आर ओ प्लांट व्यावसायिकांकडून पाणी पुरवठा केला जात आहे. या आर ओ प्लांटमधून होणारा पाणी पुरवठाही शुद्ध नसल्याने त्यांच्याकरीता नियमावली केली होती. याभागातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काही आर ओ प्लांट पुन्हा सुरु करण्याची परवानगी दिली गेली होती. ते पुन्हा बंद केले गेले असुन, नव्याने बारा जणांनी अर्ज केले आहे. त्यापैकी चार जणांना आर ओ प्लांट सुरु करण्याची परवानगी दिली आहे. आठ जणांनी कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांचे अर्ज नामंजुर केले आहेत.

# पीएमपीएमएल ४६ नादुरुस्त बस मोडीत काढणार

## लिलावातून दीड कोटी रुपये उत्पन्नाचे उद्दिष्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) स्वमालकीच्या ४६ नादुरुस्त बस मोडीत काढण्याचा निर्णय घेतला आहे. या बसच्या सुट्या भागांची लिलावातून विक्री करण्यात येणार आहे. कारण स्वारगेट बस स्थानकात बसमध्ये तरुणीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी नादुरुस्त आणि आयुर्मान संपलेल्या बस १५ एप्रिलपर्यंत मोडीत काढण्याचे आदेश दिले आहेत.

पीएमपीच्या ताफ्यात ४६ जुन्या बस आहेत. या बस मोडीत काढण्याचा यापूर्वीच निर्णय घेण्यात आला होता. मात्र, बस मोडीत काढल्यानंतर सुट्या भागांच्या विक्रीत अपेक्षित रक्कम मिळत नसल्याने ही प्रक्रिया थांबविण्यात आली होती. त्यामुळे आता या बसच्या सुट्या भागांचा लिलाव केला जाणार आहे. त्यातून उत्पन्न मिळण्याचे पीएमपी प्रशासनाने नियोजन केले आहे.



नादुरुस्त आणि मोडकळीत पडलेल्या बसचे टायर, पत्रे, ट्यूब, लोखंड, वापरलेले वंगण आणि इतर सुट्या भागांना मागणी असते. लिलावाद्वारे विक्रीतून प्रत्येक बसच्या माध्यमातून अडीच ते तीन लाख रुपये मिळण्याचा अंदाज पीएमपी प्रशासनाने वर्तविला आहे. लिलावातून सुमारे दीड कोटी रुपये उत्पन्नाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे पीएमपीच्या अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

❝ पीएमपीच्या ताफ्यात स्वमालकीच्या १००४ बस आहेत. त्यापैकी ३२७ बसचे आयुर्मान येत्या वर्षभरात संपुष्टात येणार आहे. ४६ बस नादुरुस्त आहेत. या बस मोडीत काढण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. बसच्या सुट्या भागांची लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. त्यातून पीएमपीला आर्थिक उत्पन्न मिळेल. त्यामुळे स्थानकात बस उभ्या करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होईल.

— **नितीन नार्वेकर,** सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल

# संजीव सोशल फाउंडेशन तर्फे महिला पोलिसांचा सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संजीव सोशल फाउंडेशन च्या वतीने महिला पोलिसांचा सन्मान करण्यात आला. मराठी संस्कृतीचे प्रतीक असलेली नथ आणि सन्मानपत्र देऊन १४५ महिला पोलिसांना सन्मानित करुन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष छाया संजीव गदादे, कृष्णाजी कोकाटे, डॉ. आरती वाघोले, अश्विनी रासकर, वर्षा इनामदार, संग्राम कामठे, स्मिता लडकत, अपूर्वा लडकत, राजकुमार घुगे यावेळी उपस्थित होते. समर्थ पोलीस ठाणे, हडपसर पोलीस ठाणे, फुरसुंगी पोलीस ठाणे आणि उरुळी कांचन पोलीस ठाणे या ठिकाणी कार्यरत असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार आणि सन्मान करण्यात आला.

समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गीते, फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंगल मोढवे, हडपसर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय मोगले, उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी श्रीकांत कांचन, स्मिता गायकवाड, गजानन चव्हाण, दिपाली माटे, सोनल कोद्रे, पूजा सणस, सुरज साळुंखे, कल्पना बिडकर, पूजा मोरे, अभिषेक सागरे, जयश्री गदादे, सुभाष गदादे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.



पुणे संजीव सोशल फाउंडेशन च्या वतीने महिला पोलिसांचा सन्मान करण्यात आला. मराठी संस्कृतीचे प्रतीक असलेली नथ आणि सन्मानपत्र देऊन १४५ महिला पोलिसांना सन्मानित करुन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# कुसुमाग्रजांचे समाजावर मोठे ऋण : मधु मंगेश कर्णिक




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** साहित्य आणि संस्कृती याची व्याख्या करता येत नाही, तो अनुभवण्याचा विषय असतो. साहित्य म्हणजे दुसरे तिसरे काही नसून साहित्य म्हणजे सहत्व आहे. याच सहत्वाच्या भावनेने आम्ही तात्यांच्या म्हणजे कुसुमाग्रजांच्या जवळ आलो. कुसुमाग्रजांचे आमच्यावर ऋण आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी व्यक्त केले.

कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा कवितेचा वारसा पुढे नेणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांना काव्य क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल विदिशा विचार मंचतर्फे यंदाचा कविश्रेष्ठ कुसुमाग्रज स्मृती सन्मान ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रसिध्द लेखक आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कोहिनूर ग्रुपचे चेअरमन आणि कार्यकारी संचालक कृष्णकुमार गोयल आणि विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी आदी मान्यवर उपस्थित होते.रूपये पाच हजार आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मधु मंगेश कर्णिक म्हणाले की, सत्य, शिवम् आणि सुंदरमची अनुभूती साहित्यातून येते. कविता फक्त कवींनाच सुचते असे नसून शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यालाही सुचते. त्याला त्याच्या भावना केवळ शब्दात मांडता येत नाही. डॉ. ढेरे म्हणाल्या; भाषेचे सामर्थ्य आपण विसरत चाललो आहोत की काय अशी शंका येते. आयुष्याचे दुसरे नाव कविता असले असते तरी चालले असते असे वाटावे इतके छान दिवस कुसुमाग्रजांच्या समवेत घालवले आहेत. प्रत्यक्ष मनुष्याचे अवमूल्यन होत आहे आणि कृत्रिमता मग ती बुद्धिमत्तेची का होईना तिची प्रतिष्ठता वाढत चालली आहे.



❝ पुणे म्हणजे संस्कृतीचे माहेरघर असून पुण्यात साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यक्रम मोठ्या संख्येने आयोजित केले जातात. मला असं वाटतं की, पुण्याची ही परंपरा कायम राखण्यासाठी असे कार्यक्रम होणे आवश्यक आहे.

**— कृष्णकुमार गोयल,** चेअरमन आणि कार्यकारी संचालक, कोहिनूर ग्रुप



## महिला दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबीर

**पुणे :** निरोगी होमिओपॅथिक क्लिनिक च्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये जवळजवळ 100 हून महिलांच्या आरोग्याची मोफत तपासणी डॉ. अंकिता बाफना यांनी केली. याकरिता त्यांना घनश्याम बाफना आणि प्रफुल्ल बाफना यांचे बहुमोल सहकार्य लाभले.



## ज्येष्ठ नागरिकांसाठी कॅरम एकेरी स्पर्धा

**पुणे :** एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संघातर्फे दरवर्षी जी पी सहस्रबुद्धे चषक एकेरी कॅरम स्पर्धा घेण्यात येतात.

या वर्षीच्या हा कॅरम स्पर्धा २० मार्च ते २३ मार्च २५ ह्या कालावधीमध्ये एरंडवणे येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहामध्ये घेण्यात येणार आहेत.

स्पर्धेमध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील ६० वर्षांवरील सर्व स्त्री पुरुष ज्येष्ठ नागरिक भाग घेऊ शकतील.

प्रथम क्रमांक विजेत्यास रुपये तीन हजार व जी पी सहस्रबुद्धे चषक,द्वितीय क्रमांक विजेत्यास रुपये दोन हजार,तृतीय व चतुर्थ क्रमांक विजेत्यास रुपये एक हजार रुपये आणि क्रमांक पाच ते आठ खेळाडूंना रुपये पाचशे प्रत्येकी अशी पारितोषिके देण्यात येतील.

## कंटेनरची धडक, दुचाकीवरील सहप्रवासी ठार

**पुणे :** पुणे-सोलापूर रस्त्यावर मांजरी परिसरात भरधाव कंटेनरच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. सौरभ कैलास इंदलकर (वय २३, रा. कवडीपाट, लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) असे मृत्युमुखी पडलेल्या सहप्रवासी तरुणाचे नाव आहे. अपघातात दुचाकीस्वार सूरज कदम (वय १८, रा. कवडी पाट, लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) जखमी झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सूरज आणि सौरभ नातेवाईक आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार सूरज आणि त्याचा आतेभाऊ सौरभ हे सोमवारी (१० मार्च) मध्यरात्री एकच्या सुमारास पुणे-सोलापूर रस्त्याने निघाले होते. मांजरी परिसरातील शेवाळवाडी परिसरात भरधाव कंटेनरने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात सहप्रवासी सौरभ गंभीर जखमी झाला. दुचाकीस्वार सूरज याला दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.



## बंदिशींद्वारे भारतीय स्त्री शक्तीचा सन्मान

**पुणे :** सीतामातेवरील बंदिश कमलसी कोमल कमल नयनसी मिथिला किशोरी जनक नंदिनी, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई यांच्यावरील माई सांगिनी विनायकी ही बंदिश. राजमाता जिजाबाई यांच्यावरील बंदिश जय जय जिजाऊ...अशा विविध शास्त्रीय बंदिशींच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीमध्ये आजपर्यंत झालेल्या महान स्त्रियांमुळे संस्कृतीला मिळालेल्या भक्ती, शक्ती, शौर्य, मातृत्व, त्याग आदी विविध गुणांचे दर्शन गायिकांनी उलगडून दाखवले

भक्तिसुधा फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'ऊर्जा - सन्मान भारतीय स्त्री आदर्शांचा' या कार्यक्रमाचे आयोजन कोथरुडच्या बाल शिक्षण मंदिर येथे करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ गायिका निर्मला गोगटे, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, सुशील ओक, पं.सुहास व्यास, विदुषी माधुरी डोंगरे, विदुषी मंजिरी कर्वे-आलेगावकर, डॉ. शुभांगी बहुलीकर, अपर्णा केळकर, शेखर कुंभोजकर, पं. विकास पुरंदरे उपस्थित होते.


'शास्त्रीय बंदिशी द्वारा देवी सीतामाता, संत मुक्ताबाई, संत मीराबाई, राजमाता जिजाबाई, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी, यमुनाबाई सावरकर अशा महान व्यक्तिमत्वांच्या त्याग, तपस्या, भक्ती, शौर्य, मातृत्व, शक्ती अशा गुणांचा परिचय झाला. भारतमातेवरील विशेष बंदिश या कार्यक्रमात सादर करण्यात आली.

संगीतकार आशिष केसकर यांच्या मार्गदर्शनात या संपूर्ण कार्यक्रमाची मांडणी केली गेली. बंदिशींची रचना आणि सादरीकरण संगीतभूषण पं. राम मराठे यांच्या तिसऱ्या पिढीतील गायिका पल्लवी पोटे, मृणाल भिडे, प्राजक्ता मराठे व श्रुती विश्वकर्मा-मराठे यांनी केली. तबल्याची साथ सावनी तळवलकर व हार्मोनियमची साथ सुप्रिया जोशी यांनी केली. कीर्तनकार मानसी बडवे यांनी सूत्रसंचालन केले तर आदिती केसकर यांनी निवेदन केले.

# नगर रोडच्या 'बीआरटी' चा 'अस्त'..!

## मुळासकट उखडण्याचे शासनाचे आदेश; वाहनचालक टाकणार सुटकेचा निश्वास




मी आमदार नसतानाही या प्रश्नाकडे प्रशासनाचे सातत्याने लक्ष वेधले होते; त्यासाठी पाठपुरावा केल्यानेच राज्य शासनाला हा निर्णय घ्यावा लागला आहे. मात्र; आता राज्य शासनाच्या या आदेशाची महापालिका प्रशासनाने तातडीने पूर्तता करण्याची आवश्यकता असून त्यामुळे या भागातील वाहतूक कोंडीचा प्रश्नही सुटणार आहे.

.**-बापूसाहेब पठारे,** आमदार वडगावशेरी



हा मार्ग सार्वजनिक वाहतूकीसाठी निश्चितच वरदायी असाच होता, परंतु त्याचे नियोजन करण्यास प्रशासनाला सपशेल अपयश आले आहे. त्यातूनच ही गंभीर परिस्थिती उदभवली असून त्याला महापालिका प्रशासनच जबाबदार आहे, त्यांच्या नाकर्तेपणामुळेच कोट्यावधी रुपयांचा खर्च पाण्यात गेला आहे.

**-डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे मनपा



सर्वसामान्य नागरिकांच्या कररुपी रकमेतून हा मार्ग करण्यात आला होता. मात्र; महापालिका प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे कोट्यावधी रुपयांचा हा खर्च पाण्यात गेला आहे. त्यामुळे केवळ हा मार्ग हटवून प्रश्न सुटणार नाही तर हा खर्च प्रशासनाकडून वसूल करण्याची आवश्यकता आहे.

**-योगेश घोरपडे, देशमुख,** जिल्हा प्रमुख शिवसेना सहकार सेना



या मार्गात ' अडथळे' निर्माण करण्याचे पाप प्रशासनानेच केले आहे, विशेष म्हणजे या मार्गाची देखभाल आणि दुरुस्ती करण्यासाठी प्रशासनाने कधीही पुढाकार घेतला नाही, त्यामुळेच ही स्थानके म्हणजे तळीरामांचा अड्डाच बनला होता. हा मार्ग बंद होणार असल्याने येथील कायदा आणि सुव्यवस्था आता अबाधित राहण्यास मदत होणार आहे.

**-शिवप्रसाद जठार,** उपशहर प्रमुख, युवा सेना

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** नगर रस्त्यावरील नागरिक आणि वाहनचालकांना आतापर्यंत ' शापित' ठरलेल्या ' बीआरटी' मार्गाचा अखेर ' अस्त' होणार असून हा मार्ग मुळासकट कायमचा उखडण्यात येणार आहे. या मार्गावर आतापर्यंत घडलेल्या अपघातांची गंभीर दखल घेऊन त्यासंदर्भात तातडीने कारवाई करा, असे आदेश राज्य शासनाने महापालिका प्रशासनाला दिले आहेत. शासनाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे या भागातील नागरिक आणि वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि गतीमान व्हावी यासाठी या रस्त्यावर ' बीआरटी' मार्ग सुरु करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता, या मार्गाला या भागातील बहुतांशी नागरिक आणि सामाजिक संघटनांनी तीव्र विरोध केला होता. मात्र; हा विरोध डावलून हा मार्ग सुरु करण्यात आला होता. विशेष म्हणजे या मार्गाचे काम सुरु असतानाच अनेक छोटे मोठे अपघात घडले होते, त्यामुळे नागरिक आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेला अंदाज तंतोतंत खरा ठरला होता.


सार्वजनिक वाहतूक व्यवस्था गतीमान करण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला असला तरीही त्याचे योग्य नियोजन करण्यात प्रशासनाला अगदी पहिल्यापासूनच अपयश आले होते, त्यातही या मार्गात केवळ सार्वजनिक वाहतूक आणि आपत्कालीन वाहनांना परवानगी असतानाही त्यामध्ये खासगी वाहनांची मोठ्या प्रमाणावर घुसखोरी होत होती. त्यामुळे अपघातात वाढ झाली होती, त्यातूनच अनेकांना त्यांचे जीव गमवावे लागले होते तर अनेकांना कायमचे अपगंत्त्व आले आहे.

यासंदर्भात दैनिक ' राष्ट्रसंचार' नेही या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवित त्याकडे प्रशासन आणि राज्य शासनाचे लक्ष वेधले होते. वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी निवडून आल्यापासून विधानसभेत सातत्याने आवाज उठविला होता, सध्या सुरु असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही त्यांनी यासंदर्भात शासनाचे लक्ष वेधले होते. त्याची दखल घेऊन हा मार्ग तातडीने काढून टाकण्याच्या सूचना राज्य शासनाने महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत.

# 'रोधक' दूर; 'गती' वाढणार..!

### बालभारती- पौड रस्त्याबाबत प्रशासनाची सावध भूमिका; पुन्हा मिळविणार सर्व परवानग्या

शहरातील दक्षिण भागातील वाहतूकीची कोंडी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता पावले उचलण्यास सुरुवात केली आहे, तरीही यासंदर्भात पूर्वी आलेल्या अनुभवामुळे प्रशासनाने आता सावध भूमिका घेतली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयानंतरही प्रशासनाने बालभारती ते पौड फाटा या रस्त्याचे काम निर्विघ्नपणे व्हावे यासाठी सर्व सोपस्कार पूर्ण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आयत्यावेळी गोंधळ नको म्हणून सर्व विभागाच्या परवानग्या पुन्हा घेण्यात येत असून कायदेशीर तज्ज्ञांचा सल्लाही घेण्यात येणार आहे, त्यामुळे या रस्त्याचा ' रोधक' बंद होणार असून ' गती' वाढण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.



बालभारती ते पौड फाटा रस्त्यासाठी पर्यावरण विभागाकडून महापालिकेला या पूर्वीच 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) देण्यात आले आहे. न्यायालयाच्या सूचनेनुसार पुन्हा वन विभागाची परवानगी महापालिकेकडून घेतली जाणार आहे. याबाबतचा प्रस्ताव पाठविला जाणार आहे.

**-अनिरुद्ध पावसकर,** पथ विभाग प्रमुख, पुणे महापालिका



■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** विधी महाविद्यालय, प्रभात रस्ता तसेच कर्वे रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाचा असलेला बालभारती ते पौड फाटा रस्ता तातडीने तयार व्हावा, यासाठी महापालिका प्रशासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. न्यायालयाच्या सूचनेनुसार या रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी वन विभागाची मान्यता घेण्याची भूमिका महापालिकेने घेतली आहे. यासाठी वन खात्याला पत्र दिले जाणार आहे.

सेनापती बापट रस्त्यांसह इतर महत्त्वाच्या रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी बालभारती ते पौड फाटा हा रस्ता प्रस्तावित आहे. हा रस्ता वेताळ टेकडीवरून जातो. या रस्त्याच्या कामाला पर्यावरणप्रेमींनी विरोध केला होता. त्यामुळे या रस्त्याचे काम दीड वर्षापेक्षा अधिक वर्षापासून बंद ठेवण्यात आले आहे. या कामाच्या विरोधात नागरी चेतना मंचाने उच्च न्यायलयात याचिका दाखल केली होती.

न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. त्यामुळे रस्ता करण्याचा महापालिकेचा मार्ग मोकळा झाला आहे. हा रस्ता करताना महापालिकेने आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी, असे न्यायालयाने निकालात म्हटले आहे. त्यामुळे संपूर्ण अभ्यास करून हा रस्ता तयार करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.

हा रस्ता करताना महापालिकेला आवश्यक वाटल्यास पर्यावरण विभागाची आणि वन विभागाची परवानगी घ्यावी, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. त्यानुसार महापालिकेने तज्ज्ञ सल्लागारांशी चर्चा केली. त्यामध्ये महापालिकेला पर्यावरण विभागाकडे पुन्हा परवानगीसाठी अर्ज करण्याची गरज नाही, असा अभिप्राय देण्यात आला आहे. वन विभागाकडून यापूर्वी परवानगी घेतली आहे, तरीही महापालिकेने याबाबत पुन्हा एकदा वन विभागाची परवानगी घ्यावी, असे सल्लागारांनी सांगितले आहे.

**अशी घेणार दक्षता...!**

- बालभारती ते पौड फाटा रस्ता तयार करण्यासाठी २५२ कोटी रुपये खर्च
- प्रकरण न्यायालयात असल्याने यापूर्वी केवळ तीन कोटींची तरतूद
- वर्गीकरणाद्वारे निधी उपलब्ध करुन देणार
- महापालिकेने तज्ज्ञ सल्लागारांशी चर्चा केली
- परवानगीसाठी वन विभागाशी पुन्हा पत्रव्यवहार

## बारमध्ये दोन तरुणींना टोळक्यांकडून मारहाण

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पुण्यातील एका बारमध्ये दोन तरुणींना टोळक्यानं मारहाण केली आहे. पीडित तरुणी सोमवारी मध्यरात्री पबमधून बाहेर पडल्या होत्या. त्या घरी जाण्यासाठी पार्किंगच्या दिशेनं गेल्या. यावेळी त्याठिकाणी दोन तरुण आले. त्यांनी एका तरुणीला तू इथं काय करतेय, म्हणत तिचा हात पिरगळा तसेच तिच्यावर बळजबरी करत तिला कारमध्ये बसवण्याचा प्रयत्न केला.

यावेळी पीडित तरुणीसोबत असलेल्या दुसऱ्या तरुणीने मध्यस्थी करत आपल्या मैत्रिणीला वाचवण्याचा प्रयत्न केला. यावेळी एका आरोपीनं दुसऱ्या तरुणीला अश्लील स्पर्श करत तिचा विनयभंग केला. हा सगळा प्रकार पुण्यातील डी मोरा पबच्या पार्किंग एरियामध्ये घडला आहे. या सगळ्या प्रकारानंतर पीडित तरुणींनी बंडगार्डन पोलीस ठाणे गाठत नराधम आरोपींविरोधात फिर्याद दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडित तरुणी एकमेकांना आधीपासून ओळखतात. दोघांमध्ये जुना वाद आहे. याच वादातून पीडित तरुणीने आरोपी विरोधात वेगळ्या प्रकरणात एक गुन्हा दाखल केला आहे. हाच गुन्हा मागे घेण्यासाठी आरोपीने सोमवारी रात्री पीडितेला दमदाटी करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## 'एचएसआरपी' केंद्र अचानक बंद

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** राज्यात एक एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (हाय सिक्युरीटी नंबर प्लेट -एचएसआरपी) बसवून घेणे बंधनकारक केले आहे. वाहनधारकांनी ३१ मार्चपूर्वी 'एचएसआरपी' न लावल्यास एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. ही पाटी बसवण्याची शेवटची तारीख जवळ आल्यामुळे नागरिकांनी घाई केली आहे. मात्र पाटी बनविणारी कंपनी आणि केंद्रातील गोंधळ कमी होत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे (आरटीओ) त्यावर नियंत्रण नसल्यामुळे वाहनचालक संतप्त झाले आहेत.

## छत्रपती संभाजी महाराजांना रक्तदानातून मानवंदना

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** शिवजयंती महोत्सव समिती, पुणे तर्फे स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३३६ व्या बलिदान दिनी रक्तदानातून मानवंदना देण्यात आली. मानवंदनेचे हे सलग १२ वे वर्ष आहे. यावेळी जिजाऊ माँसाहेब शहाजी महाराज शिवज्योत रथाच्या नेतृत्वाखाली शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळ्यात सहभागी होणाऱ्या तब्बल १०० स्वराज्यघराण्यांच्या वंशजांनी, ढोलताशा पथकांनी, क्रिडा संघटनांनी, गणेशोत्सव मंडळांनी रक्तदान मानवंदनेत सहभाग नोंदवला.

मानवंदनेची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आला. यावेळी रक्तदान मानवंदनेचे संकल्पक समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, सचिन पायगुडे, रवींद्र कंक, शंकर कडू, मंगेश शिळीमकर, प्रवीणभय्या गायकवाड, रिंकल अमित गायकवाड तसेच स्वराज्यघराण्यांचे प्रतिनीधी उपस्थित होते.

रक्तदान मानवंदनेची सुरुवात ईशान अमित गायकवाड, सचिन पायगुडे, महेंद्र भोईटे, अविनाश कडू, राजेश जोगदंड, सुनील जोगदंड, दादा भोसले, मंदार मते, बाजीराव निगडे, ऋषीकेश पासलकर यांनी रक्तदान करुन केली. यावेळी रक्तदात्यांचा संकल्प पुर्ण झाला.




**पुणे** शिवजयंती महोत्सव समिती, पुणे तर्फे छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३३६ व्या बलिदान दिना निमीत्त रक्तदान मानवंदनेतून शुभारंभ लॉन्स, म्हात्रे पूल डीपीरोड येथे मानवंदना देण्यात आली.

# कामात सुधारणा करा अन्यथा कठोर कारवाई : जिल्हाधिकारी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** महसूल विभागाच्या नोंदणीकृत आणि अनोंदणीकृत तक्रारींचा निपटारा करण्याचा पुणे जिल्ह्याचा कालावधी मोठा असून राज्यात जिल्ह्याचा क्रमांक खालून तिसरा आहे. ही बाब महसूल विभागासाठी भूषणावह नाही. मंडल अधिकाऱ्यांना नोटिसा काढायला २-३ महिन्यांचा, तर त्या नोटिसा बजावण्यास ६-६ महिन्यांचा कालावधी लागतो. ही बाब भूषणावह नव्हे तर खेदजनक आहे; या कामात सुधारणा करा अन्यथा कारवाईला सामोरे जा, असा सज्जड दम जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने नुकतीच आयोजित महसूल परिषदेमध्ये बोलत होते. या वेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अप्पर जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी जिल्हाधिकारी ज्योती कदम, उपजिल्हाधिकारी सिद्धार्थ भंडारी, कल्याण पांढरे आदी उपस्थित होते.

नामदेव टिळेकर यांनी ई-फेरफार, ई-हक्क, ई-चावडी आदी विषयांवर सादरीकरण करत, तक्रारींच्या कालावधीबाबत कर्मचारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. टिळेकर म्हणाले, की वादाच्या निपटाऱ्याचा कालावधी २१ दिवसांचा आणि तडजोड प्रकरणांचा कालावधी ९० दिवसांचा आहे. मात्र पुणे जिल्ह्यातील नोंदी जारी करण्याचा कालावधी हा ४७ दिवसांचा आहे. तर नंदुरबारचा १९ दिवसांचा आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत पुणे जिल्ह्याचा क्रमांक खालून तीन नंबर आहे. ही बाब गंभीर आहे. तर तो पुणे जिल्ह्याचा सरासरी १८४ दिवसांचा आहे. राज्याचा हा कालावधी सरासरी १३८ दिवसांचा असून, यामध्ये भंडारा जिल्हा क्रमांक एकवर असून त्यांचा कालावधी ५४ दिवसांचा आहे, असेही त्यांनी सांगितले.

सुहास मापारी म्हणाले, की 'कजाप'च्या (कमी-जास्त पत्र) कारभारात समन्वयाचा अभाव आहे. यामुळे शासनाच्या फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. याची ४ हजार प्रकरणे आहेत. त्याचा निपटारा जलद गतीने होणे गरजेचे आहे.

कल्याण पांढरे म्हणाले, की भूसंपादनाच्या फेरफार नोंदी जलद गतीने करणे गरजेचे आहे. यासाठी भूसंपादन, अभिलेख आणि मंडल अधिकारी यांच्यात समन्वय हवा. एकदा जमीन भूसंपादन झाल्यावर त्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर संबंधितशासकीय विभागाचे नाव कब्जेदार म्हणून तातडीने लागणे गरजेचे आहे.

कार्यशाळेला मुद्रांक जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, प्रांताधिकारी अधीक्षक भूमी अभिलेख, सहायक अधीक्षक भूमी अभिलेख तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी,सेतू चालक व संबंधित कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक निवासी जिल्हाधिकारी यांनी केले.



महसूल यंत्रणेत काम करताना पारदर्शकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या पाठीशी मी उभा आहे. मात्र, काम करताना चुकीचे काम कराल आणि कामात दिरंगाई कराल तर तुमच्याविरोधातच नक्कीच कारवाई केली जाईल. जिल्ह्यात बेकायदा सुरू असलेल्या खाणींमधून क्रशर, तसेच अवैध उपसाचे काम तातडीने बंद करा.

**— जितेंद्र डुडी,** जिल्हाधिकारी, पुणे

## दशभुजा गणपतीनजीक भीषण अपघात




**पुणे :** पुण्यात भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत वृद्ध व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. पुण्यातील भयानक घटना सीसीटिव्ही मध्ये कैद झाली. भरधाव वेगात आलेल्या दुचाकीने वृद्ध व्यक्तीला जोरदार धडक दिली. पुण्यातील दशभुजा गणपती मंदिराजवळील ही घटना घडली. परशुराम वैश्यंपायम (82) असे अपघातात जखमी झालेल्या वृद्ध व्यक्तीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परशुराम वैश्यंपायम हे संध्याकाळी सहकारनगर भागात असलेल्या दशभुजा गणपतीजवळ थांबले होते. त्या ठिकाणाहून भरधाव वेगात आलेल्या एका दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली.

अपघातात जखमी झालेल्या वयोवृद्ध व्यक्तीला एका खाजगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दुसऱ्या बाजूला, अपघातात दुचाकीस्वार आणि पाठीमागे बसलेल्या हे दोघे जखमी असून त्या दोघांना सुद्धा रुग्णालयात दाखल केले आहे. ही संपूर्ण घटना सीसीटिव्हीमध्ये कैद झाली आहे. संध्याकाळी उशिरापर्यंत पर्वती पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

## मुलींनी आवड जोपासून त्यात करिअर करावे



**पुणे :** महाविद्यालयीन शिक्षण केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, यामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो. मुली विविध कलांमध्ये अव्वल असतात पण नंतर जबाबदाऱ्यांमुळे त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांनी आवड जोपासून त्यात करिअर घडवावे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च च्या वतीने युवा महोत्सवाचे आयोजन संस्थेच्या अरण्येश्वर कॅम्पस मध्ये करण्यात आले होते. यावेळी आंबेगाव पोलिस स्टेशनच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वाती देवधर, संस्थेचे मानद सचिव अण्णा थोरात, सहसचिव विकास गोगावले, खजिनदार जगदीश जेधे, नियामक मंडळ अध्यक्ष सत्येंद्र कांचन, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष डॉ. सुनील जगताप, सभासद संताजी जेधे, रघुनंदन जाधव, गंगाधरराव घारे व कमल व्यवहारे, प्रभारी संचालक डॉ. प्राजक्ता वराळे उपस्थित होते. डॉ. सुनील जगताप, सत्येंद्र कांचन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

## पुरातन मंदिराचे जतन हे महत्त्वाचे कार्य



**पुणे :** केवळ आर्थिक प्राप्तीसाठी नवनवी मंदिरे उभारण्यापेक्षा मोठी परंपरा असलेल्या जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार करून त्यांची देखभाल आणि व्यवस्थापन करणे, हे मोठे कार्य असल्याचे प्रतिपादन मन्मथधाम संस्थान, कपिलधार येथील सद्गुरु डॉ विरुपाक्ष शिवाचार्य यांनी केले. डॉ. शिवाचार्य यांच्या समवेत सतसमाज सत्मार्गी आखाड्याचे आंतरराष्ट्रीय महामंडलेश्वर श्री श्री १००८ रामनगिरी गुरु मौनगिरी जी महाराज, श्री क्षेत्र मुखेड येथील ष ब्र १०८ विरूपाक्ष शिवाचार्य व महंत १०८ श्री जनेश्वरानंद गिरीजी महाराज या विभूतींच्या हस्ते राजा केळकर संग्रहालयासमोर असलेल्या उमामहेश्वर मंदिराच्या कलशारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला.

## चित्रकलेतून दिव्यांगांनी दाखविली ‘कला’...!



पुणे — उत्स्फूर्त प्रतिसाद : दिव्यांग मुलांच्या कलेला वाव देण्यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत दिव्यांग आणि इतर विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. दिव्यांग मुलांसाठी आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## दिव्यांगांच्या चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिव्यांग मुलांच्या कलेला वाव देण्यासाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत दिव्यांग आणि इतर विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. दिव्यांग मुलांसाठी आयोजित आंतरशालेय चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 350 हून अधिक विद्यार्थ्यांनी या चित्रकला स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. तर 1500 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग नोंदवला. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग येथे या भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतून प्रत्येक गटातील सर्वोत्तम पाच बालचित्रकारांच्या चित्रांची निवड करण्यात आली. तिन्ही गटांतील पंधरा सर्वोत्कृष्ट बालचित्रकारांना पारितोषिक वितरण कार्यक्रमात पंधराशे रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी डिकाईचे संस्थापक ध्यानमूर्ती रघुनाथ येमुल गुरुजी, बिव्हिजी ग्रुपचे संचालक हनुमंत गायकवाड, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक दिलीप कोटीभास्कर, सक्षम पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे अध्यक्ष ॲड. मुरलीधर कचरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# अशैक्षणिक कामांचे ओझे होणार कमी

### राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय; शैक्षणिक वर्षांपासून अंमलबजावणी

शासकीय शाळांमधील शिक्षकांना शिक्षणाच्या व्यतिरिक्त अन्य कामे लावण्यात आली होती, त्याचा मोठा ताण या शिक्षकांवर येत होता. विशेष म्हणजे या कामांमुळे शिक्षकांची शाळेतील उपस्थिती नगण्य असल्याने त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत होता, त्यातूनच अनेक पालकांनी जिल्हा परिषद अथवा महापालिकांच्या शाळांमध्ये आपल्या पाल्यांना टाकणे बंद केले होते. त्यातूनच विद्यार्थ्यांची पटसंख्याही घटली होती, आता शिक्षकांची ही अतिरिक्त कामे बंद केल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत, तरीही शासनाच्या या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे.

> विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळण्यासाठी शिक्षकही आनंदी राहिले पाहिजेत. त्यामुळे शिक्षकांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न आहे, राज्यातील अनेक शिक्षक समर्पित भावनेने काम करतात. सरकार त्यांच्या पाठीशी उभे आहे.
>
> **-दादा भुसे,** शालेय शिक्षणमंत्री



**असा होणार फायदा...!**

- विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत होणार वाढ
- शिक्षकांना शाळेवर लक्ष केंद्रित करणे शक्य होणार
- शिक्षक करणार समर्पित भावनेने काम
- विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेली अनेक वर्षे अशैक्षणिक कामे कमी करण्याची मागणी शिक्षकांकडून करण्यात येत आहे. 'आम्हाला शिकवू द्या,' अशी मोहीम सुरू करण्याची वेळ, अशैक्षणिक कामांमुळे त्रस्त झालेल्या शिक्षकांवर मध्यंतरी आली होती. त्यामुळे राज्यभरातील शाळांतील शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचे ओझे कमी करण्यात येणार आहे. त्यासाठीचे प्रारूप तयार करण्यात आले असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. तसेच वर्षाच्या सुरुवातीलाच शिक्षकांना शैक्षणिक वेळापत्रक दिले जाणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.

या सर्व पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या कामांचे शैक्षणिक आणि अशैक्षणिक असे वर्गीकरण करण्यात आले. तसेच निवडणूक, जनगणना अशी काही अशैक्षणिक कामे शिक्षकांना करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने नुकतेच वार्षिक परीक्षा आणि संकलित चाचणी-२चे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार यंदा एप्रिलअखेरपर्यंत परीक्षा चालणार आहेत. शाळांचा लांबत चाललेला कालावधी आणि त्यात अशैक्षणिक कामांची भर, यामुळे शिक्षकांवर आणखी भार येईल, अशी शक्यता आहे. या अनुषंगाने शालेय शिक्षणमंत्र्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी अशैक्षणिक कामे कमी करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

'विद्यार्थ्यांची गुणवत्तावाढ हे मुख्य उद्दिष्ट आहे. शिक्षकांना अध्यापनासाठी वेळ मिळणेही गरजेचे आहे. त्या दृष्टीने शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या कामांतील ३० ते ५० टक्के कामे कमी करण्यात येणार आहेत. त्यासाठीचे प्रारूपही तयार करण्यात आले आहे. निवडणुकीसारखी काही कामे शिक्षकांना करावी लागतील. मात्र, बराचसा ताण कमी होणार आहे. शिक्षकांनी अधिकाअधिक वेळ अध्यापन करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. या प्रारूपाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षात केली जाणार आहे. शाळांना वर्षाच्या सुरुवातीलाच शैक्षणिक वेळापत्रकही देण्यात येणार आहे,' असे भुसे यांनी सांगितले.

## नवीन अतिरिक्त आयुक्तांकडे १८ विभागांची जबाबदारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या अतिरिक्तपदी नियुक्ती करण्यात आलेले एम. जे. प्रदीप चंद्रन यांच्याकडे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अतिरिक्त आयुक्त (जनरल) पदाचा कार्यभार दिला आहे. त्यांच्याकडे १८ विभागांची जबाबदारी असणार आहे. यामध्ये मुख्य लेखा व वित्त विभाग, पाणीपुरवठा प्रकल्प, अतिक्रमण, शिक्षण, सामान्य प्रशासन या विभागांचा समावेश आहे.

पुणे महापालिकेच्या दोन अतिरिक्त आयुक्तांची पदे गेले ११ महिन्यांपासून रिक्त होती. त्यातील एका पदावर राज्य सरकारने प्रदीप चंद्रन यांची नियुक्ती केल्याचा आदेश चार दिवसांपूर्वी काढला. सोमवारी महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी चंद्रन यांच्याकडे अतिरिक्त आयुक्त (जनरल) या पदाची जबाबदारी दिली आहे. महापालिकेत येण्यापूर्वी चंद्रन हे मुंबईतील उद्योग संचालनालयाचे अतिरिक्त विकास आयुक्त (उद्योग) या पदावर कार्यरत होते. भंडारा जिल्हाधिकारी म्हणूनदेखील त्यांनी काम केलेले आहे. तसेच राज्य सरकारच्या विविध विभागांतील कामाचा त्यांना अनुभव आहे.

मागील वर्षी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील तसेच पोलीस सेवेतील वरिष्ठ



अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. राज्य सरकारने याबाबतचे आदेश काढले होते. त्यावेळी पुणे महापालिकेच्या आयुक्तांसह दोन अतिरिक्त आयुक्तांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. यापैकी आयुक्त म्हणून डॉ राजेंद्र भोसले यांची तर अतिरिक्त आयुक्त म्हणून पृथ्वीराज बी.पी यांची नियुक्ती राज्य सरकारने केली होती. मात्र दोन अतिरिक्त आयुक्तांच्या जागांवर कोणत्याही अधिकाऱ्याची बदली झाली नव्हती. विधानसभा निवडणुकी नंतरही या जागा रिक्त होत्या.

या रिक्त असलेल्या एका जागेवर शासनाने प्रदीप चंद्रन यांना संधी दिली आहे. पश्चिम महाराष्ट्रात झालेली ही त्यांची पहिलीच नियुक्ती आहे. महापालिका आयुक्तांनी त्यांना खात्यांची जबाबदारी दिली असून, त्यानुसार महापालिकेचे काम सध्या समजावून घेत असल्याचे प्रदीप चंद्रन यांनी सांगितले. त्यांच्याकडे महापालिकेच्या १८ विभागांची जबाबदारी देण्यात आली असून, यामध्ये लेखापरीक्षण, आरोग्य, शिक्षण विभाग, अग्निशामक दल, तांत्रिक विभाग, उपायुक्त विशेष यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

## महासमाधानी राष्ट्र निर्माण होण्याची गरज: भानूप्रताप बर्गे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जे काम आपण करतो ते मनापासून करा. जी जबाबदारी आपल्याला दिली आहे, ती यथायोग्य पार पडायला हवी. तर महान राष्ट्र निर्माण होण्यासोबतच महासमाधानी राष्ट्र देखील निर्माण होईल. काम करुन समाधान मिळवणे यासारखे दुसरे कोणतेही कर्तव्य नाही. महासमाधानी राष्ट्र निर्माण होण्याची आज गरज आहे, असे मत माजी सहाय्यक पोलीस आयुक्त भानूप्रताप बर्गे यांनी व्यक्त केले.

अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टच्या वतीने माणिकचंद उद्योग समूहाचे चेअरमन प्रकाशशेठ धारीवाल यांच्या जन्मदिनानिमित्त सदाशिव पेठेतील गोपाळ हायस्कूल मधील गरजू विद्यार्थ्यांना ५१ हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी नृत्यांगना वैष्णवी पाटील, कसबा गणपतीच्या दीपा तावरे, तांबडी जोगेश्वरी मंडळाचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, गुरुजी तालीमचे प्रवीण परदेशी, तुळशीबाग गणपती मंडळाचे विकास पवार, केसरीवाडा गणपतीचे शैलेश टिळक, भाऊ रंगारी गणपतीचे संदीप जावळे, विष्णू आप्पा हरिहर, दगडूशेठ गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, अक्षय गोडसे, सतीश देसाई, गोपाळ हायस्कूलचे प्रभारी मुख्याध्यापक विजय पाटील, निलेश भिंताडे, ट्रस्टचे



विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, उपाध्यक्ष निवृत्ती जाधव उपस्थित होते.

निवृत्ती जाधव म्हणाले, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणी येतात. अनेकांना शैक्षणिक साहित्य देखील मिळत नाही. शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क आहे, आणि कोणत्याही अडचणीमुळे त्याला अडथळा ठरु नये, यासाठी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.


शैक्षणिक साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करुन विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच २५० विद्यार्थी व पालकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन देखील करण्यात आले होते.

कार्यक्रमात भारतीय खोखो संघाचे कर्णधार प्रतीक वायकर, सुयश गरगटे, आदित्य गणपुले, प्रशिक्षक शिरीन गोडबोले, प्राची वाईकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

# संत तुकोबांच्या जगातील सर्वात मोठ्या पगडीची विश्वविक्रमात नोंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संत तुकाराम महाराज बीजच्या निमित्ताने जगातील सर्वात मोठ्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पगडीचा लोकार्पण सोहळा जगद्गुरु संत तुकाराम महाराज मुख्य मंदिर, श्रीक्षेत्र देहू या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी संत तुकाराम महाराज देवस्थान ट्रस्ट - श्रीक्षेत्र देहूचे अध्यक्ष ह.भ.प. पुरुषोत्तम मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिलीप सोनिगरा ज्वेलर्स यांना वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस फाऊंडेशनचे सी.ई.ओ पवनकुमार सोलंकी यांनी विश्वविक्रम केल्याचे



प्रमाणपत्र दिले. या प्रसंगी दिलीप सोनिगरा ज्वेलर्सचा संपूर्ण परिवार तसेच मुकुंदनाना राऊत (महाराज), शंकर मराठे(महाराज), रविंद्र ढोरे (महाराज), नितिन काकडे (महाराज) उपस्थित होते. त्याच बरोबर आध्यात्मिक, राजकीय व सामाजिक



**आजि सोनियाचा दिनु । वर्षे अमृताचा घनु – विश्वस्त**


- संतश्रेष्ठ तुकोबाराय यांच्या देहू नगरीत आजचा सोन्याचा दिवस असून नभातून अमृता वर्षाव होत आहे. अशा भावना संत तुकाराम महाराज देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांनी व्यक्त केल्या. "तुका आकाशा" एवढा तेवढीच त्यांना शोभेल अशी पगडी दिलीप सोनिगरा ज्वेलर्स यांनी भेट दिली आहे. अशी ही अनमोल भेट संपूर्ण वारकरी संप्रदाय कायमस्वरूपी लक्षात ठेवेल.

क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली होती.

दिलीप सोनिगरा म्हणाले की जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पावन झालेल्या नगरीमध्ये आम्ही वास्तव करत असून याच परिसरात आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून व्यवसायात स्थिर झालो आहे. तुकाराम महाराजांवर आमची नितांत श्रद्धा, प्रेम आणि स्नेह आहे. याच सदभावनेतून आम्ही जगातील सर्वात मोठी पगडी तयार केली असून वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस बुकमध्ये हिची नोंद झाली. सदरील पगडीचा घेराव हा २२ फुटांचा असून पगडीची उंची ४ फूट आहे. तर पगडीला ५०० मीटर लांबीचा कपडा लागला आहे.

मोरे म्हणाले की जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची दिलीप सोनिगरा यांनी दिलेली पगडी रुपी भेट अनमोल आहे. तुकाराम महाराज यांचे कार्य जगभरात असून जगातील सर्वात मोठी पगडी तुकाराम महाराज मुख्य मंदिर, श्रीक्षेत्र देहू येथे विराजमान झाली. सदरील पगडी ही प्रसिद्ध कारागीर शैलेश यादव यांनी तयार केली असून ही बनवण्यासाठी व पूर्व तयारीसाठी २ महिने लागले आहेत. सदरील पगडी दर्शनासाठी व पाहण्यासाठी सर्व भक्तांसाठी खुली आहे.

## डीवाय पाटील कॉलेज बॉम्बने उडवून देण्याची धमकीची अफवा



**आकुर्डी :** माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांच्या पिंपरी चिंचवडच्या डी. वाय. पाटील कॉलेजला एक मेलमुळे एकच खळबळ उडाली. हे कॉलेज आहे. या कॉलेजला बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे करण्यात आली. अज्ञात इसमाकडून कॉलेजला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली. संबंधित धमकीचा मेल प्राप्त झाल्यानंतर कॉलेज प्रशासनाने तातडीने पोलिसांच्या कंट्रोल रुमला फोन केला. यानंतर लगेच काही वेळाने पोलीस डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये पोहोचले.

पोलिसांनी ई-मेलचं गांभीर्य लक्षात घेत तातडीने कामाला सुरुवात केली. कॉलेजमध्ये सध्या परीक्षा सुरु असल्याने विद्यार्थ्यांची १०० टक्के उपस्थित होती. पण धमकीचा मेल आल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना वर्गातून बाहेर काढावं लागलं. त्यांना कॉलेजमधून बाहेर सुरक्षितस्थळी पाठवावं लागलं. यानंतर डॉगस्कॉड तिथे दाखल झाला. तसेच बॉम्ब शोधक आणि नाशक पथक कॉलेजमध्ये दाखल झालं. या पथकाकडून अतिशय बारकाईने शोध घेण्यात आला. पण आतापर्यंत तसं काही संशयास्पद आढळलेलं नाही.

## तीव्र आंदोलन




**पुणे** पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व प्रभारी बी. एम. संदीप यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराविरोधात महापालिकेच्या गेट समोर धरणे आंदोलन घेण्यात आले.

## काँग्रेस कायदेशीर लढाई लढणार : डॉ. कैलास कदम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व प्रभारी बी. एम. संदीप यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली पालिकेच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराविरोधात पालिकेच्या गेट समोर धरणे आंदोलन घेण्यात आले. यावेळी आरोग्य, पाणीपुरवठा, पर्यावरण स्थापत्य, वाहतूक विभाग शिक्षण विभागामधील अनेक समस्यावर आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले. कशाप्रकारे प्रशासनामधील अधिकारी व सत्ताधारी आमदार संगणमताने करदात्यांच्या पैशाची अक्षरशः लूट करत आहेत हे निदर्शनास आणून देणे काँग्रेस पक्षाचे कर्तव्य आहे, तसेच वैयक्तिक आकासापोटी कुदळवाडी चिखली येथे कारवाई केली व सर्वसामान्य नागरिकांना रस्त्यावर आणून त्याठिकाणी काहीजणांचा भूखंडावर डोळा आहे हे स्पष्ट होते, तसेच काळेवाडीमधील अनेकांना अनधिकृत बांधकामा बद्दल नोटीस प्राप्त झालेल्या आहेत, त्यासाठी हे नागरिक पूर्णपणे भयभीत झाले असून सध्या तणावांमध्ये आहेत. काँग्रेस पक्ष यापुढे कायदेशीर लढाई लढणार आहे.



## पालिकेकडून रानजाई महोत्सवाचे उत्कृष्ट नियोजन

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेने 'रानजाई महोत्सव' चे उत्कृष्ट आयोजन केले आहे. शहरातील नागरिकांनी या महोत्सवात फळे, फुले, भाजीपाला स्पर्धेमध्ये भाग घेऊन पर्यावरणाप्रती आपले योगदान दिले आहे ही कौतुकास्पद बाब आहे, असे सांगून त्यांनी दुर्गादेवी टेकडीवर पूर्वी एकही झाड नव्हते, तेव्हा महानगरपालिकेच्या वतीने संपूर्ण दुर्गादेवी टेकडीवर विविध प्रजातींच्या झाडांच्या बिया पेरण्यात आल्या, त्यामुळे आज दुर्गा टेकडी हिरवेगार वनराईचे क्षेत्र बनले असून ही टेकडी पर्यटकांसाठी एक आकर्षण ठरली आहे. तसेच सध्या महापालिकेला कोणत्याही उपक्रमांचे चांगले नियोजन आणि आयोजन करणारा अधिकारी वर्ग लाभला आहे. शासनाच्या १०० दिवसाच्या उपक्रमामध्ये नुकताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला राज्यातील प्रथम क्रमांकाचे बक्षीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मिळाला, ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असे प्रतिपादन आमदार उमा खापरे यांनी केले.



## नद्या वाचवण्यासाठी जागृत नागरिक रस्त्यावर!

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील पवना, इंद्रायणी मुळा या नद्यांचे प्रदूषण रोखणे, तसेच नदी सुधार प्रकल्पाच्या नावाखाली हजारो वृक्ष तोडून जॉगिंग ट्रॅक बनवणे यासाठी होणाऱ्या वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी, जल शुद्धीकरण प्रकल्पांचे बोगस काम बंद करून ते पारदर्शक व प्रभावी व्हावे. नद्यांची प्रदूषण पातळी कमी व्हावी. या प्रमुख मागण्यांसाठी शहरातील पर्यावरणवादी कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने तसेच सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांच्या सहकार्याने चिंचवडगाव येथील चापेकर चौकात हातात विविध जनजागृती फलक घेऊन मानवी साखळी करून आंदोलन करण्यात आले.

## नशेसाठी पैसे दिले नाही म्हणून १३ दुचाकी जाळल्या

**पिंपरी :** पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील वाढती गुन्हेगारी सातत्याने चर्चेचा विषय बनला असून, एका तरुणाने तब्बल १३ दुचाकी गाड्या जाळल्याची घटना घडली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये ही घटना घडली असून, आईने नशा करण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणातून त्याने हे कृत्ये केल्याचे तपासातून समोर आले. महत्त्वाचे म्हणजे त्याच्यावर कारवाई करा नाहीतर तो आमच्या जीवाचं बरं वाईट करेन, अशी भीतीही त्याच्या आईने व्यक्त केली आहे. ज्या तरुणाने १३ दुचाकी जाळल्या, त्याचे नाव स्वप्निल शिवशरण पवार, असे आहे. पार्किंगमध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीमध्ये तो दुचाकीला आग लावताना दिसत आहे. गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्याला अटक केली आहे. ही घटना पिंपरीमधील मोरया क्षितिज बिल्डिंग या सोसायटीमध्ये घडली. स्वप्निल याच सोसायटीमध्ये राहतो. व्हिडीओ मध्ये दिसत आहे की, स्वप्निल एका गाडीला आग लावत आहे. त्यानंतर आगीचा भडका उडतो आणि सगळ्या गाड्या आगीच्या भक्ष्यस्थानी सापडून जळून खाक झाल्या.

# पिंपरी-चिंचवडसाठी जगतापांचा लढा

### मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लिटर पाणी आरक्षित करण्याची मागणी

जलसंपदा विभागाकडून पुढील कारवाई अपेक्षित

शहराच्या विस्तारासोबतच गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवडी, मान, नेरे आणि सांगवडे या सात गावांचा समावेश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यातील पाण्याची मागणी आणि तुटवडा लक्षात घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेला पुरेसे पाणी मिळावे, यासाठी पुढील स्तरावर अधिकाऱ्यांकडून कार्यवाही होणार आहे.



" बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी स्पष्ट केले की, कृष्णा खोरे विकास महामंडळाने नेमून दिलेल्या पाणी साठ्यापेक्षा महानगरपालिका अतिरिक्त पाणी वापरत नसल्याचेही अधोरेखित केले. मुळशी धरणातून महानगरपालिकेसाठी पाणी आरक्षित करण्याचा निर्णय तातडीने व्हावा,

-आमदार शंकर जगताप,



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढत्या लोकसंख्येला आवश्यक पाणीपुरवठा मिळावा यासाठी आमदार शंकर जगताप यांनी ठाम भूमिका घेत मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लिटर पाणी आरक्षित करण्याची आग्रही मागणी केली. यासंदर्भात जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली.

बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी चिंचवडच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता, २०५१ पर्यंत होणाऱ्या वाढीव लोकसंख्येसाठी ८१४ एमएलडी पाण्याची गरज भासणार असल्याचे ठामपणे मांडले. सध्या महानगरपालिकेसाठी पवना धरणातून ५३० एमएलडी, आंद्रा धरण बंधाऱ्यातून ८० एमएलडी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) २० एमएलडी असे एकूण ६३० एमएलडी पाणी उपलब्ध आहे. मात्र, लोकसंख्यावाढीचा वार्षिक ७% दर लक्षात घेता, भविष्यात ८१४ एमएलडी पाण्याचा तुटवडा जाणवेल. त्यामुळे मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षित करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी त्यांनी ठाम भूमिका घेतली. या मागणीवर उत्तर देताना जलसंपदा मंत्र्यांनी पिंपरी चिंचवड पालिकेतील पाण्याच्या वापराचे ऑडिट करण्याचे निर्देश दिले.

#### बैठकीत महत्त्वाचे मुद्दे चर्चेला

- १) आमदार शंकर जगताप यांनी केलेल्या लेखी मागणीनुसार ही बैठक मंत्रालयात पार पडली.
- २) मुळशी धरणातून महानगरपालिकेसाठी पाणी आरक्षित करण्याची गरज अधोरेखित करत ठोस भूमिका मांडली.
- ३) या वेळी आमदार महेश लांडगे, जलसंपदा विभागाचे सचिव दीपक कपूर, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता हनुमंत गुनाले, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंग, सहशहर अभियंता प्रमोद ओंबासे, कार्यकारी अभियंता दीपक पाटील उपस्थित होते.

## इंद्रायणी घाट स्वच्छता; स्वयंसेवकांचे श्रमदान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमन सोहोळ्याला येत्या वर्षी 375 वर्षे पूर्ण होत आहेत. कार्यक्रमाच्या तयारीचा भाग म्हणुन श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू ह्यांच्या मार्गदर्शनात देहू नगरपंचायत व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, देहू गट ह्यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रायणी घाट स्वच्छता मोहिमेचे आयोजन रविवारी देहू येथे करण्यात आले होते.

देहू नगर पंचायत नगराध्यक्षा पूजा दिवटे, देहू नगरपंचायत चे मुख्य अधिकारी निवेदिता घार्गे, आस्थापन विभाग अधिकारी महेश वाळके व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देहू गट संघचालक नरेशजी गुप्ता यांच्या मार्गदर्शनात गट सेवा विभाग प्रमुख तसेच सेवा विभागाच्या नियोजनात यशस्वी झाला. उत्सवाच्या दरम्यान येणाऱ्या भाविकांनी सुद्धा स्वच्छता टिकवण्यात सहकार्य करावे अशी विनंती आयोजकांमार्फत करण्यात आली.

- १) दर वर्षी तुकाराम महाराज बीज सोहोळ्याचे औचित्य साधून 15 लाखाहून अधिक भाविक देहूला येत असतात. त्यांच्या स्वागतासाठी देहू नगरी सज्ज होते आहे.
- २) भाविकांची गैरसोय होऊ नये व उत्सवाचे पावित्र्य टिकून राहावे यासाठी ह्या स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.
- ३) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १५ शाखांमधून १०५ स्वयंसेवक तसेच इतरही नागरिक स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.
- ४) भल्या पहाटे स्वच्छता मोहिमेला सुरुवात करून स्वयंसेवकांनी घाट परिसर स्वच्छ करून नगर पंचायतीच्या मदतीने कचरा संकलित केला.

# बाजारात कैरीची आवक



**पिंपरी :** येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 9) कैरीची आवक झाली. पालेभाज्यांचे दर स्थिर आहेत, तर बीन्सचे दर वाढले आहेत. उन्हाळ्यामुळे गावरान कोथिंबीरचे दर जास्त असले तरी मागणीत वाढ झाली आहे.

पिंपरी बाजरात रविवारी तोतापुरी कैरीची मोठी आवक झाली. 100 ते 120 रुपये दराने तोतापुरी कैरीची विक्री होत आहे.

उन्हाळा असल्याने कैरीला नागरिकांची पसंती आहे. आंबे येईपर्यंत कैरी भाव खाईल असे जाणकारातून म्हटले जाते पालेभाज्यांचे दर गेल्या आठवड्याप्रमाणे स्थिर आहेत. यामध्ये अशोका कोथिंबीर 15 रूपये तर गावरान कोथिंबीर 20 रूपये दर होता. फळभाज्याही 30 ते 60 रुपये किलो दराने विक्री होत आहे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १५२/२०२४/५३५१

**अर्जदार**
नियो.त्रिमुर्ती अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.४,हिस्सा नं. १ (पार्ट), खराडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१४.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री. अनिल भुजंगराव निंबाळकर
**जाब देणार**
**विरुध्द**
१. जी. ॲण्ड जे. असोसिएटस्,
नोंदणीकृत भागीदार संस्था, तर्फे भागीदार अ.श्री.गजानन रामकृष्ण सोनकुसरे. रा. वडगांवशेरी, पुणे-४११०१४. . श्री. जहांगीर राजमहम्मद शेख.
रा. ताडीवाला रोड, पुणे- ४११ ००१.
क. श्री. जलाऊद्दीन वलीउद्दीन पीरजादे.
रा.सरगम अपार्टमेंटस्, बालीकाश्रम रोड, सावेडी, अहमदनगर - ४१४००३.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. त्रिमुर्ती अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं. ४, हिस्सा नं. १ (पार्ट), खराडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०१४ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १५४/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २५/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ अ ते १क गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ अ ते १क यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. २०/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ अ ते १क यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २८/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.१३१/२०२४/५२७२

**अर्जदार**
नियो.साईदत्त निवास फेज II विंग 'डी' सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.५/४+५/४,प्लॉट नं. ०१,
मौजे आंबेगांव खुर्द, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०४६.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री. प्रविण कल्लापा खवाटे
**जाब देणार**
**विरुध्द**
१.द कन्स्ट्रक्शन्स ॲण्ड डेव्हलपमेंट कंपनी.
नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफीस पत्ता:-विश्वव्दार, १९०५, सदाशिव पेठ, पुणे- ४११०३०.
तर्फे अधिकृत भागीदार,
श्री. अविनाश अनंत जाधव.
श्रीकृपा अपार्टमेंटस्,मयूर कॉलनी, कोथरुड, पुणे-४११ ०३८.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे..

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. साईदत्त निवास फेज II विंग 'डी' सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं. ५/४+५/४, प्लॉट नं. ०१, मौजे आंबेगांव खुर्द, ता. हवेली, जि.पुणे- ४११ ०४६या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १३१ / २०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. आदिती कुलकर्णी हजर, जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.१८/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न, ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २५/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १६/२०२५/५३५३

**अर्जदार**
नियो.बियॉण्ड हाऊस सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.२४९/१अ/८, सिटीएस नं. ४४८३, प्लॅाट नं.१४,
गोलांडे इस्टेट,मौजे चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०३३.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री. यज्ञेश जितेंद्र पांचाल
**जाब देणार**
**विरुध्द**
१. बियॉण्ड रिअॅल्टी प्रायव्हेट लिमिटेड.
नोंदणीकृत प्रायव्हेट लिमिटेड कंपनी
तर्फे संचालक,
१. १. श्री. सचिन ज्ञानोबा भिकुले.
रा.फ्लॅट नं.०१,कार्तिक अपार्टमेंट, सुदर्शन नगर, चिंचवड, पुणे-४११०३३.
१.२. हर्षला विजय पाटील.
रा. फ्लॅट नं. २६/बी/३, पारिजात बन हाऊसिंग सोसा, सुदर्शन नगर, चिंचवड, पुणे- ४११ ०३३. २. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. बियॉण्ड हाऊस सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ता:- स.नं. २४९/१/८, सिटीएस नं. ४४८३, प्लॅाट नं. १४, गोलांडे इस्टेट, मौजे चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०३३ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १६/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २७/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड.आदिती कुलकर्णी हजर. जाब देणार क्र. १.१ ते १.२ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १.१ ते १.२ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. २५/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १.१ ते १.२ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २८/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

संपादकीय विशेष

# नव्या विजयासाठी भाजप दक्ष

यंदा बिहारमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकीला बराच वेळ असला आणि भाजप त्यासाठी सिध्द असला तरी पडद्यामागे जोरदार तयारी सुरु आहे. इतकी की त्याच्या बातम्या सर्वत्र पुढे येऊ लागल्या आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पात बिहारसाठी केल्या गेलेल्या तरतुदी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भागलपूर दौरा आणि बिहारसाठी केल्या गेलेल्या घोषणा पाहता हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्लीनंतर आता बिहार हे 'एनडीए'चे लक्ष्य असल्याचे दिसते. अर्थात येथिल प्रमुख पक्षांची 'इंडिया' आघाडी आणि 'एनडीए' या दोन्ही आघाड्यांसमोर अंतर्गत आणि बाह्य आव्हाने आहेत. बिहारच्या विकासात केंद्राच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सात महिन्यांच्या कालावधीमध्ये सादर केलेल्या दोन केंद्रीय अर्थसंकल्पांमध्ये बिहारसाठी पायाभूत सुविधा गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली. यामध्ये महामार्ग, विमानतळ, पूरनियंत्रण आणि पर्यटन विकास यांचा समावेश आहे. यावरून नितीशकुमार यांच्या दोन दशकांच्या कारकीर्दीत राज्यासमोरील विकासासंबंधीची आव्हाने सोडवली गेली नसल्याचे स्पष्ट होते. बिहारला विशेष दर्जा देण्यास केंद्र सरकारने नकार दिला आहे. हा दर्जा मिळाला असता तर राज्याच्या प्रकल्पांमध्ये केंद्राचे योगदान 60 टक्क्यांवरून 90 टक्क्यांपर्यंत वाढले असते.

2010 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये येथे संयुक्त जनता दलाने 115 जागा जिंकल्या होत्या. भाजपने तेव्हा 91 जागा जिंकल्या. ही त्यांची आजपर्यंतची सर्वोत्तम कामगिरी होती. 2015 पर्यंत भाजपला सर्वाधिक मते मिळाली. ती एकूण मतांच्या जवळपास एक चतुर्थांश आहेत. ही वाढ इतर पक्षांच्या मतांची टक्केवारी कमी झाल्यामुळे झाली. या निवडणुकीत संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दलाने अधिक जागा जिंकल्या आणि अल्पायुषी आघाडी सरकार स्थापन केले. मात्र त्यानंतर भाजप आणि संयुक्त जनता दल पुन्हा एकत्र आले. 2020 पर्यंत परिस्थिती बदलली. भाजपने 110 जागा लढवून 74 जागा जिंकल्या तर संयुक्त जनता दलाने 115 जागा लढवून 43 जागा जिंकल्या. संयुक्त जनता दलाच्या इतिहासातली ही सर्वात वाईट कामगिरी होती. गेल्या दशकात नितीशकुमार यांच्या राजकीय भूमिकेवर भाजपच्या उदयाचा परिणाम झाला आहे. सर्वाधिक काळ बिहारचे मुख्यमंत्री राहिलेले नितीशकुमार यांना भाजप किंवा राष्ट्रीय जनता दलाच्या खाली दुसऱ्या क्रमांकावर रहायचे नाही. म्हणूनच ते खुर्चीला चिकटून राहिले आहेत.

बिहारच्या अत्यंत स्पर्धात्मक राजकारणात भाजप वरचढ ठरतो, तेव्हा ते राष्ट्रीय जनता दलाकडे वळतात. राष्ट्रीय जनता दलाने डोळे वटारताच ते पुन्हा 'एनडीए'मध्ये येतात. दरडोई उत्पन्नामध्ये सातत्याने खालच्या क्रमांकावर असलेल्या बिहारमध्ये कोणत्याही एका पक्षाला गेल्या काही वर्षांमध्ये बहुमत मिळालेले नाही. महाराष्ट्राप्रमाणे तिथेही आघाडी किंवा युतीचे राज्य येते. 'इंडिया' आघाडी सार्वजनिक कल्याणावर भर देते, तर पायाभूत सुविधांची निर्मिती हा 'एनडीए'च्या कल्याणकारी कार्याचा आधारस्तंभ आहे. बिहारला या दोन्हीची गरज आहे. या पार्श्वभूमीवर दोन केंद्रीय अर्थसंकल्पांनी भाजपला बिहारमध्ये धोरणात्मक फायदा देण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्ण बहुमताने जिंकून राज्याला पक्षाचा पहिला मुख्यमंत्री देण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र, हरियाणा, दिल्लीच्या निवडणूक निकालांनी भाजपचा आत्मविश्वास वाढला आहे.

राजकीय दबावाखाली काही राज्यांमधील पक्षांचे विभाजन करून भाजप बहुमताच्या जवळ आला. त्यात महाराष्ट्राचे उदाहरण घेता येते. ते उदाहरण नितीशकुमार यांच्या मनात असेल. 2020 च्या तुलनेत या वेळी जागावाटप खूप कठीण होणार आहे. स्वबळावर किंवा छोट्या पक्षांसोबत सरकार स्थापन करण्याची शक्यता वाढवण्यासाठी भाजप 243 पैकी 140 किंवा त्याहून अधिक जागांवर दावा करू शकते. नितीशकुमार यांना आता त्यांच्या पर्यायांचा काळजीपूर्वक विचार करावा लागेल. त्यांचे दीर्घकाळचे मित्र सुशीलकुमार मोदी यांच्या निधनामुळे ते भाजपपासून आणखी दूर गेले आहेत. गेल्या वर्षी ओडिशामध्ये घडल्याप्रमाणे विकास-केंद्रित प्रशासनाचे नवीन मॉडेल निवडणूक अनुनयाच्या घोषणांपेक्षा अधिक लक्ष वेधून घेईल. जातीय युती आणि महिला मतदार अजूनही निवडणुकीतील यशाची गुरुकिल्ली असू शकतात. संयुक्त जनता दल आणि राष्ट्रीय जनता दल मतदारांसाठी काय आहे हे सर्वश्रुत आहे. हे पक्ष आपल्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा आश्वासने पाळण्याची शक्यता अधिक आहे की नाही हे ठरवण्यासाठी मतदार महाराष्ट्र आणि दिल्लीतील सरकारच्या कामगिरीवर बारीक लक्ष ठेवून असतील.

बिहारमध्ये निवडणुकीपूर्वी मंत्रिमंडळ विस्तार झाला. मंत्र्यांमध्ये विभागही विभागले गेले. मंत्रिमंडळ विस्तारानंतर नितीश यांच्या मंत्रिमंडळात आता 36 मंत्री आहेत. संयुक्त जनता दल आणि भाजप या दोन्ही पक्षांचे नवे चेहरे मंत्रिमंडळात सामील होणार असल्याची चर्चा बिहारमध्ये होती; पण असे काय झाले, की अलिकडेच विस्तारातील सातही मंत्रिपदे भाजपकडे गेली, याची राज्यात तसेच राजकीय विश्लेषकांमध्ये जोरदार चर्चा आहे. वस्तुत: या मंत्रिमंडळ विस्तारात नितीशकुमार यांच्याकडे गमावण्यासारखे काही नाही. सर्व बदल भाजपच्या कोट्यातून झाले आहेत. भाजपने आपल्या कोट्यातील विभाग आपापसात वाटून घेतले आहेत. नितीश मंत्रिमंडळाच्या विस्तारात सात नवीन चेहऱ्यांना घेऊन बिहारची राजकीय समीकरणे सोडवण्याचा प्रयत्न झाला. मंत्रिमंडळ विस्तार पाहता नितीशकुमार आपल्या मंत्र्यांच्या कारभारावर समाधानी असल्याचे दिसते. त्यांना आपल्या कोट्यामध्ये कोणताही बदल करण्याची गरज वाटली नाही. भाजपने फक्त खात्यांचे वाटप केले आहे. नितीशकुमार यांनी भाजपला एकही अतिरिक्त विभाग दिला नाही. संयुक्त जनता दलाच्या कोट्यातील विभाग आजही तसेच आहेत. जो काही बदल आहे तो भाजपमध्ये आहे. बिहार विधानसभेच्या निवडणुकीसाठी भाजप मोठ्या ताकदीने तयारीला लागला आहे. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवून जादा जागा मिळाल्या, की त्यांची पदावनती करायचा भाजपचा सूप्त हेतू असू शकतो. दरम्यान, नितिशकुमार यांचे चिरंजीव निशांतकुमार राजकारणात प्रवेश करत आहेत. ते त्यांची गादी चालवतील, अशी शक्यता आहे.

# देशाला तारणारी उलाढालवाढ

**शेअर बाजाराला आग लागली असताना अन्य काही अर्थक्षेत्रांमध्ये मात्र बरकतीच्या बातम्या आहेत. अशीच एक महत्वाची बातमी म्हणजे देशातील किरकोळ बाजाराची उलाढाल १९० लाख कोटींवर जाण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे जीएसटीमधून दररोज सरासरी पाच ते सहा लाख कोटी रुपयांची कमाई होत आहे. तर तिसरी बातमी म्हणजे ग्रामीण भागाने देशाच्या जीडीपीची लाज राखली आहे.**



अर्थनगरीतून



महेश देशपांडे
आर्थिक घडामोडींचे जाणकार

शेअर बाजाराला आग लागल्यासारखी परिस्थिती अलिकडच्या काळामध्ये अनुभवायला मिळत असताना अन्य काही अर्थक्षेत्रांमध्ये मात्र बरकतीच्या बातम्या आहेत. अशीच एक महत्वाची बातमी म्हणजे देशातील किरकोळ बाजाराची उलाढाल १९० लाख कोटींवर जाण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे जीएसटीमधून दररोज सरासरी पाच ते सहा लाख कोटी रुपयांची कमाई होत असल्याचे आकडेवारीमधून स्पष्ट झाले आहे. तर तिसरी खास बातमी म्हणजे ग्रामीण भागाने देशाच्या जीडीपीची लाज राखल्याचे दिसून आले आहे.

देशातील किरकोळ बाजार तेजीत आहे. २०३४ पर्यंत हा बाजार १९० लाख कोटी रुपयांवर पोहोचण्याची अपेक्षा आहे. देशात मोठ्या प्रमाणात असलेल्या किरकोळ विक्रेत्यांना याचा फायदा होणार आहे. 'बोस्टन कन्सल्टींग ग्रुप' आणि 'रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया'ने तयार केलेल्या अहवालात म्हटले आहे की देशातील विविध विभागातील ग्राहकांच्या गरजाही भिन्न आहेत आणि किरकोळ विक्रेत्यांना त्या जाणून आणि समजून घेण्याची संधी मिळेल. सुजाण नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे

हा अहवाल पुढे सांगतो की भारतातील किरकोळ बाजाराचा आकार २०१४ पर्यंत ३५ लाख कोटी रुपये होता. २०२४ पर्यंत तो वाढून ८२ लाख कोटी रुपये झाला. गेल्या दशकात ८.९ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. यामागे देशाची आर्थिक वाढ आणि वेगाने वाढणारी बुद्धिमान आणि विविध श्रेणीतील ग्राहकांची संख्या आहे. कोरोनाच्या काळात भारताची उपभोगवाढ सारखीच राहिली; परंतु २०२४ ते २०३४ या काळात खपात सर्वाधिक वाढ दिसून येईल. अहवालात पुढे म्हटले आहे की भारताचा किरकोळ बाजार मोठा असून वेगाने वाढत आहे. तो २०३४ पर्यंत १९० ट्रिलियन रुपयांपुढे जाण्याची अपेक्षा आहे. भारतातील 'रिटेल कॅलिडोस्कोप' वातावरण अहवालात नमूद करण्यात आले आहे की भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असली तरी लोकसंख्येमध्ये अनेक विरोधाभास आहेत. झपाट्याने वाढणारा मध्यमवर्ग, श्रीमंत पण किमतीबाबत जागरूक ग्राहक, डिजिटली जागरूक जनरेशन झेड, ४५ वरील वयोगटातील वाढती लोकसंख्या हे घटक किरकोळ बाजारावर प्रभाव टाकतात. महिला कर्मचाऱ्यांच्या वाढत्या व्याप्तीमुळे खरेदीमागील कारणांनाही नवे स्वरूप प्राप्त होत आहे. हे सर्व मिळून एक असे वातावरण तयार करत आहेत, ज्याला रिटेल कॅलिडोस्कोप म्हणता येईल. त्यात अनेक संधी आहेत; परंतु गुंतागुंत कमी नाही.

दुसरी महत्वाची बातमी म्हणजे सरकारने फेब्रुवारी महिन्यात जीएसटीमधून भरपूर कमाई केली आहे. चालू आर्थिक वर्षात सहाव्यांदा १.८० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मासिक जीएसटी संकलन झाले आहे. चालू आर्थिक वर्षाच्या अकरा महिन्यांमधील सरकारची कमाई २० लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे. फेब्रुवारीमध्ये एकूण जीएसटी संकलन ९. १ टक्क्यांनी वाढून सुमारे १.८४ लाख कोटी रुपये झाले. या कालावधीत सकल वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनाअंतर्गत देशांतर्गत महसूल १०.२ टक्क्यांनी वाढून १.४२ लाख कोटी रुपये झाला. आयात महसूल ५.४ टक्क्यांनी वाढून ४१ हजार ७०२ कोटी रुपये झाला. आकडेवारीनुसार, केंद्रीय जीएसटीमधून ३५ हजार २०४ कोटी रुपये, राज्य जीएसटीमधून ४३ हजार ७०४ कोटी रुपये, एकात्मिक जीएसटीमधून ९० हजार ८७० कोटी रुपये आणि नुकसानभरपाई उपकरातून १३ हजार ८६८ कोटी रुपये जमा झाले आहेत. फेब्रुवारीमध्ये एकूण २० हजार ८८९ कोटी रुपये परतावा देण्यात आला. तो वार्षिक आधारावर १७.३ टक्के जास्त आहे.

फेब्रुवारी २०२५ मध्ये निव्वळ जीएसटी संकलन ८.१ टक्क्यांनी वाढून अंदाजे १.६३ लाख कोटी रुपये झाले. वर्षभरापूर्वी याच महिन्यात एकूण आणि निव्वळ जीएसटी संकलन १.६८ लाख कोटी रुपये होते. चालू आर्थिक वर्षातील हा सहावा महिना आहे, जेव्हा देशाचे जीएसटी संकलन १.८० लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. एप्रिलमध्ये जीएसटी संकलन २.१ लाख कोटी रुपये होते. ते आतापर्यंतचे सर्वाधिक आहे. जुलैमध्ये १.८२ लाख कोटी रुपये, ऑक्टोबरमध्ये १.८७ लाख कोटी रुपये, नोव्हेंबरमध्ये १.८२ लाख कोटी रुपये, जानेवारीमध्ये १.९६ लाख कोटी रुपये आणि फेब्रुवारीमध्ये १.८४ लाख कोटी रुपये जीएसटी संकलन झाले. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या व्यावसायिक महिन्यात जीएसटी संकलन १.९० लाख कोटी रुपयांच्या पुढे जाऊ शकते. आर्थिक वर्षाच्या ११ महिन्यांच्या एकूण जीएसटी संकलनाचा विचार केला तर ते २०.१३ लाख कोटी रुपये आहे. तज्ज्ञांच्या मते मार्च महिन्यातील अंदाजे आकडेवारी लक्षात घेता एकूण रक्कम २२ लाख कोटी रुपयांचा आकडा पार करू शकते. विशेष बाब म्हणजे आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात जीएसटी संकलनाचे लक्ष्य २२.६ लाख कोटी रुपये ठेवण्यात आले आहे. सरकारने एक आर्थिक वर्ष आधीच हा आकडा गाठला आहे. तज्ज्ञांच्या मते येत्या आर्थिक वर्षामध्ये जीएसटी संकलनाचा आकडा २५ ते २७ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो.

भारतावर कोणतेही संकट आले की देशातील गावे खंबीरपणे उभे राहतात. त्यामुळेच जुलै-सप्टेंबर या तिमाहीमध्ये ५.६ टक्क्यांपर्यंत पोहोचलेला देशाचा जीडीपी विकास दर ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीमध्ये वाढला आणि गावांनी देशाची इभ्रत वाचवत जीडीपीवाढीचा दर ६. २ टक्क्यांवर नेला. गेल्या वर्षीच्या चांगल्या मॉन्सूनने देशाचा जीडीपी उत्तम राखण्यात महत्वाची भूमिका बजावली.खेड्यापाड्यातील लोकांचे उत्पन्न वाढले असतानाच गावांचा खर्चही वाढला आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालया (एनएसओ) च्या आकडेवारीनुसार ग्रामीण वापराने आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये (ऑक्टोबर-डिसेंबर) जीडीपी वाढ ६. २ टक्क्यांपर्यंत नेण्याचे काम केले आहे.

दरम्यान, सरकारच्या वाढलेल्या खर्चामुळेही अर्थव्यवस्था सांभाळण्यास मदत झाली आहे. तथापि, गेले आर्थिक वर्ष २०२३- २४ च्या याच तिमाहीमध्ये देशाच्या जीडीपीच्या 9.5 टक्के वाढीच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी आहे. 'एनएसओ'ने ताज्या अंदाजात म्हटले आहे, की संपूर्ण चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ६.५ टक्के असू शकतो. जानेवारी २०२५ मध्ये 'एनएसओ'ने देशाचा जीडीपीवाढीचा दर ६.४ टक्के असण्याचा अंदाज वर्तवला होता. 'एनएसओ'ने गेल्या आर्थिक वर्षासाठी (२०२३- २४) जीडीपीवाढीचा दर देखील सुधारला आहे. तो आता ८.२ टक्के झाला आहे. तो पूर्वी ८.२ टक्के होता.

सरकारने देशातील आठ प्रमुख उद्योगांमधील वाढीची आकडेवारीही जाहीर केली आहे. जानेवारीमध्ये ८ मूलभूत उद्योगांची वाढ ४.६ टक्के होती. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये हा विकास दर ४.२ टक्के होता. तथापि, डिसेंबर २०२४ मधील मुख्य उद्योगांच्या ४.८ टक्के वाढीपेक्षा हे किरकोळ कमी आहे. जानेवारी २०२५ मध्ये देशात कोळसा उत्पादनात ४.६ टक्के, पोलाद उत्पादनात ३.७ टक्के आणि वीज उत्पादनात १.३ टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात या उद्योगांचा विकासदर अनुक्रमे १०.६ टक्के, ९.२ टक्के आणि ५.४ टक्के होता. या कालावधीमध्ये रिफायनरी उत्पादनांच्या उत्पादनात ८.३ टक्के, खतांच्या उत्पादनात तीन टक्के आणि सिमेंट उत्पादनामध्ये १४.५ टक्के वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते जानेवारी या कालावधीमध्ये आठ प्रमुख उद्योगांचा विकास दर ४.४ टक्के होता, तर गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीमध्ये हा दर ७.८ टक्के राहिला. देशातील आठ प्रमुख उद्योगांमध्ये कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट आणि ऊर्जा क्षेत्राचा समावेश आहे.

खेचाखेची

## स्वप्नातही नाही

'इनो' बनवणाऱ्या कंपनीनं स्वप्नातसुद्धा हा विचार केला नसेल की,

.
.
.
.

गॅस आणि ॲसिडिटी दूर करण्यासाठी तयार केला गेलेला हा घटक भारतीय बायका ढोकळा आणि इडलीचं पीठ फुगवण्यासाठी वापरतील...

सुप्रभात

वेगळं काही

निरुपद्रवी वाटणारे ग्लिटर पर्यावरणासाठी हानीकारक असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. म्हणूनच इंग्लंडमधल्या प्लेमाउथ विद्यापीठातले संशोधक प्राध्यापक रिचर्ड थॉमसन यांच्यासह जगभरातले शास्त्रज्ञ त्याच्या वापरावर बंदीची मागणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. ग्लिटरच्या निर्मितीसाठी ॲल्युमिनियम तसंच पीईटी नावाच्या प्लास्टिकचा वापर केला जातो. त्यामुळे वर्षानुवर्ष त्याचं विघटन होत नाही. स्क्रब तसंच साबणात ग्लिटरचा वापर केला जातो. टूथपेस्ट, लिपबाममध्ये चमक आणण्यासाठी ग्लिटरचा वापर केला जातो. पण आरोग्याच्या दृष्टीने अशा वस्तूंचा वापर धोक्याचा ठरू शकतो. ग्लिटरमुळे फुफ्फुस आणि डोळ्यांना इजा होऊ शकते.

## आत्मविश्वासाने उभी रहा

समुपदेशन

मी एक विवाहित स्त्री असून ११ वर्षांपूर्वी आमचा प्रेमविवाह झाला. आम्हाला दोन मुलं आहेत. मी सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातली मुलगी तर पती श्रीमंत व्यावसायिक कुटुंबातले आहेत. लग्नानंतरच्या काही वर्षातच त्यांनी माझ्याकडून घरच्या जबाबदाऱ्यांबाबत वाढत्या अपेक्षा व्यक्त करायला सुरूवात केली. घरची कामं, दोन्ही मुलांचं सगळं मीच बघावं अशी त्यांची अपेक्षा असते. यामुळे मी आठ वर्षांपूर्वी करीअरचा त्याग केला. मात्र, आज त्याचा पश्चाताप होत आहे. त्याच वेळी मी आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून आहे. मात्र, तो स्वत:च्या मनाप्रमाणे वागतो. मी काय करू?



– मैत्रिणी, आता तुला स्वत:ची काळजी घेण्याची वेळ आली आहे. घरातल्या स्वयंपाक, घरकामासाठी कोणी कामवाली मिळते का ते बघ. यामुळे तुला नव्याने करीअर सुरू करता येईल. दुसरं म्हणजे तुझ्या या भावना पतीपर्यंत पोहोचव. करीअर सुरू करणं हे तुझ्यासाठी किती गरजेचं आहे हे त्याला सांग. आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी तसंच व्यक्तिमत्त्वाला धार आणण्यासाठी समुपदेशकाचीही मदत घेता येईल. तुझ्या क्षमता आणि कमकुवत दुवे यांचं विश्लेषण केल्यानंतर पतीशी स्पष्टपणे बोल.




राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या कामांना गती प्राप्त होईल. उपजत कला–गुणांचा विकास होईल. अडचणी सुटत जातील.
- **वृषभ** : कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. सुसंधीचा लाभ उठवावा. आर्थिक आवक वाढेल.
- **मिथुन** : महत्त्वाच्या विचारांना चालना मिळेले स्थावर, धनसौख्य लाभेल. अपेक्षित घटना दिलासा देतील.
- **कर्क** : प्रवासामुळे दगदग सोसावी लागेल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. महत्त्वाचे निर्णय वेळीच घ्यायला हवे.
- **सिंह** : आर्थिक प्रगती होईल. दुपारनंतर प्रवास करावा लागेल. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल.
- **कन्या** : फार धावपळ करु नका. अनावश्यक खर्च होणार आहे. मित्र, नातलगांचं सहकार्य लाभू शकेल.
- **तूळ** : व्यवसायात प्राप्तीचं प्रमाण वाढेल. नवीन धोरणं लाभप्रद ठरणार आहेत. कौटुंबिक सौख्य लाभेल.
- **वृश्चिक** : आपली पत, प्रतिष्ठा जोपासण्याचा प्रयत्न करावा. अडचणी कमी होत जातील. चिंता नसावी.
- **धनु** : प्रगतीच्या संधींचं स्वागत करावं. कार्यक्षेत्रात समाधान लाभेल. महत्त्वाच्या भेटीने समाधान लाभेल.
- **मकर** : सुसंधीचा लाभ उठवावा. दैनंदिन कामात अधिक लक्ष घाला. प्रतिकूलतेवर मात करु शकाल.
- **कुंभ** : नोकरीत अनुकूलता वाढत जाईल. सर्व आघाड्यांवर यश मिळेल. नव्या योजना मार्गी लागतील.
- **मीन** : महत्त्वाचे व्यवहार करुन घ्यावे. कार्यक्षेत्रात पुढचं पाऊल पडेल. नव्या ओळखी वाढतील.

सल्ला मोलाचा

## अशी दूर करा मुलांमधील भीती

मुलांमधील बुजरेपणा दूर करण्यासाठी पुढील टिप्स उपयोगी पडतील.

✻ मुलांशी सहजतेने वागा– बुजरेपणा दूर करण्यासाठी मुलांशी सहजतेने वागण्याचा प्रयत्न करा. त्यांना समवयस्कांमध्ये मिसळण्यासाठी उद्युक्त करा. सार्वजनिक ठिकाणं, गर्दीची ठिकाणं या सर्वांची मुलांना सवय होऊ द्या. ✻ त्यांची संवेदनशीलता समजून घ्या– ठराविक परिचितांबद्दल मुलाच्या मनात भीती असेल तर त्या व्यक्तीला भेटण्याची जबरदस्ती करू नका. संबधित व्यक्तीविषयी मुलाच्या मनात विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करा. ✻ मुलाची मानसिक तयारी करून घ्या– घरी पाहुणे येणार असतील तर मुलाला प्रत्येक पाहुण्यांविषयी नावानिशी सांगा. तसंच पाहुणे आल्यावर त्याची सगळ्यांना ओळख करून द्या. ✻ चाईल्ड कौन्सिलरची मदत घ्या– मुलांमध्ये अतिभयामुळे किंवा सतत एकटं राहिल्याने सोशल एंग्झायटी निर्माण होण्याची शक्यता असते. मुलामध्ये बुजरेपणा अधिक असल्यास चाईल्ड कौन्सिलरची मदत घ्यावी. यामळे योग्य मार्गदर्शन मिळन त्यांचा बजरेपणा कमी होण्यास मदत होईल.

## १२ मार्च

दिनविशेष

- **२०१३** : दिल्लीमधील बलात्कार प्रकरणातील आरोपी राम सिंहचा मृत्यू गळफास घेतल्यानेच झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट.
- **२०१४** : वाराणसीजवळ सारनाथ येथे दोन गुप्तकालीन बुद्धमूर्ती सापडल्या.
- **२०१६** : लेफ्टनंट जनरल एन.पी.एस.हिरा यांची लष्कराचे उपप्रमुख म्हणून नियुक्ती.
- **२०१८** : हजारो शेतकरी मुंबईतील आझाद मैदानावर दाखल. मुख्यमंत्र्यांनी मंत्रिगटाची नियुक्ती केली.

महत्त्वपूर्ण काही...


## फोबिया असेल तर...

आपल्याला एखाद्या गोष्टीच्या वाटणाऱ्या भितीला इंग्रजीत फोबिया म्हणतात. वेगवेगळ्या प्रकारचे फोबिया असू शकतात. परीक्षेची, शाळेतल्या शिक्षकांची भिती काही मुलांना वाटते. त्यात वावगं काही नाही. पण फोबिया यापेक्षा वेगळा असतो. विशिष्ट परिस्थिती किंवा घटनेची प्रचंड भीती आपल्याला वाटते. ही भीती काही केल्या जात नाही. या भितीमुळे मग घाम येतो, हातपाय थरथरू लागतात. काही मुलं रडू लागतात. हृदय धडधडू लागतं. याचा भविष्यात खूप त्रास होऊ शकतो. आपल्या बाबतीत काहीतरी वाईट घडणार आहे असं वाटू लागतं. त्यामुळे मुलांनो, एखाद्या गोष्टीची भिती वाटत असेल तर आपण त्याबद्दल व्यक्त व्हायला हवं. कशाची भिती वाटते हे जाणून घ्यायला हवं. ती दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. काही मुलांना समाजात मिसळायची भिती वाटते. ही समस्या बऱ्याच जणांना असते. पण या भितीवर मात करून आपण पुढे जाऊ शकतो हे आपण लक्षात घ्यायला हवं. फोबियाला हरवायला हवं. तुम्हालाही भिती वाटत असेल तर त्याबद्दल बिनधास्त बोला.

आरोग्यमंत्र

## घ्या नारळ पाणी

मधुमेहानं त्रस्त असणाऱ्यांना साखरयुक्त पेयांपासून लांब राहण्याचा सल्ला दिला जातो. आधीच मधुमेह असल्यामुळे बाहेरील अन्नघटकांमुळे रक्तातील साखर आणखी वाढू नये यासाठी अनेक जण जेवणातून असे अन्नघटक वर्ज करतात. सोबतच साखरेची पातळी वाढू नये या विचारानं नैसर्गिक गोड फळं खाणंही टाळतात. असाच काहीसा गोंधळ नारळ पाण्याबाबतही कायम असतो. नारळाच्या पाण्यामुळे शरीरातील साखरेचं प्रमाण वाढत असल्याचा अनेकांचा समज असतो. त्यामुळे नारळ पाण्याचं सेवन टाळलं जातं. पण हे अयोग्य आहे. मुळात हिरव्या नारळापासून काढलेलं पाणी हे एक नैसर्गिक पेय आहे. या पेयात कॅलरीज नसतात. यात इलेक्ट्रोलाइट, पोटॅशियम, लोह, मॅंगनीज, व्हिटॅमिन सी आणि फोलेट यांसारखे इतर अनेक पोषक घटक आढळतात. नारळाच्या पाण्याची चव गोड लागते पण त्यात नैसर्गिक साखर असते. यात कोणताही कृत्रिम गोडवा वापरला जात नाही. त्यामुळे शरीरातील साखरेच्या पातळीवर त्याचा परिणाम होत नाही. उलटपक्षी साखर नियंत्रित ठेवण्यास या पाण्याची मदत होते. तसं पहायला गेलं तर मधुमेहाच्या रुग्णांवर नारळ पाण्याचा काय परिणाम होतो, याबद्दल मानवांवर कोणतंही विशेष संशोधन झालेलं नाही. परंतु प्राण्यांवर केलेल्या संशोधनात हे सिद्ध झालं आहे की नारळ पाण्याचं सेवन केल्यानं रक्तातील साखर नियंत्रणात राहते. म्हणूनच मधुमेहींनी नारळ पाणी घेण्यास काहीच हरकत नाही.



पंचांग

**बुधवार, १२ मार्च २०२५**
क्रोधीनामसंवत्सर, शके १९४६,
फाल्गुन शु. १३, नक्षत्र : मघा,
चंद्रराशी : सिंह, योग : सुकर्मा,
सूर्योदय : ६.५१, सूर्यास्त : ६.४६

फॉरवर्डस

प्रियेला भेटण्यास उत्सुक असणारा एक प्रेमी जीव म्हणतो...

**कोई पूछेगा तो सुबह का भूला कह देंगे,,**
**तुम आओ तो सही, हम शाम को सवेरा कह देंगे..**

वाचा तर खरं

वाहतुकीच्या कोंडीतून दुचाकी चालवणं हे मोठं आव्हान असतं. रहदारीच्या रस्त्यावरून वाहन हाकताना दुचाकीस्वाराला बऱ्याच अडचणींना समोरं जावं लागतं. पण काही नियमांचं पालन केलं तर दुचाकी चालवणं थोडं सुसह्य होऊ शकतं. ✻ पुढचं वाहन अचानक वळलं तर चांगलीच पंचाईत होते. हे टाळण्यासाठी समोरच्या वाहनचालकाच्या डोक्याकडे आणि गाडीच्या आरश्यांकडे लक्ष ठेवा. वळण्याआधी चालक डोकं वळवतात. त्यामुळे पुढचं वाहन कुठे वळेल याचा अंदाज येतो. ✻ तुमच्या बाईकच्या आरशाकडे लक्ष ठेवा पण त्यावर पूर्णपणे विसंबून राहू नका.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### केजरीवाल यांच्यावर गुन्हा दाखल करा

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. सार्वजनिक निधीच्या गैरवापरप्रकरणी केजरीवालांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाचे पोलिसांना दिले आहेत.

### निवडणूक आयोगाची सर्व पक्षांना नोटीस

**नवी दिल्ली :** देशभरातील निवडणूक प्रक्रियेवरून विरोधी पक्ष आणि नेत्यांनी वारंवार केंद्रीय निवडणूक आयोगाला लक्ष्य केले आहे. या टीकेनंतर आयोगाने मोठं पाऊल उचलले आहे. या संदर्भातील आयोगाने सर्व पक्षांना मंगळवारी (दि. ११) नोटीस दिल्याचे वृत्त आहे. भारतीय निवडणूक आयोगाने सर्व राष्ट्रीय आणि राज्यातील राजकीय पक्षांकडून कोणत्याही निराकरण न झालेल्या समस्यांसाठी ३० एप्रिलपर्यंत सूचना मागवल्या आहेत. स्थापित कायद्यानुसार निवडणूक प्रक्रिया अधिक बळकट करण्यासाठी परस्पर सोयीस्करवेळी पक्षाध्यक्ष आणि वरिष्ठ सदस्यांनी आयोगासोबत चर्चेसाठी येण्याच्या सूचना देखील देण्यात आली आहे.
विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रासह निवडणूक याद्यांतील घोळाबाबत संसदेत प्रश्न उपस्थित करत या संदर्भात चर्चेची मागणी केली होती. तसेच या संदर्भात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची देखील भेट घेतली होती.

# राण्या राव सोने तस्करी प्रकरण

## 'आयपीएस अधिकारी' वडिलांचा सहभाग?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रोटोकॉल उल्लंघनाच्या आरोपांची आणि अभिनेत्री राण्या रावशी संबंधित सोन्याच्या तस्करी प्रकरणात वरिष्ठ आयपीएस अधिकारी रामचंद्र राव यांचा सहभाग असल्याच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिले आहेत. कर्नाटकचे अतिरिक्त मुख्य सचिव गौरव गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली ही चौकशी केली जाईल. एका आठवड्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सुरक्षा तपासणी टाळण्यासाठी आणि बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी होण्यासाठी राण्या राव यांनी विमानतळावरील व्हीआयपी सेवांचा गैरवापर केल्याच्या दाव्यांनंतर वाद निर्माण झाला होता. डीजीपी के रामचंद्र राव यांची सावत्र मुलगी राण्या राव हिने दुबईहून बेंगळुरूला सोने तस्करी करण्यासाठी त्यांच्या संबंधांचा फायदा घेतल्याचा आरोप केला आहे. दुबईहून १४.८ किलो सोने आणल्याच्या आरोपाखाली महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) राण्या राव यांना अटक केली आहे. त्याचबरोबर वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात येणारे व्हीआयपी विशेषाधिकार तिच्या वडिलांनाही देण्यात आल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. ज्यामुळे सत्तेचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राण्या राव यांनी विमानतळावर तपासणी टाळण्यासाठी आणि बेकायदेशीर कृत्ये करण्यासाठी त्यांच्या नावाचा आणि त्यांना देण्यात येणाऱ्या विशेष सेवांचा गैरवापर केला. या प्रकरणात विशेष सुविधा मिळवण्यामागे रामचंद्र राव यांची भूमिका तपासावी, असे आदेश सरकारने दिले आहेत.



### काय झाले होते...

● कन्नड चित्रपट अभिनेत्री राण्या राव हिला सोमवारी (दि. ३) रात्री केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर (केआयए) महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी सोन्याच्या तस्करीच्या आरोपाखाली अटक केली होती. माणिक्य आणि पत्की सारख्या चित्रपटांमध्ये काम करणारी रान्या ही पोलिस महासंचालक (पोलिस गृहनिर्माण महामंडळ) रामचंद्र राव यांची मुलगी आहे. तिच्यावर १४.८ किलो सोने तस्करी केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

# स्थलांतरितांसाठी नवे विधेयक लोकसभेत सादर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी मंगळवारी लोकसभेत इमिग्रेशन आणि फॉरेनर्स बिल २०२५ सादर केले. या कायद्याचा उद्देश भारतातील प्रवास आणि मुक्कामाशी संबंधित नियम स्पष्ट आणि कठोर करणे हा आहे. राष्ट्रीय सुरक्षेला कोणताही धोका वाटत असल्यास, सरकार कोणत्याही परदेशी नागरिकांना भारतात प्रवेश नाकारू शकते. देशाची प्रगती, सार्वभौमत्व आणि शांतता ही सरकारची जबाबदारी आहे, आम्ही कोणाला रोखण्यासाठी हे विधेयक आणत नाही, जास्तीत जास्त लोकांनी यावे, पण त्यांनी आपल्या देशाच्या कायद्याचे पालन केले पाहिजे, असे नित्यानंद राय यांनी स्पष्ट केले.

कोणत्याही परदेशी व्यक्तीला भारतात येण्यासाठी 'वैध पासपोर्ट आणि व्हिसा' असणे बंधनकारक असेल. एखादी व्यक्ती परमिटशिवाय भारतात प्रवेश करत असेल, जास्त काळ बेकायदेशीरपणे राहात असेल किंवा बनावट कागदपत्रे वापरत असेल तर त्याला कठोर शिक्षेला सामोरे जावे लागेल. भारतात येणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला आगमनानंतर नोंदणी करावी लागेल. याशिवाय नाव बदलणे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे आणि संरक्षित भागात फिरणे यावरही निर्बंध घालण्यात येणार आहेत. हा नवीन कायदा भारताची सुरक्षा आणि इमिग्रेशन प्रक्रिया मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे.

नवीन कायद्यानुसार, परदेशी नागरिकांना भारतात प्रवेश आणि वास्तव्य संबंधित नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. कोणताही नियम मोडल्यास त्याला गंभीर शिक्षा भोगावी लागू शकते. वैध पासपोर्ट आणि कागदपत्रांशिवाय भारतात प्रवेश केल्यास – ५ वर्षांपर्यंत कारावास आणि ५ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. बनावट पासपोर्ट किंवा व्हिसा वापरल्यास ७ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ लाख ते १० लाख रुपये दंड होऊ शकतो. व्हिसाची मुदत संपल्यानंतरही राहणे किंवा प्रतिबंधित भागात जाणे यासाठी ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

### हे अधिकार मिळाले

● इमिग्रेशन अधिकाऱ्यांना कोणत्याही संशयित व्यक्तीला वॉरंटशिवाय अटक करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. याशिवाय, कोणत्याही तपास संस्थेला त्याची उपस्थिती आवश्यक असल्यास, भारत सोडण्यास मनाई करण्याचा अधिकार या विधेयकाद्वारे सरकारला असेल.

# धनंजय मुंडेंचा राजीनामा; नाना पटोले आक्रमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचा अर्थसंकल्प सोमवारी अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलाय. यानंतर मंगळवारी यावर चर्चा होत असताना, विरोधकांनी विधान भवनाच्या पायऱ्यावर सरकारच्या विरोधात आंदोलन केलंय. त्यानंतर विधानसभा सभागृहात प्रश्नोत्तराच्या कामकाजात काँग्रेस आमदार नाना पटोले हे धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्यावरून आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिलेला आहे की नाही? कुठल्याही मंत्र्यांचा राजीनामा घेतल्यानंतर किंवा दिल्यानंतर सभागृहात मुख्यमंत्र्यांनी त्यावर भाष्य करणे ही सभागृहांची परंपरा राहिलीय. परंतु धनंजय मुंडेंनी राजीनामा दिलाय की नाही? याबाबत मुख्यमंत्र्यांनी काही सांगितले नाही. अशामुळे सभागृहाची परंपरा मोडीत निघत आहे. महाराष्ट्रात सभागृहाची एक वेगळी परंपरा आहे. सत्ताधारी विरोधकांना चहापानाला बोलवतात. हे बोलवण्याची काय आवश्यकता आहे का? अधिवेशन संपल्यानंतर



सत्ताधारी विरोधकांना भेटतात. पण त्याची काय आवश्यकता आहे का? परंतु परंपरेनुसार ह्या गोष्टी होतात. त्यामुळे मुंढे यांचा राजीनामा दिला आहे की घेतलाय? हे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगण्याची एक परंपरा आहे. परंतु धनंजय मुंडे यांच्या राजीनामाबाबत मुख्यमंत्र्यांनी काही माहिती दिली नाही. म्हणून मुख्यमंत्र्यांनी यावर खुलासा करावा, धनंजय मुंडे यांचा राजीनामा मुख्यमंत्री यांनी नक्की घेतलाय का? ते आता मंत्री आहेत की नाही हे सांगावे? अशी मागणी नाना पटोले यांनी पॉईंट ऑफ व्हूच्या माध्यमातून केली.

नानाभाऊंनी आता धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत प्रश्न उपस्थित केलाय. तर मी सांगू इच्छितो की, ते आता या मंत्रिमंडळाचे मंत्री नाहीत. ते मंत्रिमंडळाचे सदस्य नाहीत, असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत खुलासा केला.

### पक्ष सोडण्यासाठी धंगेकरांवर दबाव

**मुंबई :** अजित पवारांच्या गटात, शिंदे गटात हे जे प्रवेश सुरू आहेत ते सरळसरळ भीतीपोटी झाले आहेत. स्वत: एकनाथ शिंदे आणि त्यांचे लोक यांनी भीतीपोटीच पक्षांतर केले. अजित पवारांनीही किंवा आमच्या पक्षातून जे लोक भाजपमध्ये गेले, त्यांनीही भीतीपोटीच पक्ष सोडला, असा आरोप ठाकरे गटाचे राऊत यांनी केला. दरम्यान, रवींद्र धंगेकर हे सुरुवातीला शिवसेनेमध्ये होते, नंतर ते मनसेत गेले, पुढे काँग्रेसमध्ये गेले आणि काल त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला.

## पान १ वरून

### डी पी यु मेडिकलवर आयोगाचे ताशेरे

वैद्यकीय शिक्षण प्रशासनातील समस्या डीवाय पाटील महाविद्यालयामुळे ऐरणीवर आल्याचे मानले जाते. संस्थात्मक उत्तरदायित्व, विद्यावेतन अनुपालन तसेच प्रशिक्षण मानके यांची जबाबदारी निश्चित करण्याची गरज यातून अधोरेखित झाली आहे. महाविद्यालय प्रशासन काय उत्तर देते, याकडे पुण्यातील वैद्यकीय शिक्षण जगताचे लक्ष लागले आहे. आरोपांचे समाधानकारक निराकरण न केल्यास, तसेच उत्तर न दिल्यास, महाविद्यालयाच्या मान्यतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो, तसेच त्याला मोठा आर्थिक दंड आकारला जाऊ शकतो, अशी शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

### पाकमध्ये पॅसेंजर हायजॅक; १२० ओलीस

लष्कराच्या ५ जवानांनाही ठार केले आहे.पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्सनुसार, बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) ने पाकिस्तानच्या बोलानमध्ये जफर एक्स्प्रेस हायजॅक करून १२० प्रवाशांना ओलीस ठेवल्याची आणि लष्कराच्या सहा जवानांची हत्या करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. दहशतवादी गटाने असा इशारा दिला आहे की त्यांच्या विरोधात कोणतीही लष्करी कारवाई केल्यास सर्व ओलिसांना ठार केले जाईल.

### भोंग्यांवर कारवाई

भोंगे लावण्याआधी परवानगी घेतली पाहिजे. रात्री १० वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत भोंगे बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० वाजण्याच्या कालावधीत दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४४ डेसिबलची आवाज मर्यादा असली पाहिजे. कायद्यानुसार अधिक डेसिबलने भोंगे वाजत असतील तर त्यावर कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केंद्रीय कायद्याने दिले आहेत. पोलिसांनी याची दखल घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवायचे आहे, अशी सध्या कायद्याची तरतूद आहे. मात्र याचा अवलंब सध्या होताना दिसत नाही.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यापुढे कुणालाही सरसकट भोंग्यांची परवानगी देण्यात येणार नाही. निश्चित कालावधीकरताच भोंगे लावता येतील. त्यानंतर पुन्हा भोंगे लावायचे असल्यास संबंधितांनी पुन्हा पोलिसांकडून परवानगी घ्यावी. ज्याठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल, त्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही. तसेच भोंग्यांची जप्ती केली जाईल. तसेच या नियमांचे तंतोतंत पालन होत आहे की नाही? हे पाहण्याची जबाबदारी पोलिस निरीक्षकांची असेल. पोलिस निरीक्षकांनी याचे तंतोतंत पालन केले नाही, तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्री तथा गृहमंत्री फडणवीस यांनी लक्षवेधीचे उत्तर देताना स्पष्ट केले.

### ...परत आल्याचा आनंद

तरी भाजपाच्या लोकांनी त्या कामात अडथळा निर्माण केला. वक्फ बोर्डाची जागा असेल तर मुस्लिम बांधवांनी आक्षेप घेतला पाहिजे. पण भाजपाचे लोक आक्षेप घेत आहेत. यातून मला अडकविण्याचे त्यांचे धोरण असल्याचे दिसून येते.
ती जागा वक्फ बोर्डाची असल्याचे सांगून माझ्या पत्नीला अटक करण्याचा प्रयत्न झाला. मला त्रास दिला गेला असला, तरी पक्ष बदलण्याचे कारण हे नाही, वेगळेच आहे. मी कुणाच्याही दबावाला बळी पडणारा नाही. मी विकास कामांसाठी शिंदे गटात प्रवेश केला, असे धंगेकर यांनी स्पष्ट केले

### गौरव आहुजासह मित्राचा पोलीसांनी उतरवला माज

उतरवला आहे. तीन दिवसांपूर्वी बड्या बापाचा मुलगा गौरव अहुजा याने शास्त्रीनगर परिसरात सिग्नलवर आपली अलिशान बीएमडब्लू कार लावली होती. कार थांबवून तो रस्त्यातच लघुशंका करण्यासाठी उभा राहिला. यावेळी रस्त्यावरून जाणाऱ्या एका व्यक्तीने अहुजाचा हा कांड आपल्या फोनमध्ये कैद केला.
यावेळी माजोरड्या गौरवने कॅमेऱ्याकडे पाहून अश्लील कृत्य केलं. त्याने ऑन कॅमेरा आपलं गुप्तांग दाखवत घटनास्थळावरून पळ काढला. या घटनंतर दुसऱ्या दिवशी गौरव अहुजाने एक व्हिडीओ जारी करत पुणेकरांची माफी मागितली. तसेच एक संधी द्यावी अशी विनंती केली. यानंतर त्याने कराड पोलिसांकडे स्वत:ला सरेंडर केलं. यानंतर कराड पोलिसांनी गौरव अहुजाला पुणे पोलिसांच्या ताब्यात दिलं.
गौरव आहुजाने पळून गेल्यावर आपल्या कारची नंबरप्लेट काढून टाकली होती. शिवाय पोलिसांना गौरवच्या कारमध्ये दारुची बाटली आणि ग्लास आढळले. या प्रकरणी पोलिसांनी गौरव आणि त्याचा मित्र भाग्येशला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने दोघांनाही एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. ही कोठडी संपल्यानंतर पोलिसांनी दोघांनाही पुन्हा न्यायालयात हजर केलं, यावेळी पुणे सत्र न्यायालयाने गौरव आहुजाला एक दिवसाची पोलीस कोठडी तर भाग्येश ओसवाल याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

### ...भारत म्हणा

शिक्षण आणि उद्योग सर्व नष्ट झाले, असेही ते म्हणाले. दत्तात्रेय होसबळे यांनी संविधांविषयी बोलताना, भारताच्या संविधानाबाबत अनेक दिशाभूल करणाऱ्या गोष्टी पसरवल्या गेल्या आहेत. असे म्हटले जाते की, भारत हा फक्त शेतीप्रधान देश आहे, याठिकाणी दुसरा कोणताही उद्योग नाही, परंतु हे पूर्णपणे चुकीचे आहे. १६०० च्या सुमारास, जागतिक व्यापारात भारताचा वाटा २३ टक्के होता, जो केवळ शेतीचा नव्हता. प्राचीन काळी आपण कोणत्याही क्षेत्रात कोणापेक्षा कमी नव्हतो, परंतु बाह्य आक्रमकांनी आपल्या देशाला दडपले, अशी माहिती त्यांनी दिली.

### माधव भंडारी विधानपरिषदेवर?

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये या जागांसाठी जोरदार लॉबिंग सुरू असून २७ मार्चला या पाच जागांसाठी मतदान होणार आहे. विधानसभेतील सध्याचे संख्याबळ पाहाता भाजपाचे तीन, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एक आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचा एक आमदार निवडून येऊ शकतो. याच पक्षाच्या जागा सध्या रिक्त झाल्या आहेत. आता, उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाल्याने राजकीय पक्षांकडून उमेदवारांच्या नावासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामध्ये भाजपकडून तीन नावे दिल्लीला पाठविण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत विधानपरिषदेवर असलेले भाजपचे आमदार, प्रवीण दटके, गोपीचंद पडळकर आणि रमेश कराड यांच्यासह शिवसेनेकडून आमशा पाडवी आणि अजित पवार गटाकडून राजेश विटेकर यांच्या जागा रिक्त झाल्या आहेत. माधव भंडारी हे भाजपाचे ज्येष्ठ नौते असून त्यांनी दीर्घकाळ पक्षाचे प्रवक्ते म्हणून काम केले आहे. ते अनेक वर्षांपासून विधानपरिषदेच्या आमदारकीसाठी इच्छूक होते. पण, त्यांना आजवर नेहमीच आमदारकीने हुलकावणी दिली आहे. आता यंदा त्यांच्या नावाचा पक्षाने समावेश केला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### राष्ट्रवादीकडून या नावाची चर्चा?

राष्ट्रवादीकडून पक्षात सध्या झिशान सिद्दकी, आनंद परांजपे, सुरेश बिराजदार, संजय दौंड आणि सुबोध मोहिते इच्छुक आहेत. मात्र, एकच जागा राष्ट्रवादीची असल्याने कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


**नमुना 'ग'**
**[ कलम १४ आणि नियम १६ (३)पहा ]**
**संस्थांचे एकत्रीकरण/त्यांची मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण / संस्थांचे रूपांतर/त्यांची विभागणी बामुळे ज्यांच्या हितसंबंधांना बाध येईल अशा सदस्यांना, धनकोंना व इतर व्यक्तींना द्यावयाची नोटीस**

दिनांक. २३-११-१९८१ PNA/ Pune City/ HSG/ ११७११ अन्वये नोंदण्यात आलेली आणि (६४२/८,६४२/९) या ठिकाणी जिचे नोंदणी केलेले कार्यालय आहे ओमनवनाथ संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, याच्या कलम १७, पोटकलम (जे) च्या परंतुकाची खंड (ओ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे,सर्व सदस्य/धनको/आणि हितसंबंध असलेल्या व्यक्ती यांस नोटीस देण्यात येते रोजी की, निबंधकाची संमती मिळविल्यानंतर आणि संस्थेच्या. १/९/२०२४ रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत तशा अर्थाचा प्रारंभिक, ठराव मंजूर करण्यात आल्यानंतर संस्थेने ओमनवनाथ संस्थेशी एकत्रीकरण करण्याचे, तिचे भाग्यनगरी फेज २ संस्थेत रूपांतर करण्याचे, तिची (१) ओमनवनाथ (२) भाग्यनगरी फेज २ या संस्थांत विभागणी करण्याचे, आपली मालमत्ता व जबाबदाऱ्या संस्थेकडे हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे. जिचे एकत्रीकरण, हस्तांतरण, रूपांतर किंवा विभागणी करावयाची त्या संस्थेच्या जबाबदाऱ्यांच्या हस्तांतरणासंबंधीचा तपशील पुढील अनुसूचीत दिला आहे :-
१. एकत्रीकरण करणाऱ्या मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण करणाऱ्या लागू असतील :-
किंवा रुपांतर करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत पुढील गोष्टी
(१) संस्थेचे नाव किंवा संस्थांची नावे;
(२) संस्थेची मालमत्ता व जबाबदाऱ्या दर्शविणारे पत्रक (सोबत जोडावयाचे);
(३) सदस्य व धनको यांची नावे.
वि. सू. - एकत्रीकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण किंवा रूपांतर यामुळे ज्या संस्थेवर परिणाम झालाआहे अशा प्रत्येक संस्थेसंबंधीची माहिती स्वतंत्रपणे देण्यात येईल.
२. ज्यांची विभागणी करावयाची त्या संस्थांस पुढील गोष्टी लागू असतील
संस्थेचा........(१) तपशील
(१) संस्थेचे नाव;
(२) विद्यमान कार्यक्षेत्र;
(३) मालमत्ता व जबाबदाऱ्या दर्शविणारे पत्रक (सोबत जोडावयाचे);
(४) सदस्यांची नावे;
(५) धनकोंची नावे.
३. ज्यांची विभागणी होईल त्या संस्थांना पुढील गोष्टी लागू असतील:-
(१) ....... संस्थेचा तपशील.
(एक) विभागणीनंतर संस्थेकडे शिल्लक राहिलेली मालमत्ता व जबाबदाऱ्या
(पत्रक सोबत जोडण्यात येईल).
(दोन) नियोजित कार्यक्षेत्र.
(तीन) संस्थेच्या उरलेल्या सदस्यांची नावे.
(चार) संस्थेच्या उरलेल्या धनकोंची नावे.
(२ ) )....... संस्थेचा तपशील.
(एक) विभागणीनंतर संस्थेकडे शिल्लक राहिलेली मालमत्ता व जबाबदाऱ्या.
(पत्रक सोबत जोडण्यात येईल).
(दोन) नियोजित कार्यक्षेत्र.
(तीन) संस्थेच्या उरलेल्या सदस्यांची नावे.
(चार) संस्थेच्या उरलेल्या धनकोंची नावे.
नियोजित एकत्रीकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण, विभागणी किंवा रूपांतर यामुळे जिच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, या नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत,संस्थेच्या कार्यालयाकडे आपल्या कोणत्याही हरकती असल्यास, त्या पाठविण्याचा, आणि नवीन संस्थांपैकी कोणत्याही संस्थेचा सदस्य होण्यासंबंधी निवड करण्याचा आपला अधिकार कळविण्याचा, एकत्रीकरण केलेल्या
किंवा रूपांतर केलेल्या संस्थेतील आपले सदस्यत्व चालू ठेवण्याचा/ आपल्या शेअरची, हितसंबंधाची किंवा येणे असलेल्या रकमेची मागणी करण्याचा अधिकार आहे.
२. एक महिन्याच्या आत निवड करण्यासंबंधीचा कोणताही अधिकार चालविण्यात आला नाही आणि कोणतीही हरकत आली नाही तर, हितसंबंधी व्यक्तीची त्या निर्णयास मान्यता आहे असे समजण्यात येईल.

ठिकाण : पुणे
दिनांक: ११/३/२०२५

मंडळ सचिव/ ऑनररी सचिव/
मुख्य कार्यकारी संचालक,
सह. संस्था, मर्या. मंडळाच्या
व्यवस्थापन समितीच्या आदेशावरून



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १५/२०२५/५३५४

**अर्जदार**
नियो. श्री समर्थ रेसिडेन्सी फेज ४ सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः-स.नं.१५६,हिस्सा नं. ४बी / १, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे- ४११०३१.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री.बाळु दिनकर पाटील
**जाब देणार**
**विरुध्द**
१. मे. परिमल ग्रुप डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर,
श्री. राजेश तुळशीराम चौधरी.
रा.फ्लॅट नं.१०१/१०२,अश्विनी पॅलेस, वानवडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४०.
२.उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर (६), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. श्री समर्थ रेसिडेन्सी फेज ४ सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः- स.नं. १५६, हिस्सा नं. ४ बी / १, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०३१ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १५/२०२५ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २७/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. आदिती कुलकर्णी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. २५/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: २८/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १५२/२०२४/५३५०

**अर्जदार**
नियो. सैनिक रेसिडेन्सी फेज-१ सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः- स.नं. १४८, हिस्सा नं. १/१/११८, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०१६.
तर्फे मुख्य प्रवर्तक, श्री. विजय एकनाथ वाघमोडे
**जाब देणार**
**विरुध्द**
१. श्री. किशोर विश्वास पाटील.
रा.फ्लॅट नं.१२,अमरनाथ अपार्टमेंट (अ) कॉलनी नं. ०३, गणेशनगर,
बोपखेल, ता. हवेली, जि.पुणे- ४११ ०१६.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (६), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. सैनिक रेसिडेन्सी फेज - १ सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः- स.नं. १४८, हिस्सा नं. १/१/११८, बोपखेल, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१६ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १५३/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २५/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. १९/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २८/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र. १५२/२०२४/५३५२

**अर्जदार**
नियो. त्रिमुर्ती अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः-स.नं.२५,हिस्सा नं. २/१/१२, कळस, ता. हवेली, जि. पुणे - ४१३१०५.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, श्री. भीमराव नारायण जंजाळ
**जाब देणार**
**विरुध्द**
१. श्री. भागवत केरबा शिंदे.
रा. मधुबन सोसायटी, गल्ली नं. ०३, जुनी सांगवी, पुणे-४११०२७.
२. श्री. जयराम सर्जेराव मोरे.
रा. प्रिन्स पॅलेस बिल्डींग, नंदनवन कॉलनी, नवी सांगवी, पुणे- ४११ ०२७. ३.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. त्रिमुर्ती अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः- स.नं. २५, हिस्सा नं. २/१/१२, कळस, ता. हवेली, जि. पुणे - ४१३ १०५ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १५३/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २५/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ व २ गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. १९/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २८/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १०(१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.१४७/२०२४/५२७३

**अर्जदार**
नियो.सिध्दी अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः-स.नं.५२/३/१(पैकी), मौजे वडगांव शेरी, ता. हवेली, जि.पुणे-४११ ०१४.
तर्फे,
मुख्य प्रवर्तक, सौ. योजना अनंत मंकणी
**जाब देणार**
**विरुध्द**
१.मे. भुजबळ – करपे असोसिएटस् तर्फे भागीदार,
ए.श्री.महेश संभाजीराव करपे.
ब. श्री. रविंद्र ज्ञानेश्वर भुजबळ.
रा.श्रीरामकुंज,चंदननगर, खराडी, पुणे- ४११ ०१४.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. सिध्दी अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः- स.नं. ५२/३/१(पैकी), मौजे वडगांव शेरी, ता. हवेली, जि. पुणे- ४११०१४ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र. १४७/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. आदिती कुलकर्णी हजर. जाब देणार क्र. १अ व ब गैरहजर. सबब जाब देणार क्र. १अ व ब यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.१८/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र.१अ व व यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
पुणे, दिनांक: २५/०२/२०२५

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



## लव्ह जिहादमुळे ख्रिश्चन मुली हरवल्या

**नवी दिल्ली :** द्वेषपूर्ण भाषणाच्या प्रकरणात जामिनावर बाहेर असलेले भाजप नेते पीसी जॉर्ज यांनी लव्ह जिहादमुळे ख्रिश्चनांच्या ४०० मुली बेपत्ता झाल्याचे वादग्रस्त विधान केले आहे. एवढेच नाही तर त्यांनी ख्रिश्चनांनी त्यांच्या मुलींचे वय २४ होण्यापूर्वीच लग्न द्यावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. एकट्या मीनाचिल तालुक्यात 'लव्ह जिहाद'मुळे ४०० मुली हरवल्याचा दावा त्यांनी केला आहे. केरळमधील भाजपाचे नेते आणि पुंजर विधानसभेचे माजी आमदार पीसी जॉर्ज यांनी पुन्हा एकदा लव्ह जिहादचा मुद्दा मांडला आहे. रविवारी एका कार्यक्रमात बोलत असताना पीसी जॉर्ज म्हणाले की, लव्ह जिहादमुळे एकट्या मीनाचिल तालुक्यातून ४०० मुली हरवल्या आहेत. त्यापैकी केवळ ४१ मुलींना परत आणण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले.

## तुमच्या बापाचे राज्य नाही

**नवी दिल्ली :** बिहारमधील भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) आमदाराने मुस्लिमांना यावेळी होळीच्या दिवशी घरातच राहण्याचे आणि हिंदूंना त्यांचा सण कोणत्याही अडथळ्याशिवाय साजरा करण्याची परवानगी देण्याचे आवाहन केले होते. त्यावरून राज्यात नवा वाद निर्माण झाला आहे. यावरून विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी भाजप आमदाराला थेट इशाराच दिला आहे. भाजप आमदार हरिभूषण ठाकूर यांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना तेजस्वी यादव यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांना आमदाराला ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची मागणी केली. तेजस्वी यादव यांनी, हे तुमच्या बापाचे राज्य नाही. जातीय तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल करायला हवा, असे त्यांनी म्हटले.



## पोलीस चकमकीत गँगस्टर ठार

**नवी दिल्ली :** झारखंडमधील कुख्यात गँगस्टर अमन साव पोलीस चकमकीत ठार झाला आहे. खून प्रकरणात अटकेत असलेल्या अमनला पोलीस रायपूरहून रांचीला आणत असताना पलामू जिल्ह्यात चकमक झाल्याचे वृत्त आहे. झारखंडमधील कुख्यात गँगस्टर अशी अमन सावची ओळख होती. रांचीतील बरियातू येथे कोळसा व्यावसायिकावर झालेल्या हल्ला प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली होती. गेल्या तीन महिन्यांपासून तो रायपूर तुरुंगात होता. हजारीबागमधील 'एनटीपीसी'च्या डीजीएमच्या हत्येप्रकरणी चौकशीसाठी अमन साहू याला रांची येथे आणले जात होते. चैनपूर आणि रामगड पोलिस ठाण्यादरम्यान असलेल्या अंधारी धोधा येथे अमन साव टोळीतील गुंडांनी पोलिसांच्या वाहनावर हल्ला केला. यादरम्यान पोलिसांच्या गाडीला अपघात झाला. अपघातानंतर अमनने पोलिसांचे शस्त्र हिसकावून घेतले. तो पळून जाऊ लागला. पोलिसांनी रोखण्याचा प्रयत्न करताच त्याने गोळीबार सुरू केला. पोलिस पथकानेही दिलेल्या प्रत्युत्तरात अमन जागीच ठार झाला.




## टेम्पो ट्रॅव्हलरचा भीषण अपघात

**नवी दिल्ली :** जम्मूहून सांगलीकोटला जाणाऱ्या एका टेम्पो ट्रॅव्हलरचा रियासी जिल्ह्यातील माहोर येथे अपघात झाला. त्यात ३ जणांचा मृत्यू झाला, तर १० जण जखमी झाले. गंभीर जखमी झालेल्या ४ जणांना उपचारासाठी जम्मूच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात (जीएमसी) पाठविण्यात आले आहे. स्थानिक अधिकारी, बचाव पथकांसह तात्काळ घटनास्थळी पोहोचले असून मदत कार्य सुरू केले आहे. अपघाताचे कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे, असे रियासीचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक परमवीर सिंह यांनी सांगितले.

## बेकायदेशीर प्रवेश करणाऱ्या बांगलादेशी तरुणाला अटक

**महाराजगंज (उत्तर प्रदेश) :** प्रवासाच्या कागदपत्रांशिवाय भारतात घुसण्याचा प्रयत्न करणाऱ्या ३५ वर्षीय बांगलादेशी नागरिकाला उत्तर प्रदेशच्या नेपाळसीमेवरून अटक करण्यात आली आहे. सैफुल इस्लामला सशस्त्र सीमा दलाने (एसएसबी) सोमवारी संध्याकाळी महाराजगंज जिल्ह्यातील निचलौल भागात अटक केली. अधिकाऱ्यांकडे व्हिसा आणि पासपोर्ट सापडला नाही, असे सर्कल ऑफिसर (निचलौल) अनुज कुमार सिंह यांनी सांगितले, कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली असून बांगलादेशी नागरिकाची चौकशी केली जात आहे.

# ट्रम्प यांचा दावा भारताने फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अतिरंजित दावे करण्यासाठी ओळखले जातात. नुकत्याच व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी युक्रेनला युरोपकडून मिळणाऱ्या निधीबाबत दावा केला होता, जो फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी त्याच वेळी फेटाळून लावला होता. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प गप्प होते. आता अशीच संधी भारताला मिळाली आहे. अमेरिकी उत्पादनांच्या आयातीवरील कर कमी केला जाईल, असे आश्वासन भारताकडून मिळाल्याचा दावा त्यांनी केला. आता त्यांचा हा दावा भारताने फेटाळून लावला आहे. वाणिज्य सचिव सुनील बर्थवाल यांनी संसदीय समितीला सांगितले की, अमेरिकेला असे कोणतेही आश्वासन भारतातर्फे देण्यात आलेले नाही.

ते म्हणाले की, भारताने अमेरिकेला शुल्क कपातीसारखे कोणतेही आश्वासन दिलेले नाही. परराष्ट्र विषयक संसदेच्या स्थायी समितीला माहिती देताना वाणिज्य सचिव म्हणाले की, भारत आणि अमेरिका यांच्यात अजूनही चर्चा सुरू आहे. सध्या कोणताही व्यापार करार अंतिम झालेला नाही. संसदीय समितीतील अनेक सदस्यांनी अमेरिकी राष्ट्राध्यक्षांच्या दाव्यावर चिंता व्यक्त केली होती. त्यावर बार्थ म्हणाले, 'अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे दावे आणि प्रसारमाध्यमांच्या बातम्यांच्या आधारे काहीही सांगता येणार नाही. सध्या व्यापार करारासंदर्भात दोन्ही देशांमध्ये वाटाघाटी सुरू आहेत. भारताने अद्याप अमेरिकेबरोबरच्या व्यापार शुल्कात कपात करण्याचे कोणतेही आश्वासन दिलेले नाही.'

अमेरिकेशी करार करून भारताचे हित जपले जाईल, असेही वाणिज्य सचिवांनी सांगितले. ते म्हणाले की, भारत मुक्त व्यापाराच्या बाजूने उभा आहे आणि उदारमतवादाचे धोरण स्वीकारतो. दोन्ही देशांमधील व्यापार वाढविण्याचा आमचा प्रयत्न आहे. भारतीय अधिकारी म्हणाले की, आम्ही मुक्त व्यापाराबद्दल बोलतो, परंतु हे देखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे की व्यापार युद्धामुळे कोणाच्याही हिताचे रक्षण होणार नाही. यामुळे निश्चितच मंदी येऊ शकते. भारत मनमानी पद्धतीने शुल्ककपात करणार नाही, असे बर्थवाल यांनी संसदीय समितीला सांगितले. विशेषत: देशांतर्गत अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उद्योगांमध्ये. शुल्क कमी करण्यासाठी भारत द्विपक्षीय वाटाघाटींना प्राधान्य देतो आणि राष्ट्रीय हितांशी तडजोड होणार नाही याची ही काळजी घेतो.


### कॅनडाबरोबर तुलना नको

● भारताची कॅनडा आणि मेक्सिकोशी तुलना ही त्यांनी फेटाळून लावली. कॅनडा आणि मेक्सिकोसोबत अमेरिकेचेही अवैध स्थलांतर, घुसखोरी आणि सुरक्षेच्या मुद्द्यावर मतभेद आहेत. पण भारताची परिस्थिती वेगळी आहे. दोघांच्याही फायद्याचा असा करार आम्ही अमेरिकेसोबत करणार आहोत. डोनाल्ड ट्रम्प सातत्याने इतर देशांतून येणाऱ्या वस्तूंवरील शुल्कवाढीची घोषणा करत आहेत. याचा फटका जगभरातील बाजारपेठांना बसत आहे. जगभरातील शेअर मार्केटमध्ये सातत्याने विक्री सुरू आहे. भारताने अमेरिकेबरोबरच्या करारासाठी सप्टेंबर २०२५ पर्यंतची मुदत मागितली आहे.

# सॅम पित्रोदांच्या अडचणींत वाढ

## जमिन घोटाळ्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल

या घोटाळ्यासंदर्भात २४ फेब्रुवारी रोजी लोकायुक्त आणि सक्तवसुली संचालनालयाकडे कागदपत्रांसह तक्रारी सादर करण्यात आल्या होत्या. आता भूसंपादन प्रतिबंधक विशेष न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे. ते ओव्हरसीज काँग्रेस युनिटचे माजी अध्यक्षही होते



### राजकीय फटका बसणार?

● हे प्रकरण राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांचे निकटवर्तीय पित्रोदा यांच्याशी संबंधित आहे, ज्याचे राजकीय परिणाम होऊ शकतात. फाऊंडेशन फॉर द रिव्हायव्हल ऑफ लोकल हेल्थ ट्रॅडिशन्स (एफआरएचटी) ही संस्था १९९६ मध्ये मुंबईत नोंदणीकृत झाली. हे प्रकरण राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्या निकटवर्तीयाशी संबंधित असल्याने राजकीय चिंता वाढली आहे.




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचे निकटवर्तीय सॅम पित्रोदा आणि इतरांविरोधात कर्नाटक भूसंपादन प्रतिबंधक कायदा २०११ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काँग्रेसचे माजी नेते आणि लाचलुचपत प्रतिबंधक मंचाचे अध्यक्ष एन. आर. रमेश यांनी सोमवारी भूसंपादनाविरोधात विशेष न्यायालयात खटला दाखल केला.

बेंगळुरूमध्ये १२.३५ एकर राखीव वनजमिनीवर बेकायदा कब्जा केल्याचा आरोप आहे. येलहंका येथील जारकाबांडे कवाल येथील जमिनीचे सरकारी मूल्य १५० कोटीरुपयांहून अधिक असून त्याचे बाजारमूल्य ३०० कोटी रुपयांहून अधिक असल्याचा आरोप रमेश यांनी तक्रारीत केला आहे. भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतरही आरोपींनी २०११ पासून बेकायदेशीररित्या या जागेवर कब्जा सुरूच ठेवल्याचा दावाही त्यांनी केला.

दुर्मिळ औषधी वनस्पतींची लागवड व विक्री करून आरोपी वर्षाला पाच ते सहा कोटी रुपये कमवत होते, असा आरोप रमेश यांनी केला. सॅम पित्रोदा आणि इतरांविरोधात कर्नाटक जमीन हडप प्रतिबंधक कायदा २०११ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवृत्त आयएएस अधिकारी जावेद अख्तर, कर्नाटकच्या वन आणि पर्यावरण विभागाचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव, आरके सिंह, संजय मोहन, एन रवींद्र कुमार आणि एसएस रविशंकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी देखील या प्रकरणात आरोपी आहेत.

या घोटाळ्यासंदर्भात २४ फेब्रुवारी रोजी लोकायुक्त आणि सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) कागदपत्रांसह तक्रारी सादर करण्यात आल्या होत्या. आता भूसंपादन प्रतिबंधक विशेष न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे. राजीव गांधी आणि मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात त्यांनी दूरसंचार विभागाचे सल्लागार म्हणून काम पाहिले. ते ओव्हरसीज काँग्रेस युनिटचे माजी अध्यक्षही होते.

# लासलगावला कांदा लिलाव सुरू



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये काल कांद्याच्या दरात घसरण झाल्याने संतप्त शेतक-यांनी पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन करत केंद्र व राज्य सरकारचा निषेध केला होता. यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व माजी मंत्री छगन भुजबळ यांनी फोनद्वारे शेतक-यांशी संवाद साधून विधानसभेत कांद्याबाबत प्रश्न मांडू असे सांगितल्यानंतर शेतक-यांनी आंदोलन मागे घेतले होते. आज कांदा लिलाव पूर्ववत सुरू झाला आहे.

लासलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतक-यांनी केलेल्या आंदोलनानंतर आज लिलाव पूर्ववत सुरू झाले आहेत. मात्र कालपेक्षा आज क्विंटलमागे २०० रुपये भावात घसरण झाली असून आज कमीत कमी ११०० आणि जास्तीत जास्त १७०० तर सरासरी १४०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. त्यामुळे उत्पादन खर्च देखील निघत नसल्याने शेतक-यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच कांद्याला २५ रुपये प्रति किलो हमीभाव द्यावा आणि कांद्यावर लागू केलेले २० टक्के निर्यात शुल्क तात्काळ रद्द करावे, अशी मागणी शेतक-यांची आहे.

३००० रुपये क्विंटल हमी भाव पाहिजे

आम्हाला क्विंटलमागे सरासरी दोन हजार रुपये खर्च येतोय, आमची गेल्या अनेक दिवसांपासूनची मागणी आहे की, आम्हाला तीन हजार क्विंटल रुपये हमीभाव मिळाला पाहिजे. तसेच सध्या सरकारने लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तातडीने रद्द करावे जेणे करून मोठ्या प्रमाणात कांदा निर्यात होऊन कांद्याचे भाव स्थिर होण्यास मदत मिळेल, असे महाराष्ट्र कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी म्हटले आहे.

# एकनाथ शिंदे यांच्यावर अन्याय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला असून, त्यानंतर महायुतीतील निधीवाटपाचे समीकरण चर्चेत आले आहे. भाजप आणि राष्ट्रवादी यांना तुलनेने अधिक निधी मिळाल्याचे दिसत असले तरी, शिवसेनेला कमी वाटप झाल्याने नाराजीचे सूर उमटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या वर्षी नगरविकास विभागाला ६८,६०१.२० कोटी रुपये मिळाले होते, मात्र यंदा हा निधी तब्बल १०,३७९.७३ कोटी रुपयांनी घटवण्यात आला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात नाराजीचा सूर उमटण्याची शक्यता आहे.

सरकार स्थापन झाल्यापासून तिन्ही पक्षांमध्ये मतभेद असल्याच्या चर्चा सतत रंगत होत्या. आता अर्थसंकल्पीय वाटपातही भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनी शिंदे गटावर वर्चस्व गाजवल्याचे बोलले जात आहे. नगरविकास खात्यातील तब्बल १० हजार कोटींची कपात झाल्याने शिंदे गट पुन्हा नाराज होईल, असे राजकीय वर्तुळात म्हटले जात आहे. या अर्थसंकल्पात भाजपच्या मंत्र्यांना १ लाख कोटींचा निधी तर शिवसेनेच्या मंत्र्यांना ८७ हजार कोटींचा निधी मिळाला आहे.



**रंगोत्सव** उत्तर प्रदेशामधील नांदगाव गावात एका मंदिरात होळी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.

# सर्वाधिक वायू प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे भारतात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वायू प्रदूषण हे जगातील अनेक देशांसमोरील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक आहे. भारतही या समस्येशी मुकाबला करत असतानाच आता भारतीयांची आणखी चिंता वाढवणारी माहती स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी 'आयक्यूएअर'ने जारी केलेल्या वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्टमधून समोर आली आहे. कारण जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे भारतातील आहेत. विशेष म्हणजे आसाममधील बर्निहाट हे शहर भारतातील सर्वाधिक वायू प्रदूषत शहरांपैकी एक ठरले आहे.

स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी 'आयक्यूएअर'ने जारी केलेल्या वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्ट २०२४ मध्ये असे म्हटले आहे की, "भारतातील दिल्ली ही जागतिक स्तरावर सर्वात वायू प्रदूषित राजधानी ठरली आहे. जगातील चौथ्या क्रमाकांचे वायू प्रदूषित शहरही ठरले आहे. २०२४ मध्ये भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वात वायू प्रदूषित देश बनेल होते. तर २०२३ मध्ये ते तिसऱ्या स्थानावर होते." अहवालानुसार,जगातील सर्वात प्रदूषित १० शहरांपैकी ६ शहरे भारतात आहेत. दिल्लीमध्ये प्रदूषणाची उच्च पातळी नोंदवली जात आहे, वार्षिक सरासरी पीएम २.५ एकाग्रता प्रति घनमीटर ९१.६ मायक्रोग्राम ओ, जी २०२३ मध्ये प्रति घनमीटर ९२.७ मायक्रोग्राम होती, जी जवळजवळ बदललेली नाही.

भारतात वायू प्रदूषण हा एक गंभीर आरोग्य धोका आहे, ज्यामुळे आयुर्मान अंदाजे ५.२ वर्षांनी कमी होते. गेल्या वर्षी प्रकाशित झालेल्या लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ अभ्यासानुसार, २००९ ते २०१९ पर्यंत, भारतात दरवर्षी प्रदूषणामुळे सुमारे १५ लाख मृत्यू झाले.

२.५ मायक्रॉनपेक्षा लहान वायू प्रदूषणाचे कण फुफ्फुसांमध्ये आणि रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात. यामुळे श्वसनविकार, हृदयरोग आणि अगदी कर्करोग देखील होऊ शकतात. वाहनांचा धूर, औद्योगिक उत्सर्जन आणि लाकूड किंवा पिकांचा कचरा जाळल्यामुळे देखील हे होऊ शकते.

**१३ सर्वात वायू प्रदूषित शहरे**

जगातील सर्वाधिक वायू प्रदूषित २० शहरांपैकी १३ शहरे भारतातील आहेत. त्यामध्ये बर्निहाट, दिल्ली, मुल्लानपूर (पंजाब), फरीदाबाद, लोणी, नवी दिल्ली, गुडगाव, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवाडी, मुझफ्फरनगर, हनुमानगड आणि नोएडा यांचा समावेश आहे. एकूणच, ३५ टक्के भारतीय शहरांमध्ये वार्षिक पीएम २.५ पातळी जागतिक आरोग्य संघटनेच्या ५ मायक्रोग्राम प्रति घनमीटर मर्यादेपेक्षा १० पट जास्त आहे.

# विद्युत तारा वाहनांसाठी धोकादायक

## अवसरी बुद्रुक ते टाव्हरेवाडी रस्त्यावर अपघाताची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** अवसरी बुद्रुक ते टाव्हरेवाडी (ता. आंबेगाव ) रस्त्यावर विद्युत वितरण कंपनीच्या खाली आलेल्या विद्युत तारा ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रकला अडथळा ठरत आहे. मोठ्या वाहनांसाठी धोकादायक असलेल्या या विद्युत तारांची उंची महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी वाढवावी, अशी मागणी वाहन चालक गेली चार महिन्यापासून करत आहेत. मात्र, महावितरणचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असून, आमचे ट्रक पेटल्यानंतर महावितरणला जाग येणार का? असा संतप्त सवाल वाहक चालक करत आहेत.

आंबेगाव तालुक्याची बागायती तालुका म्हणून ओळख असून, तालुक्यात साखर कारखाना असल्याने अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणात उसाचे उत्पादन घेत असतात. तालुक्यातील ऊस भीमाशंकर सहकारी साखर कारखाना, विघ्नहर सहकारी साखर कारखाना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जातो. त्यामुळे उसाच्या ट्रकची मंचर-अवसरी-पारगाव रस्त्याने नेहमी ये-जा असते.

याच रस्त्यावर अवसरी बुद्रुक गावच्या हद्दीत नुकतेच रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात आल्याने रस्त्याची उंची वाढली आहे. त्यामुळे रस्ता ओलांडून विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत तारा ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रकला लागत आहेत. उसाचा ट्रक घेऊन जाताना ट्रक चालकाला व शेतकऱ्याला सदर तारा काठीच्या सहाय्याने वर उचलून धरावे लागतात. मग रस्त्यावरून ट्रक घ्यावा लागतो, अशी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे ट्रक चालक व शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

बाहेर गावचा ट्रक आल्यास किंवा ज्या ट्रक चालकाला विद्युत तारांबाबत माहिती नाही, अशा ट्रकमधील ऊसात तारा अडकून अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच ऊस व ट्रक पेटण्याची सुद्धा शक्यता आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने सदर तारा लवकरात लवकर वर घ्याव्यात, अशी मागणी होत आहे. याबाबत अवसरी खुर्द येथील महावितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, संबंधित ठेकेदाराला देण्यात आलेले काम त्याने केले नाही, त्यामुळे दुसरा ठेकेदार देऊन दोन दिवसात काम पूर्ण करण्यात येईल असे त्याने सांगितले.



### ठेकेदार जुमानत नाहीत

● आंबेगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्त विद्युत वितरण कंपनीचे ठेकेदार म्हणून, गेली अनेक वर्ष काम करत आहेत. हे ठेकेदार महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना जुमानत नसल्याचे पहावयास मिळत असल्याचे चित्र आहे.

# अर्थसंकल्प उद्योगक्षेत्रासाठी आश्वासक धनंजय जामदार यांचे प्रतिपादन

**बारामती :** येत्या पाच वर्षात ऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीच्या माध्यमातून १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत करून राज्यातील औद्योगिक वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत कमी करण्याचे धोरण अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पात जाहीर केलेने राज्याच्या उद्योगक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या संपूर्ण देशात महाराष्ट्रात विजेचे दर सर्वाधिक असलेने ते कमी करण्याबाबत उद्योगक्षेत्रातून सातत्याने मागणी होत होती. आता अर्थसंकलपात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी वीज दर कमी कारणेबाबतच्या घोषणेचे उद्योगक्षेत्र स्वागत करत आहे, अशी प्रतिक्रिया बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी व्यक्त केली आहे. धनंजय जामदार पुढे म्हणाले अर्थसंकल्पात जाहीर केलेले औद्योगिक धोरण, निर्यात प्रोत्साहन धोरण, लॉजिस्टिक्स धोरण, ग्रोथ हब, स्टील हब, सामूहिक प्रोत्साहन योजना, बेंगलूरू - मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडोर आदी योजना उद्योगक्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. नवीन पिढीला काळानुरूप रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबईत इनोवेशन सिटी ची स्थापना करणे तसेच रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठातून दहा हजार महिलांना कौशल्य विकास व कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयांचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय राज्यातील सक्षम रोजगार निर्मितीसाठी महत्वाचा ठरणार असल्याचे धनंजय जामदार यांनी सांगितले.



# महिलांनी स्वतःवर प्रेम केले पाहिजे

**उरुळी कांचन :** "कुठल्याही वयात कला शिकता येते, महिलांनी प्रथम स्वतःवर प्रेम करायला शिकले पाहिजे, स्वतः आनंदी आणि उत्साही राहणे आणि समाजात मिसळणे हे गुण जोपासत महिलांनी आपली प्रगती केली पाहिजे." असे प्रतिपादन मनीषा गोखले यांनी केले. त्या कस्तुरबा मातृ मंडळ आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात अध्यक्षपदावरून बोलत होत्या. कस्तुरबा मातृ मंडळाच्या अध्यक्षा सुरेखा भन्साळी यांनी प्रास्ताविक केले. या वर्षीपासून कस्तुरबा मातृ मंडळाने "आदर्श युवती पुरस्कार" देण्यास सुरुवात केली. यावर्षीचा प्रथम पुरस्कार नयॉन सुरेश कांचन आणि डॉ. नुपूर सुरेश कांचन या मुलींच्या शिक्षणासाठी कार्य करीत असलेल्या युवतींना देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमास महात्मा गांधी सर्वोदय संघाचे उपाध्यक्ष केडी कांचन, उरुळी कांचन पतसंस्थेचे अध्यक्ष देविदास भन्साळी, अशोक सावंत, जेबी सराफ, शिवाजी कांचन, महादेव कांचन, संभाजी कांचन, सुरेश कांचन , सुशीला मेटे,जयश्री बेद्रे, संगीता भालके, आशा कांचन, राजश्री शितोळे, प्रिया बलदोटा, उज्वला लोखंडे, श्रीमती पुष्पाताई पदवाड, अनिता चौधरी रूपाली चौधरी यांच्यासह अनेक महिला आणि मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन मीनल फुलपगार आणि अंजली कुलकर्णी यांनी केले, तर आभार स्वाती चौधरी यांनी मानले.

# अतिक्रमण कारवाईला न्यायालयाकडून स्थगिती

**शिक्रापूर :** शिक्रापूर, ता. शिरूर येथील पुणे अहिल्यानगर महामार्ग लगतच्या अनेक व्यावसायिकांना अतिक्रमण बाबत कोणतेही नोटीस न देता सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगर विकास प्राधिकरण विभागाने कारवाई सुरु केली असताना व्यवसायिकांनी न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने सदर कारवाईला स्थगिती दिली आहे. शिक्रापूर येथील पुणे अहिल्यानगर रोडच्या कडेच्या हद्दीतील अतिक्रमण बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगर विकास प्राधिकरण पुणे यांनी संयुक्तपणे अतिक्रमण कारवाई सुरू केली होती. मात्र, याबाबत रस्त्यालगत असणारे गाळे मालक व टपऱ्याधारक यांना कुठलीही पूर्व सूचना देता कारवाई सुरु केल्याने, अतिक्रमण कारवाईला स्थानिक व्यावसायिकांनी हरकत घेतली. त्यानुसार पुणे सिव्हिल न्यायालयात याचिका दाखल केली असता, न्यायालयाने सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगर विकास प्राधिकरण यांना नोटीस बजावली. न्यायालयात चार वेळा सुनावणी ठेवण्यात आली होती, या चारही सुनावणी कामी सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगर विकास प्राधिकरण प्रशासन हे हजर राहिले नाहीत. ५ मार्च रोजी सुनावणी वेळी शिक्रापूर व्यावसायिक यांच्या वतीने ॲड, दिपक भोपे, श्रीमती तेजल आहेर व आशिष टाकळकर यांनी युक्तीवाद केला. न्यायाधीश यशदीप मेश्राम यांनी या कारवाईला स्थगिती आदेश दिला. सदर सुनावणी दरम्यान अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे माजी तालुका अध्यक्ष देवेंद्र सासवडे, संतोष चौरसिया, संतोष भुजबळ, सुरेश खुरपे, शाम जकाते, मंगेश जकाते, सुजित जकाते आदी उपस्थित होते.



# ऊस आंतरपीक हरभरा शेतीदीनाचे आयोजन

**पारगांव :** पारगांव वि.का.सहकारी सोसायटी सभागृह येथे ऊस आंतरपीक हरभरा शेतीदीन व ऊस खोडवा व्यवस्थापन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला. त्यावेळी आकाश टिळेकर यांनी शेतीदिन व खोडवा ऊस व्यवस्थापन बाबत उपस्थित शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या चर्चासत्रासाठी प्रमुख उपस्थिती कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक पोपटराव ताकवणे, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम ताकवणे, माजी उपसरपंच संभाजी (तात्या) ताकवणे, दशरथ बोत्रे, राजाराम ताकवणे, उद्धव ताकवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कृषि विभागातील कृषि पर्यवेक्षक राजू पवार, सहायक कृषि अधिकारी विशाल बारवकर यांचीही उपस्थित होती. या कार्यक्रमाचे आयोजन अजित फराटे यांनी केले होते.

# श्री मार्तंड देवस्थानच्या प्रसाद केंद्राचे उद्‌घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** श्री मार्तंड देवसंस्थानतर्फे भाविकांनी वाहिलेल्या भंडाऱ्यापासून भंडारा प्रसाद निर्मिती केंद्राचे सोमवारी उदघाटन करण्यात आले. सदरील भंडारा निर्मिती मशीन बालेवाडी येथे राहणारे श्री खंडोबा देवाचे भक्त विलास दशरथ बालवडकर यांच्याकडून देणगी स्वरूपात देण्यात आलेली आहे. सदरील भंडारा प्रसाद हा भाविक भक्तांना दर्शन झाल्यानंतर प्रसाद रुपी देण्यात येणार आहे.

भाविक भक्तांनी मंदिर मध्ये येतेवेळी भारतीय संस्कृतीचे पालन करणे हेतू भाविक भक्तांनी वस्त्रसंहितेचे पालन करावे यासाठी आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी ठिकठिकाणी वस्त्र संहितेचे सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. भाविक भक्तांनी यापुढे मंदिरात येतेवेळी भारतीय संस्कृतीप्रमाणे आपली वेशभूषा धारणा करावी, असे आवाहन विश्वस्त मंडळाकडून करण्यात आले आहे. विदेशी वेशभूषा असणाऱ्या भाविकांना मंदिरात येण्यास मज्जाव करण्यात येणार आहे



या दोन्हीही उपक्रमांचे उदघाटन सोमवारी मंदिर गडकोटामध्ये देवसंस्थांचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकाते, विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर, विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, विश्वस्त अनिल सौंदडे तसेच विशेष उपस्थिती मध्ये पंढरपूर देवसंस्थानच्या विश्वस्त ॲड. माधवीताई निगडे देवसंस्थानचे व्यवस्थापक आशिष बाठे यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन देवसंस्थानचे सेवेकरी वर्गाने केले.

# अनधिकृत अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यास सुरुवात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक कोंडीस सतत कारणीभूत ठरणाऱ्या उरुळीकांचन (ता. हवेली) येथील मुख्य तळवाडी चौक व एलाईट चौक तसेच सेवा रस्त्यावरील 'एनएचएआय ' हद्दीतील अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे जिल्हा प्रशासनाच्या पी एम आर डी ए, ग्रामपंचायत, एन एच ए आय व पोलीस यांच्या संयुक्त अतिक्रमण विरोधी पथकाने काढण्यास सुरुवात करून उरुळी कांचन मधील चौकांना मोकळा श्वास घेण्यास मदत केली आहे.

पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक कोंडीची खिंड म्हणून उरुळीकांचन येथील तळवाडी चौक ते एलाईट हॉटेल चौक प्रसिद्ध आहे. या ठिकाणी अरुंद रस्ता व अतिक्रमणांनी मुख्य रस्त्याचा भाग अनेक वर्षे कोंडला आहे. या महामार्गावर बांधकामे, पत्राशेड, टपऱ्या,गाळे काढून महामार्गालगत बांधकामे अनेक वर्षापासून केली गेली आहेत. व्यावसायिक बांधकामे थेट अगदी रस्त्यावर आल्याने अरुंद रस्त्यापायी वाहतुक समस्या सोडविणे अतिशय कठिण बाब झाली होती, अतिक्रमण विरोधी कारवाई पथकाने सोमवारी उरुळीकांचन हद्दीत चौधरी वस्तीपासून केलेल्या कारवाईने रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे. महामार्गावरून एनएचएआय हद्दीत येणाऱ्या मध्यभागापासून दोन्ही बाजूला १५ मीटर पर्यंत ही कारवाई केली आहे. तर उर्वरीत कारवाई महामार्ग कंट्रोल म्हणून 'पीएमआरडीए' आणखी ६ मीटर वर करणार आहे. ही कारवाई करताना काही स्थानिकांनी व व्यापाऱ्यांनी विरोध करायचा प्रयत्न केला, मात्र अतिक्रमण विरोधी पथकातील अधिकाऱ्यांनी आम्ही सामंजस्याची भूमिका घेऊन ही कारवाई करीत आहोत असे सांगितले, मात्र अडवणुकीची भूमिका ठेवली तर कायदा ती मोडून काढायला सक्षम आहे अशी भूमिका घेतली.

# शिरूर खरेदी विक्रीवर अशोक पवारांचे वर्चस्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** विधानसभेच्या पराभवानंतर माजी आमदार अशोक पवार यांनी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीच्या माध्यमातुन पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिध्द केले असून, पाच जागेवर झालेल्या निवडणुकीत पाचही जागेवर आपले उमेदवार निवडुन आणण्यात त्यांना यश आले आहे. त्यामुळे तालुक्यात त्यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे, असे मानले जात आहे.



शिरुर तालुका खरेदी विक्री संघाच्या झालेल्या निकडणुकीत १७ जागेपैकी बारा जागा बिनविरोध झाल्या होत्या, उर्वरीत पाच जागेसाठी दिनांक ९ रोजी मतदान झाले व नंतर लगेच मतमोजणी करण्यात आली. यात सोसायटी मतदार संघ अ वर्ग - २ मांडवगण फराटा गट यातुन बाळासाहेब अर्जुनराव नागवडे हे विजयी झाले. तर सोसायटी मतदार संघ अ वर्ग -३ वडगाव रासाई गटातुन सुरेशचंद्र मारुतराव ढवळे निवडुन आले. सोसायटी मतदार संघ अ वर्ग - ८ टाकळी हाजी यातुन पाच उमेदवार उभे होते. मात्र, तीन उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे महेंद्र सुरेश पाचर्णे व प्रमोद बाळासाहेब दंडवते यांच्यात लढत झाली. यात महेंद्र पाचर्णे हे विजयी झाले. वैयक्तिक मतदार संघ ब वर्ग यातुन दोन उमेदवार निवडुन द्यायचे होते. त्यातुन सर्जेराव बाबुराव दसगुडे यांनी विजय मिळवला.

५ जागेवर झालेल्या निवडणुकीत अशोक पवार यांचे उमेदवार विजयी झाल्याने, पुन्हा एकदा पवार किंग मेकर ठरले. सर्व विजयी उमेदवारांचा सत्कार अशोक पवार यांच्या कार्यालयात करण्यात आला. या वेळी विश्वास ढमढेरे, संजय देशमुख, मुझफ्फर कुरेशी, पोपटराव शेलार, सचिन कातोरे, पोपटराव दसगुडे, मंगेश खांडरे, सुशांत कुटे, राहील शेख, हाफीज बागवान, राजुद्दीन सय्यद यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# आंबेगाव पूर्वेतील विहिरींनी गाठला तळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील ओढे, नाले, पाझर तलाव, बंधारे कोरडे ठणठणीत पडले आहेत. त्यामुळे पाण्याची पातळी खालावली असून, विहिरींनी तळ गाठला आहे. विहिरींबरोबर वडगावपीर, लोणी, धामणी, मांदळेवाडी, पहाडधरा, शिरदाळे येथील सार्वजनिक पाण्याचे स्रोतही कोरडे ठणठणीत पडले आहेत.

यावर्षी तुलनेने या भागात पाऊस कमी पडल्यामुळे पाण्याचे दुर्भिक्ष फेब्रुवारी पासूनच जाणवायला लागले आहे. विहिरींची पाणी पातळी खोलवर गेल्याने विहिरी कोरड्या पडल्या असून, कृषी पंप बंद पडले आहेत. त्यामुळे शेतातील हिरवा चारा संपल्याने बागायत पट्ट्यात जाऊन चढ्या दराने हिरवा चारा आणून जनावरांना घालावा लागतो.

पाण्याची परिस्थिती अशीच राहिली, तर एप्रिल, मे मध्ये दुष्काळग्रस्त भागात चारा छावण्या सुरू कराव्या लागतील, असे वडगावपीरचे माजी सरपंच संजय पोखरकर व पहाडधऱ्याचे सरपंच मच्छिंद्र वाघ, शिरधाळयाचे माजी सरपंच मनोज तांबे व मयूर सरडे यांनी सांगितले.

> पाणीपुरवठा करणारी विहिर व शेतकऱ्यांच्या विहिरी या दोन्हींची पाणी पातळी खाली गेली असून विहिरी कोरड्या पडल्याने जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.
>
> **- संभाजी आदक**
> दुग्धव्यावसायिकक, मांदळेवाडी.

> चालू वर्षी पाऊस कमी झाल्याने ओढे, नाले, तलाव, बंधारे पूर्णक्षमतेने भरले नाहीत. त्यामुळे पाण्याचा साठी दिर्घ राहिला नाही त्यामुळे सध्याचा उन्हाळी हंगाम धोक्यात आहे.
>
> **- रमेश आदक,**
> शेतकरी वडगावपीर.



**लोणी (ता. आंबेगाव ) येथे पाण्याअभावी विहिरींनी फेब्रुवारी महिन्यातच तळ गाठला आहे.**

# सिद्धबेट परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** अजिंक्य डी वाय पाटील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग पॉलिटेक्निक चऱ्होली बुद्रुक राष्ट्रीय सेवा योजना तर्फे सिद्धबेट केळगाव परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. यावेळी सिद्धबेट संत लीलाभूमीत वृक्ष संवर्धन, पर्यावरण संवर्धनात वृक्ष संगोपनात वृक्षांना पाणी देण्यासह स्वच्छता करीत घंटागाडीत संकलित करण्यात आलेलाप्लास्टिकसह कचरा केळगाव ग्रामपंचायती कडे पुढील व्हिलर लावण्यास सुपूर्द करण्यात आला.

या स्वच्छता मोहिमेत पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष विभागातील विद्यार्थ्यांनी इंद्रायणी घाट परिसर स्वच्छता, सिद्धबेट परिसर वृक्ष संवर्धन आदी उपक्रम राबविण्यात आले. यावेळी अजिंक्य डी वाय पाटील पॉलिटेक्निकच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यां तर्फे आळंदी शहरातून प्रभात फेरी काढत वृक्ष संवर्धनाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

या प्रसंगी आळंदी जनहित फाऊंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, शशिकांत राजेजाधव, पसायदान गुरुकुलचे अध्यक्ष योगेश महाराज वाघ, रोहिदास कदम, तुषार नेटके, कैवल्य टोपे,नीलेश गायकवाड, केळगाव ग्रामपंचायत कर्मचारी वृंद यांनी प्रत्येक्ष सहभागी होत उपक्रमास मार्गदर्शन केले. आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, अजिंक्य डी वाय पाटील पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे समन्वयक डॉ नागेश शेळके यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. अजिंक्य डी वाय पाटील महाविद्यालयाच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ कमलजीत कौर, प्राचार्य डॉ फारुक सय्यद, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक दिलीप घुले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा भूषण बिरारी, प्रा रोहिणी हुलसुरे, प्रा स्वाती गांडगे, दीपक जेजुरकर व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वीते साठी परिश्रम घेतले.

### देवसंस्थानातर्फे सत्कार

● आळंदी देवस्थान चे वतीने उपव्यवस्थापक तुकाराम माने यांचे हस्ते सामाजिक बांधिलकीतून उपक्रम राबविल्या बद्दल आळंदी देवस्थान तर्फे महाविद्यालयाचा सत्कार करण्यात आला. पॉलिटेक्निक विभागातर्फे नाविन्यपूर्वक तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम आयोजित केल्या बद्दल संस्थेच्या कार्यकारी उपाध्यक्ष डॉ कमलजीत कौर यांनी विद्यार्थ्यांचे व संयोजकांसह शिक्षकांचे विशेष कौतुक केले. आळंदी देवस्थान चे वतीने उपव्यवस्थापक तुकाराम माने यांचे हस्ते उपस्थित टीमचा सत्कार करण्यात आला.

# करवाढीविरोधात नागरिक एकवटले

## अॅड दीपक थिगळे यांच्याकडून नगरपरिषदेच्या कारभाराची पोलखोल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** राजगुरुनगर नगरपरिषदेने अवाजवी करवाढ केली आहे. याच्या निषेधार्थ आणि ही जुजबी करवाढ तत्काळ मागे घ्यावी यासाठी अॅड दीपक थिगळे यांनी सोमवारी (दि १०) खेड पंचायत समिती आवारातील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्या लगत उपोषण आंदोलन सुरू केले आहे. पहिल्याच दिवशी या आंदोलनात अनेक नागरिकांनी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला.

भाजपचे पुणे जिल्हा अध्यक्ष शरद बुट्टे पाटील, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक राहुल तांबे पाटील, माजी सरपंच अविनाश कोहिनकर, संजय राऊंधळ, राजगुरुनगरचे सलग २५ वर्ष सरपंच राहिलेले शांताराम घुमटकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अनिलबाबा राक्षे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलासराव सांडभोर, माजी सरपंच प्रदीप कासवा, मारुती सातकर, मनसेचे जिल्हाध्यक्ष समीर थिगळे, एल बी तनपुरे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सागर पाटोळे,अमर टाटीया, नितीन ताठे, मिलिंद शिंदे, सोपान डुंबरे माणिक होरे, कैलास दुधाळे, जी र शिंदे, नगरसेवक शंकर राक्षे, नीलेश घुमटकर, मनोहर सांडभोर, राहुल आढारी, दीपक थिगळे, प्रशांत कर्नावट, राहुल पिंगळे, संतोष भांगे, मयुर हांडे, सुनील वाळुंज, नितीन शहा, राहुल कहाणे, कालिदास सातकर आदी मान्यवर व शहरातील नागरिक यावेळी उपस्थित होते. अनिलबाबा राक्षे, कैलासराव सांडभोर, प्रदीप कासवा यांनी निषेध व्यक्त करत आंदोलनाला पाठिंबा दिला.



"शहरात पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, कचरा व्यवस्थापन होत नाही, आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत, रस्ते खोदाईने नागरिक हैराण झाले आहेत, शासकीय निधीची लयलूट सुरू आहे अशा अनेक प्रश्न, समस्या आहेत. मात्र कोणत्याही प्रकारची सुविधा शहरात उपलब्ध नाही. असे असताना करवाढ करून नागरिकांचीही लूट केली जात आहे. ही करवाढ मागे घ्यावी यासाठी नगरविकास मंत्र्यांना निवेदन दिले. त्याची दखल घेत नाहीत. म्हणून आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. - **अॅड दीपक थिगळे**"

### प्रशासकीय राजवट

● **राजगुरुनगर नगरपरिषदेत प्रशासकिय राजवट आहे, म्हणुन वाट्टेल तसा निर्णय घेतला जातो. सध्याची १५ ते २० टक्के करवाढ जाचक आहे. नगरपरिषद नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या सेवा देत नाही. मग कर घेऊन पुन्हा करवाढ कशासाठी? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.**




## शिरूरमध्ये पोलिस अंमलदार महिलांचा सन्मान

**शिरूर :** जागतिक महिला दिनानिमित्त शिरुर पोलीस स्टेशन येथील महिला पोलीस यांनी शिरुर शहरातून बाईक रॅली काढून महिला सबलीकरणाचा संदेश दिला. जागतिक महिला दिनानिमित्त पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी पोलीस स्टेशन मधील सर्व महिला पोलिस अंमलदार यांना फेटे बांधून साडी भेट दिली. सर्व महिला पोलिस अंमलदार यांनी शिरूर शहरांमधून बाईक रॅली काढली व महिला सबलीकरनाचा संदेश देण्यात आला. यावेळी शिरूर वकील संघाच्या महिला उपाध्यक्षा अॅड.वर्षाराणी वडगावकर, अॅड्. सीमा काशीकर, अॅड. सुवर्णा वाघमारे, अॅड्. सरिता खेडकर, अॅड अमृता वा खारे, अॅड्. प्रणिता जोशी, अॅड्. प्रतिभा पठारे, अॅड्. शुभांगी गायकवाड,अॅड्. पल्लवी कांकरवाल,अॅड्. सोनाली अच्छा, आदी महिला वकील भगिनी उपस्थित होत्या. मातोश्री कला क्रिडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने शिरुर शहरातील राजमाता अकॅडमीच्या प्रा. अलका बेलोटे (बोरुडे ),अॅक्टिव्ह सोशल ग्रुपच्या प्रमुख कामिनी प्रकाश बाफना आयुर्वेदाचार्य डॉ. स्मिता बिपिन बोरा ,उद्योजिका व माजी सरपंच वर्षा फक्कड काळे यांना सन्मानचिन्ह व शाल देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभिजीत आंबेकर म्हणाले की व्यक्ती व समाजाच्या जडघडणीत महिलांचा वाटा मोठा असुन प्रत्येक क्षेत्रात महिलांची आघाडी आहे . प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्व व यशाचा ठसा महिलांनी उमटविलेल्या असल्याचे ते म्हणाले. स्वागत सतीश व्यवहारे यांनी केले, तर प्रास्ताविक नगरपालिकेच्या वतीने प्राची वाखारे यांनी केले, आभार चंद्रकांत अहिरे यांनी मानले.

# महामानवांबद्दल गरळ ओकणाऱ्यांचा निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** महामानवांबद्दल गरळ ओकणारे प्रशांत कोरटकर, राहुल सोलापुरकर यांचा राजगुरुनगर येथे सोमवारी (दि १०) विविध संस्था संघटनांच्या वतीने रॅली काढून जाहीर निषेध करण्यात आला.

महामानवांबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकर, राहुल सोलापुरकर यांचा निषेध करण्यासाठी राजमाता जिजाऊ प्रतिष्ठान, राजजी गुजर प्रतिष्ठान, स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, किसान महासभा यांच्यासह खेड तालुक्यातील सर्व शिवप्रेमी या निषेध रॅलीत सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड राजगुरूनगर ते खेड तहसिलदार कार्यालय या मार्गावर निषेध रॅली काढण्यात आली.

या रॅलीत राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अॅड सुनील बांगर, राजमाता जिजाऊ प्रतिष्ठानचे संघटक रज्जाकभाई शेख, स्वाभिमानी रिपब्लिकन महासभा राष्ट्रीय अध्यक्ष हरेश देखणे, राजजी गुजर प्रतिष्ठानचे जिल्हा अध्यक्ष हेमंत वीरकर, तालुका अध्यक्ष अनिल बारणे, पर्यावरण प्रतिष्ठानचे अध्यक्ष वामन बाजारे, पंचायत समितीचे माजी सदस्य बी के कदम, जाकीर शेख, संदेश पाचारणे, अलका जोगदंड, अशोक वंजारे, सोनू काळे, कैलास मुसळे, मारुती शिंदे, भूषण बारणे, स्वप्नील गायकवाड, यांच्यासह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, किसान महासभा आणि खेड तालुक्यातील सर्व शिवप्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.



### आंदोलकाच्या मागण्या

● आंदोलकांच्या वतीने राहुल सोलापुरकर यांची पुणे सांस्कृतिक मंडळावर झालेली निवड रद्द करावी, प्रशांत कोरटकर ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बंदोबस्तातुन फरार झाला, त्या पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, कोरटकरचा जामीन रद्द करून त्याला अटक करण्यात यावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

# ऊसतोडणी सुरू असताना आढळली बिबट्याची पिल्ले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** उसाची तोडणी करण्यात मजूर मग्न असताना अचानक बिबट्याची दोन पिल्ले व मादी दिसल्याने ऊस तोडणी मजुरांची एकच तारांबळ उडाली. घाबरल्याने सगळे उसाच्या प्लॉटमध्ये बाहेर पळाले. ही घटना दोन दिवसांपूर्वी बल्लाळवाडी (ता. जुन्नर ) येथील केशव नायकोडी यांच्या उसाच्या प्लॉटमध्ये सकाळी घडली.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, केशव नायकोडी यांचा बल्लाळवाडी या ठिकाणी एक एकर ऊस असून चार दिवसापासून या ठिकाणी उसाची तोडणी सुरू आहे. उसाची तोडणी निम्म्यापेक्षा अधिक झाल्यावर अचानकपणे उसाच्या शेतात दोन पिल्ले व बिबट्याची मादी दिसली. याबाबतची माहिती समस्त वन खात्याचे कर्मचारी व अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी ड्रोनच्या साह्याने उसाची तोडणी सुरू असलेल्या प्लॉटची ते आणणे केली असता त्यांना उसाच्या शेतामध्ये बिबट्याची मादी व दोन पिल्ले असल्याचे आढळून आले. त्यामुळे वन कर्मचाऱ्यांनी ऊस तोडणी मजुरांना दोन दिवस उसाची तोडणी थांबवण्यास सांगितले. मंगळवारी उसाची तोडणी करण्यासाठी मजूर प्लॉटमध्ये पुन्हा आल्यावर वन खात्याने ड्रोनच्या साह्याने बिबट्याची पाहणी केली असता, प्लॉटमध्ये बिबट्याची पिल्ले अथवा मादी आढळून आली नाही. परंतु ऊस तोडणी मजुरांनी ऊस तोडण्यास नकार दिला तोडलेल्या उसाच्या मुळ्या मात्र वन कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली बैलगाडीच्या माध्यमातून बाहेर काढला. दरम्यान आज (बुधवारी) सकाळी पुन्हा वनखात्याच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत उसाची तोडणी केली जाणार आहे.

तथापि तोडणी सुरू करण्यापूर्वी ड्रोनच्या साह्याने उर्वरित उसाच्या क्षेत्रामध्ये बिबट्या व पिल्ले आहेत का? हे पाहूनच ऊस तोडणी केली जाईल, असे वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण यांनी सांगितले. दरम्यान, उसाच्या शेतामध्ये बिबट्याची मादी व पिले आढळल्याने तीन दिवस तोडलेला ऊस माझ्या शेतात पडून राहिल्याने माझे नुकसान झाले असू न संबंधित कारखान्याने पर्यायी व्यवस्था करून तात्काळ उर्वरित ऊसाची तोडणी करावी अशी मागणी केशव नायकोडी यांनी केली आहे.



## राष्ट्रसंत भय्युजी महाराज यांचे कार्य दीपस्तंभासारखे

**इंदापूर :** परम पूज्य राष्ट्रसंत भय्युजी महाराज यांनी अध्यात्मिक कार्या बरोबरच समता, विश्वबंधुत्व आणि सदाचरण केंद्रबिंदू मानून महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांचे कार्य दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या कार्याचा वारसा संवर्धित करण्या साठी सर्वांनी कालबद्ध योगदान द्यावे असे आवाहन अजमेर शरीफ दर्गाह चे डॉ. पीर सय्यद इरफान मोईन उस्मानी यांनी केले. इंदापूर येथील श्री दत्त धार्मिक व पारमार्थिक ट्रस्ट आश्रमात भय्युजी महाराज यांच्या भक्त मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी डॉ. उस्मानी यांचा दिलीप वाघमारे तर इंदापूर आश्रमासाठी जागा दिलेले गोरख शिंदे यांचा डॉ. उस्मानी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी हरीश पाटील, हिंजवडीचे उद्योजक सूर्यकांत साखरे पाटील, राजेंद्र पवार, प्रदीप पवार, सुनील बनसुडे, तैय्यब शेख, सलीम बागवान, अंगद तावरे, डॉ. संतोष नगरे, सतीश कस्तुरे, दीपक चौधरी, सुभाष पानसरे तसेच शिष्य परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. स्वागत बसवेश्वर लंगोटे, अनिल परदेशी यांनी तर प्रास्ताविक व सूत्रसंचालन अरूण चव्हाण यांनी केले. आभार दिलीप वाघमारे यांनी मानले.

# आपत्कालीन ११२ क्रमांकावर खोटा कॉल, गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** आपत्कालीन सेवेसाठी पोलिसांच्या ११२ क्रमांकावर खोटे कॉल करुन पोलिसांनाच मोकार त्रास देणा-या कारखेल ( ता. बारामती ) येथील एकावर सुपे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. भिमा दशरथ भापकर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत सुपे पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, कारखेल (ता. बारामती) येथील भिमा दशरथ भापकर याने आपल्या मोबाईलवरुन काल (ता. ८) विनाकारण आपत्कालीन ११२ क्रमांकावर कॉल करुन स्वताच स्वताच्या बायकोला जिवे मारत आहे. असा वारंवार कॉल करत होता. यावेळी पोलिस स्टेशनमध्ये कॉल व कर्तव्यावर असलेले पोलिस कर्मचारी सागर वाघमोडे यांनी मदतीसाठी कारखेल येथील पोलिस पाटील सचिन जगताप यांच्यासमवेत भिमा भापकर यांच्या घरी जावून खात्री केली. यावेळी भिमा भापकर वारंवार आपत्कालीन ११२ व १०८ या क्रमांकावर खोटे कॉल करत असल्याची बाब समोर आली. यावेळी त्याची पत्नीने देखील मला कोणतीही मारहाण झालेली नसल्याचे स्पष्टीकरण दिले.

याबाबत कॉल करणारा व्यक्ती भिमा भापकर यालाही पोलिसांनी विचारणा केली असता, त्याने खोटा कॉल केल्याची कबूली दिली.

# आमलकी एकादशीदिनी भाविकांची अलोट गर्दी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आमलकी एकादशी दिनी माऊली मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांतुन मंदिरात एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. पन्नास हजारावर भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. एकादशी दिनी भाविकांनी मंदिर, नगरप्रदक्षिणा करीत हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटीने श्रींचे रूप लक्षवेधी दिसत होते. इंद्रायणी नदी घाटावर स्वच्छता आणि इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी महिला भाविकांची उपस्थिती मोठी होती.

आळंदी मंदिरात भाविकांनी परंपरेने एकादशी दिनी गर्दी करीत श्रींचे दर्शन घेतले. एकादशी दिनी श्रींचे मंदिरात पहाटे वेदमंत्र जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आला. यावेळी आळंदी देवस्थांनचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने, माऊली पोंदे, श्रींचे मानकरी, पुजारी, सेवक कर्मचारी आदि उपस्थित होते. भाविकांना श्रींचे मंदिर दर्शनास प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब यांचे नियंत्रणात कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शन देण्याची व्यवस्था उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक, कर्मचारी, सुरक्षा रक्षक यांचे सहकार्याने केली. मंदिरात दुपारचा फराळाचा महानैवेद्य, प्रवचन, कीर्तन, धुपारती, आरती झाली. श्रींचे दर्शन, प्रदक्षिणा पूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास गर्दी केली. आळंदी मंदिरात भाविकांनी धुपारतीस गर्दी केली. सप्ताहातील कीर्तन सेवा हरिनाम गजरात झाली.

आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर यांनी मार्गदर्शन केले. आळंदीत सुरक्षित, सुरळीत वाहतूक राहावी यासाठी आळंदी दिघी वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर यांनी परिश्रम पूर्वक काम पाहिले. आळंदीतील रहदारीची वर्दळ पाहता येथे वाहतुकीचे केलेले नियोजन यामुळे भाविक, नागरिक यांना वाहतुकीचे कोंडीतून एकादशी दिनी मुक्तता मिळाली.

### इंद्रायणीची आरती उत्साहात

● येथील इंद्रायणी आरती ग्रुप, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान, आळंदी जनहित फाउंडेशन, महिला बचत गट महासंघ, सदस्य, पदाधिकारी, महिला मंडळ, ग्रामस्थ यांचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर घाट स्वच्छता करीत इंद्रायणीची आरती हरिनाम गजरात झाली. एकादशी दिनी इंद्रायणी आरती करून नदी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. श्रींचा नामजयघोष उत्साहात करण्यात आला. इंद्रायणी नदी घाटावर आरती उपक्रमात सर्वांनी सहभागी होऊन इंद्रायणी नदीचे प्रदूषण दूर करण्यासाठी शासनाने तात्काळ कामकाज सुरु करण्याची गरज असल्याचे इंद्रायणी आरती ग्रुपचे वतीने संयोजक अर्जुन मेदनकर,अनिता झुजम यांनी आवाहन केले आहे.



श्रींचे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्पसजावट

## पुरंदर पंचायत समिती शिक्षण विभागाच्या गट शिक्षणाधिकारीपदी डुबल



**जेजुरी :** पंचायत समिती, पुरंदर शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी पदी नव्याने नियुक्त झालेले वैभव डुबल यांनी पदभार स्विकारल्यानंतर सोमवारी कामकाजाची माहिती घेऊन उत्कृष्ठ कामाबद्दल परिरक्षक, उपपरिरक्षक तसेच सर्व सहायक परिरक्षक यांचे कौतुक केले. याप्रसंगी पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष, पुणे जिल्हा काँग्रेस शिक्षक कमिटीचे अध्यक्ष रामप्रभू पेटकर यांच्या हस्ते वैभव डुबल यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला. यावेळी पंचायत समिती पुरंदरचे विस्ताराधिकारी संजना गोसावी, धनाजी नाझीरकर,विषय तज्ञ दिपक पाटील,राजमाने मॅडम,मेमाणे मॅडम,पुरंदर तालुका काँग्रेस शिक्षक सेलचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, गणेश पाठक, विजय पेटकर,धुळदेव पवार,धनराज माने,बालाजी ताकमोगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# तुकाईवाडी परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** पुणे नाशिक महामार्गाच्या दोन्ही बाजूने झालेली अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत. सोमवारी (दि. १०) राजगुरुनगर बाह्यवळण चौकात, तुकाईवाडी हद्दीत अतिक्रमण विरोधी पथकाने धडक कारवाई केली. तगड्या पोलिस बंदोबस्तात झालेल्या कारवाईत रस्त्यालगत नव्याने उभारण्यात आलेली पत्रा शेड, होर्डिंग जमीनदोस्त करण्यात आली. अनेक व्यावसायिकांचे यामुळे नुकसान झाले. काहींनी तर कर्ज घेऊन नुकतीच शेड, होर्डिंग उभारली होती. या कारवाईने त्यांचे आर्थिक कंबरडे मोडल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

पुणे नाशिक महामार्गावर राजगुरुनगर शहरात येणाऱ्या बाह्यवळण चौकात सकाळी ही कारवाई झाली. त्यात जवळपास १५ पत्रा शेड करण्यात आलेली हॉटेल, दुकाने यावर जेसीबी यंत्राच्या साहाय्याने कारवाई करण्यात आली.

पत्र्याची शेड उखडुन टाकण्यात आली. राजगुरुनगर कारवाई सुरू असताना वरच्या भांबुरवाडीचे सरपंच विजय थिगळे, तुकाईवाडीचे माजी सरपंच काकासाहेब कोरडे व ग्रामस्थ उपस्थित होते. कारवाईला सर्वांनी सहकार्य केले. मात्र, व्यावसायिकांचे अधिकचे नुकसान होऊ नये म्हणून साहित्य बाजुला करून देण्यासाठी वेळ घेतला. शेड पडल्यावर हॉटेल, दुकानांचे साहित्य भर उन्हात रस्त्यावर पडुन होते.

दरम्यान, महामार्गाच्या वाहतुकीला बाधा येणाऱ्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात येत आहे. तुकाई वाडी परिसरात अनेक पत्रा शेड, होर्डिंग उभारली होती. त्यांना आगाऊ सुचना देण्यात येऊन स्वतःहून अतिक्रमण काढण्याची संधी दिली होती . मोशी टोल नाका किंवा चिंबळी येथे कारवाईची सुरुवात झाली.पुढे पुढे कारवाई करण्यात येत आहे.

चार किलोमीटरवर कारवाई होत असताना आणि माहिती दिली असताना ज्यांनी प्रतिसाद दिला नाही अशा अतिक्रमण धारकांचे कारवाई मध्ये नुकसान झाले. त्याला प्रशासन जबाबदार नाही. असे येथे उपस्थित अधिकाऱ्याने नाव प्रसिध्द न करण्याच्या अटीवर सांगितले.

# बालांगण

## वाळवंटातील बर्फवृष्टी



सफर देशांची

आता उन्हाळा सुरू झाल्याने वातावरण तापते आहे. जगातील सर्वात उष्ण आणि कोरड्या ठिकाणांपैकी एक असणारे सहारा वाळवंट तुम्हाला माहिती आहेच. मात्र तिथे हिम वर्षाव झाल्याची एक अद्भुत आणि दुर्मीळ नैसर्गिक घटना तुम्हाला माहिती आहे का? १८ फेब्रुवारी १९७९ रोजी अल्जेरियातील ऐन सेफ्रा शहरात सहारा वाळवंटात ही पहिली बर्फवृष्टी झाली होती. स्वाभाविकच या अनपेक्षित घटनेनंतर शास्त्रज्ञ आणि स्थानिक लोक हादरून गेले होते. या दिवशी तिथे सुमारे ३० मिनिटे बर्फाचे वादळ झाले, तापमान उणे २ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. तथापि, बर्फ जास्त काळ टिकला नाही. त्यामुळेच तेव्हा कोणतेही अधिकृत छायाचित्रे काढता आली नाहीत.

मित्रांनो, सहारा वाळवंटाचे प्रवेशद्वार मानले जाणारे ऐन सेफ्रा शहर समुद्रसपाटीपासून तीन हजार फूट उंचीवर असून ते सर्व बाजूंनी ॲटलास पर्वतांनी वेढलेले आहे. भौगोलिक स्थानामुळे हे ठिकाण अत्यंत उष्णता आणि कोरडेपणासाठी ओळखले जाते. उन्हाळ्यात येथील तापमान ५८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते. अशा परिस्थितीत, हिमवर्षावाची घटना निसर्गाचा अद्भुत करिष्मा प्रतिबिंबित करते.

१९७९ नंतर ऐन सेफ्रा येथे पुन्हा अनेक वेळा बर्फवृष्टी झाली. २०१६, २०१७, २०१८, २०२१ आणि २०२२ मध्येही येथे बर्फ पडला होता. २००५ आणि २०१२ मध्ये हलक्या स्वरूपाची हिमवृष्टी झाली होती, परंतु २०१६ मध्ये पहिल्यांदाच या ऐतिहासिक घटनेचे फोटो काढण्यात आले. हे फोटो प्रसिद्ध छायाचित्रकार करीम टाटा यांनी काढले होते. याद्वारे त्यांनी या दुर्मीळ घटनेला अमर केले.

शास्त्रज्ञांच्या मते सहारा वाळवंटातील हिमवर्षावाची घटना हवामान बदलाचे लक्षण असू शकते. सहारा वाळवंट हजारो वर्षांत अनेक वेळा बदलले आहे. शास्त्रज्ञांच्या मते, पुढील १५ हजार वर्षांत हे वाळवंट पुन्हा हिरवेगार होऊ शकते. यामागील कारणे पृथ्वीच्या अक्षातील बदल आणि मान्सून वाऱ्यांच्या दिशेने होणारे बदल असू शकतात.

## वाघ बघायला जायचंय?



सफर देशांची

एवढा परीक्षांचा काळ संपला की तुम्ही मंडळी भटकंतीसाठी मोकळी होणार आहात. तेव्हा सुट्टीचे नियोजन करताना भारतातील व्याघ्रप्रकल्पांचा नक्की विचार करा कारण वाघाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात पाहण्याचा अनुभव अत्यंत रोमांचक आणि अनोखा असतो. आपल्या देशात वाघ पाहण्यासाठी काही प्रसिद्ध प्रकल्प आहेत. आज त्यातील काहींची माहिती घेऊ या.

✻ रणथंभोर राष्ट्रीय उद्यान, राजस्थान: रणथंभोर राष्ट्रीय उद्यान हे भारतातील सर्वात प्रसिद्ध व्याघ्र प्रकल्पांपैकी एक आहे. हे राजस्थानातील सवाई माधोपूर जिल्ह्यात असून ऐतिहासिक किल्ला आणि घनदाट जंगलांसाठी ओळखले जाते. येथे वाघ दिसण्याची शक्यता जास्त असते कारण येथील वाघ अनेकदा उघड्यावर फिरताना दिसतात. रणथंभोरमध्ये वाघांव्यतिरिक्त बिबटे, हरीण आणि अनेक प्रकारचे पक्षी देखील दिसतात.

✻ जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान, उत्तराखंड: जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान हे भारतातील सर्वात जुने राष्ट्रीय उद्यान असून ते उत्तराखंडच्या नैनिताल जिल्ह्यात आहे. हे उद्यान वाघ आणि हत्तींसाठी प्रसिद्ध आहे. कॉर्बेटमध्ये वाघ पाहण्यासाठी जीप सफारी आणि हत्ती सफारी उपलब्ध आहे. येथील नैसर्गिक सौंदर्य आणि वन्यजीवांची विविधता तुम्हाला मोहित करेल. कॉर्बेटमध्ये रामगंगा नदीच्या काठावर वाघ पाहण्याचा अनुभव खूप खास आहे.

✻ बांधवगड राष्ट्रीय उद्यान, मध्य प्रदेश: बांधवगड राष्ट्रीय उद्यान मध्य प्रदेशातील उमरिया जिल्ह्यात आहे. हे स्थळ वाघ पाहण्याच्या सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक मानले जाते. येथे वाघांची संख्या बरीच दाट असल्यामुळे ते दिसण्याची शक्यताही जास्त आहे. बांधवगडचा इतिहासही खूप मनोरंजक आहे, कारण प्राचीन काळी ते रेवा राज्याचे शिकारस्थान होते. येथील घनदाट जंगले आणि टेकड्या वाघांना पाहण्यासाठी एक उत्तम वातावरण निर्माण करतात.

## पॅसिफिक महासागरातला सॅमोआ




सफर देशांची

सॅमोआ हा पॅसिफिक महासागरातला एक देश आहे. १९६२ मध्ये हा भाग न्यूझीलंडपासून वेगळा झाला आणि स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. उपुलू आणि सावाई ही इथली प्रमुख बेटं असून नऊ बेटांनी हा भूभाग बनला आहे. 'इंडिपेंड्ट स्टेट ऑफ सॅमोआ' हे या देशाचं अधिकृत नाव. पण तो सॅमोआ म्हणूनच ओळखला जातो. हवाई बेटं आणि न्यूझीलंड यांच्या मध्यभागी हा देश आहे. सॅमोअन आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा. सॅमोआतल्या नऊ बेटांवर ज्वालामुखी आहेत. या देशाचा जास्तीत जास्त भूभाग सावाई आणि उपुलू बेटांवर आहे. ॲपिया ही या देशाची राजधानी आणि सॅमोआतलं एकमेव शहर.

पॅसिफिक महासागरातल्या रिंग्ज ऑफ फायर भागात हा देश आहे. या भागात भूकंप आणि ज्वालामुखीच्या उद्रेकाचं प्रमाण बरंच जास्त आहे. माउंट सिसिली हे सॅमोआतलं सर्वात उंच शिखर. सावाई हे सॅमोआतलं सर्वात मोठं बेट असून इथे ज्वालामुखीच्या उद्रेकाचं प्रमाण बरंच जास्त आहे. लालोमानू हा इथला प्रसिद्ध समुद्रकिनारा आहे. इथली पांढरी वाळू पर्यटकांचं लक्ष वेधून घेते. सावाई बेटांवरचा आफू आवू धबधबाही खूप सुंदर आहे. या देशात फिरण्यासारखी बरीच ठिकाणं आहेत. हा देश कृषी उत्पादनांची निर्यात करतो. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे इथली बरीच मोठी लोकसंख्या शेती करते. नारळ, केळी, कोको, कॉफी ही इथली प्रमुख पीकं आहेत. टाला हे इथलं चलन आहे. सॅमोआतले लोक खूप आनंदी आहेत.

## औषधांच्या रंगांमागील रहस्य



सफर देशांची

मुलांनो, कोणतेही औषध घेता तेव्हा ते वेगवेगळ्या रंगात असल्याचे तुमच्या लक्षात आले असेल. औषधाच्या गोळ्या वा कॅप्सूलला लाल, निळा, हिरवा, पिवळा असे विविध रंग असतात. पण ते फक्त दिखाव्यासाठी आहेत की त्यामागे काही वैज्ञानिक कारण आहे, हे जाणून घ्यायला हवे.

✻ एखादा रुग्ण एकाच वेळी अनेक औषधे घेतो तेव्हा वेगवेगळ्या रंगांच्या गोळ्या त्याला औषध ओळखण्यास मदत करतात. हे विशेषतः वृद्धांसाठी आणि कमी दृष्टी असलेल्यांसाठी उपयुक्त आहे.

✻ मेडिकल स्टोअरमध्ये काम करणारे डॉक्टर आणि फार्मासिस्ट देखील औषधांची लवकर ओळख पटवण्यासाठी त्यांच्या रंगांवर अवलंबून असतात. यामुळे चुकीची शक्यता कमी होते आणि योग्य औषध रुग्णापर्यंत पोहोचते.

✻ बऱ्याचदा कंपन्या औषधांचा रंग अशा प्रकारे निवडतात की त्याचा रुग्णाच्या मनावरही सकारात्मक परिणाम होतो. जसे की, निळ्या आणि हिरव्या गोळ्या सामान्यतः वेदनाशामक, चिंता कमी करणाऱ्या म्हणून वापरल्या जातात कारण हे रंग मनाला शांत करतात. दुसरीकडे लाल आणि नारिंगी गोळ्या ऊर्जा वाढवणाऱ्या किंवा जलद कृती करणाऱ्या औषधासाठी वापरल्या जातात. काळ्या आणि गडद तपकिरी गोळ्यांमध्ये लोह आणि जीवनसत्वाशी संबंधित औषधे असतात जी शरीरात पोषण वाढवण्याचे काम करतात.

✻ काही औषधे सूर्यप्रकाशात लवकर खराब होतात. म्हणूनच कंपन्या अशा औषधाचे सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण्यास मदत करणारे रंग निवडतात. गडद रंगाचा लेप औषधाची गुणवत्ता जास्त काळ टिकवून ठेवतो.

✻ काही औषधे खूप कडू असतात आणि रुग्णांना त्यांची चव अजिबात आवडत नाही. अशावेळी रंगीत लेप औषधाला आकर्षक बनवतेच त्याचबरोबर त्याची कडू चव देखील लपवते. ज्यामुळे रुग्णांना गोळी गिळणे सोपे होते.

✻ तुम्हा मुलांना औषध देणे हे एक कठीण काम असते. म्हणूनच कंपन्या चॉकलेट, स्ट्रॉबेरी आणि संत्र्याच्या चवीचे सिरप आणि रंगीबेरंगी चघळण्याच्या गोळ्या बनवतात जेणेकरून तुम्ही आनंदाने औषध घेता.

ठिपके जुळवा



## गिर्यारोहणाच्या जगात



कोण होणार?

मुलांनो, गिर्यारोहण म्हणजे माउंटेनिअरिंग. उंचच उंच डोंगर चढायला खूप मजा येते. माउंट एव्हरेस्टसारखं उंच शिखर अनेकजण सर करतात. याबद्दलच्या बातम्या वाचून आपण थक्क होतो. आपणही गिर्यारोहणाचा अनुभव घ्यावा, असं वाटून जातं. गिर्यारोहण वाटतं तितकं सोपं नाही. पण तुमच्या अंगात धाडस असेल तर या क्षेत्रात करीअरही करता येईल. माउंटेनिअरिंगमधल्या करीअरचं हे मार्गदर्शन...

माउंटेनिअरिंगसंबंधी काही अभ्यासक्रम असतात. बीएमसी म्हणजे बेसिक माउंटेनिअरिंग कोर्स. यात गिर्यारोहणाचे प्राथमिक धडे दिले जातात. दगडधोंडे, बर्फावर कसं चढायचं हे यात शिकवलं जातं. एएमसी म्हणजे ॲडव्हान्स माउंटेनिअरिंग कोर्स. यात गिर्यारोहणाच्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत शिकवलं जातं. एमओआय म्हणजे मेथड ऑफ इन्स्ट्रक्शन हा अभ्यासक्रम माउंटेनिअरिंग आणि त्याच्याशी संबंधित इतर क्रीडाप्रकारांचं प्रशिक्षण देण्यासाठी तुम्हाला तयार करतो. एसएआर म्हणजे सर्च अँड रेस्क्यू हा अभ्यासक्रम तुम्हाला गिर्यारोहणादरम्यान काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर त्यातून कसं बाहेर पडायचं याचे धडे देतो. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर क्लाइंबिंग गाइड, लायजन ऑफिसर, पोर्टर, ट्रेक लीडर, ट्रेक ऑर्गनायझर, स्पॉन्सर्ड माउंटेनिअर म्हणून काम करता येईल. केंद्र तसंच राज्यांच्या रेस्क्यू टिममध्ये सहभागी होता येईल.

## हवा शुद्ध करणारी रोपटी



महत्त्वाचं काही

सध्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. वायू प्रदूषणाचे धोके आपण जाणतोच. प्रदूषण कमी करण्यासाठी बरेच प्रयत्न होताना दिसतात. हवेच्या खालावलेल्या पातळीमुळे श्वसनाचे विकार जडू शकतात. हवा शुद्ध करण्यासाठी काहीजण घरात हवा शुद्धीकरण यंत्र म्हणजेच एअर प्युरिफायर बसवून घेतात. पण काही रोपटी हवा शुद्ध करण्याचं काम करतात. तुम्हीही घरात अशी काही रोपटी लावू शकता.

✻ तुळस ही एक औषधी वनस्पती आहे. यासोबतच तुळस वातावरण प्रदूषित करणारे वायू शोषून घेऊ शकते. तुळशीच्या वासामुळे आपल्याला प्रसन्न वाटतं.

✻ अनेक घरांमध्ये मनी प्लांट लावलं जातं. हे रोपटं भरभर वाढतं. समृद्धीचं प्रतीक म्हणून ते लावलं जातं. पण हे रोपटं हवाही शुद्ध करतं.

✻ आलं हवेतले कार्बन डाय ऑक्साइडसारखे घातक वायू आणि रसायनं शोषून घेतं. यासोबतच आल्यात घातक जीवाणू आणि विषाणूंचा नाश करण्याचे गुणधर्मही असतात.

✻ पीस लीली हे रोपटं हवा शुद्ध करण्यासोबतच घराचं सौंदर्यही वाढवतं. या रोपट्याच्या वाढीसाठी सूर्यप्रकाशाची गरज नसते. तसंच याला पाणीही खूप कमी लागतं.

मग मुलांनो, तुम्ही कोणतं रोपटं लावणार?

## का चमकतात डोळे?



जाणून घ्या

छोट्यांनो, अंधारात एखादं मांजर डोळ्यांसमोरून गेलं तर त्याचे चमकलेले डोळे आपलं लक्ष वेधून घेतात. प्राण्यांचे डोळे का चमकत असावेत, असा प्रश्न आपल्याला पडतो. प्राण्यांच्या डोळ्यांवर टॅपेटम ल्युसिडम नावाचा एक थर असतो. या थरामुळे प्राण्यांच्या डोळ्यांवर पडणारा प्रकाश परावर्तित होतो आणि त्यांचे डोळे चमकतात. यामुळे रहदारीच्या रस्त्यावर प्राण्यांना वाहनांची धडक बसत नाही. अंधारात समोरचं दिसत नाही. पण डोळे चमकल्याने प्राण्यांच्या अस्तित्त्वाची जाणीव होऊन आपण वाहन जपून चालवतो.

✻ आणखी एक गमतीशीर बाब, पृथ्वीवरील वातावरणाविषयी...

पृथ्वीवरचं वातावरण बदलत असतं. उन्हाळ्यानंतर पावसाळा, मग हिवाळा असं ऋतूचक्र बदलत रहातं. हे ऋतू बदलण्यामागचं कारण काय असावं? आपली पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे आपण जाणतो. पण अ पृथ्वी आपल्या अक्षांमध्ये २३ अंशांमध्ये झुकलेली असल्याकारणाने सूर्याभोवती फिरत असताना तिच्या काही भागांवर सूर्याची किरणं थेट पडतात तर काही भागांवर ती तिरकी पडतात. थेट सूर्यकिरणं पडलेल्या भागात उन्हाळा असतो तर तिरकी किरणं पडलेल्या भागात थंडी म्हणजे हिवाळा असतो.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

ओळखा पाहू

१) अल्फा केराटिन हे प्रथिन कोणत्या घटकात आढळतं?

२) सचिन तेंडूलकरने १०० वं आंतरराष्ट्रीय शतक कोणत्या संघाविरूद्ध केलं?

३) माय म्युझिक, माय लाईफ हे आत्मचरित्र कोणी लिहिलं आहे?

४) मधुबनी ही कोणत्या राज्यातली चित्रकला आहे?

५) कोणता प्राणी श्वासोच्छवासासाठी त्वचेचा वापर करतो?

६) गोबर गॅसमधला प्रमुख वायू कोणता?

७)नारिंगी क्रांती कोणत्या देशात झाली?

८) जैनांचे चोवीसावे तीर्थंकर कोण?


९) बंगालच्या उपसागरात भारताची किती बेटं वसली आहेत?

१०) दक्षिण भारताचं मँचेस्टर असं कोणत्या शहराला म्हणतात?

उत्तर: १) नखात २) बांग्लादेश ३) पंडित रविशंकर ४) बिहार ५) बेडूक ६) मिथेन ७) युक्रेन ८) महावीर ९) २०४ १०) कोइंबतूर

महत्त्वाचं काही

## नखे चावू नका



मित्रांनो, तुमच्यापैकी कोणाला नखे चावण्याची सवय आहे का? असेल तर लगेचच ती सोडा, कारण याचे दात आणि हिरड्यांवर बरेच दुष्परिणाम होतात. उदाहरणार्थ, नखे चावल्याने तुमच्या दातांच्या संरचनेला हानी पोहोचवू शकते. म्हणजेच या सवयीमुळे वाकडे दात किंवा सुजलेल्या हिरड्या यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याचबरोबर दातांच्या अन्य समस्याही उद्भवू शकतात. त्रासदायक बाब म्हणजे नखे चावल्याने बॅक्टेरिया तोंडात जाऊ शकतात. घातक जीवाणू शरीरात प्रवेश करून विविध प्रकारचे संसर्ग देऊ शकतात. यामुळे घशाचे संक्रमण, तोंडाचे आजार किंवा पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच कधीही नखे चावू नका.

महत्त्वाचं काही

## उन्हाळी त्रासापासून दूर राहा



उन्हाळ्याचे दिवस बरेच त्रासदायक असतात. त्यामुळे या ऋतूमध्ये तुम्हा मुलांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. उन्हाळ्यात शरीराला घाम येण्याने त्रस्त होण्याचे वा ऊन लागल्याने आजारी पडण्याचे प्रमाण वाढते. म्हणून वाढत्या उष्णतेपासून वाचण्यासाठी पुरेसे पाणी प्या. उन्हाळ्यात शरीरात पाण्याची कमतरता घातक ठरू शकते. या काळात थंड पदार्थ खाऊन शरीरात थंडावा राखा. घरातून बाहेर जाताना न विसरता टोपी, गॉगल्स आणि सनस्क्रीन लावूनच बाहेर पडावे. यामुळे सूर्याच्या कडक किरणांपासून बचाव होतो.

महत्त्वाचं काही

## परीक्षेच्या तयारीला लागा



मित्रांनो, आता परीक्षाचा काळ जवळ आला आहे. मोठ्या वर्गाच्या परीक्षा सुरूही झाल्या आहेत. या काळासाठी तुम्हीही सज्ज व्हा. हा काळ मानसिक ताण न घेता पार करायचा असेल तर प्रथम अभ्यासाचं वेळापत्रक तयार करा. प्रत्येक विषयासाठी निश्चित वेळ ठरवा आणि रोज तो पाळा. शाळेतील नोट्स आणि पाठ्यपुस्तकावरच लक्ष ठेवा. महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी जास्त वेळ राखून ठेवा. त्यात अभ्यासातील सर्व विषय समाविष्ट असावेत. त्यासाठी छोटे छोटे अभ्यास सेशन्स ठरवा. म्हणजे एकाच वेळी खूप शिकण्याचा ताण येणार नाही.

महत्त्वाचं काही

## सायबेरियन क्रेन



सायबेरियन क्रेन हा स्थलांतर करणारा पक्षी आहे. सायबेरियात प्रचंड थंडी पडल्यावर हे पक्षी भारतात येतात. सायबेरियन क्रेनची गणना दुर्मीळ प्रजातीच्या पक्ष्यांमध्ये होते. त्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. हे पक्षी नष्ट होतील की काय अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे त्यांच्या संरक्षणाचे उपाय केले जात आहेत.



"भारतासाठी खेळणे, हे लहापणापासून माझे एकच स्वप्न होते. मी कधीच आयपीएलबद्दल विचार केला नव्हता. आजकाल लोकं आयपीएलवर अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. ते एक उत्तम व्यासपीठ आहे, यात शंकाच नाही. पण, जर देशासाठी खेळणे, हेच तुमचे अंतिम ध्येय असेल तर बाकीच्या गोष्टी, जसे की आयपीएल आपोआप जुळून येतात. सकारात्मक मानसिकता ठेवल्यास यश मिळतेच. मी भारतासाठी खेळीन असा विश्वास नेहमीच बाळगला आणि देवाची कृपा म्हणून १८व्या वर्षी मला पदार्पणाची संधी मिळाली, याबद्दल मी कृतज्ञ आहे.
पूर्वी काही खेळाडू असे फटके खेळायचे. मी माही भाईचे काही जुने व्हिडिओ पाहिले आहेत. त्यांनी देखील लॅप शॉट खेळले आहेत. आता खेळ बदलत आहे. त्यामुळे खेळाडू नवीन फटक्यांना आत्मसात करत आहेत. काहींना असे फटके खेळणे गरजेचे वाटते, तर काहींना नाही.""
— रिषभ पंत, क्रिकेटपटू

# स्नूकर स्पर्धेत आरव, साद, शाहबाज, शिवम, प्रशांत यांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने व आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) यांच्या सहकार्याने आयोजित पीवायसी मोतीलाल ओसवाल खुल्या स्नूकर स्पर्धेत आरव संचेती, साद सय्यद, शाहबाज खान, शिवम अरोरा, प्रशांत पवार यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

पीवायसी हिंदू जिमखाना, आरसीबीसी आणि अमनोरा स्पोर्टस क्लब(द फर्न) या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत बाद फेरीत सध्याचा सब-ज्युनियर स्नूकर विजेता पुण्याच्या आरव संचेतीने शुभम रंधेचा 3-2(71-02, 39-53, 14-66, 58-22, 79-12) असा पराभव केला. साद सय्यद याने मजहर ताहेरभॉयचा 3-1(45-39, 65-30, 52-53, 73-14) असा पराभव केला. शाहबाज खान याने सौरभ जाधवचा 3-0(49-21, 77(60)-17, 55-09) असा एकतर्फी पराभव केला.

जागतिक सिक्स स्नूकर रेड स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या कमल चावलाने पियुश लिंबाडचे आव्हान 3-0(78(56)-00, 91-37, 89(60)-14) असे सहज मोडीत काढले. त्याने आपल्या खेळीत पहिल्या फ्रेममध्ये 56, तिसऱ्या फ्रेममध्ये 60गुणांचा ब्रेक नोंदवला. पुण्याच्या शिवम अरोरा याने आपल्या लौकिकाला साजेशी खेळी करत पुनित अशोकवर 3-0(79(62)-14, 75(46)-03, 100(77)-06) असा विजय मिळवला. शिवम याने अवघ्या २५ मिनिटांत सामना जिंकताना पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फ्रेममध्ये अनुक्रमे 62, 46, 77 गुणांचे ब्रेक नोंदवले. प्रशांत पवार याने सतीश कराडचा 3-0(61-12, 72-29, 68-46) असा तर, गौरव देशमुखने अमीर भाटेचा 3-0(86(45)-02, 77(47)-25, 71-15) असा पराभव केला.



१२ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धा

# रेयांश गुंडचा मानांकित खेळाडूवर विजय





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 12 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात बिगर मानांकित रेयांश गुंड याने आठव्या मानांकित इथन लाहोटीचा 7-6(5), 6-2 असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली.

एनसीएल टेनिस सेंटर आणि सीपीआर टेनिस कोर्ट, पाषाण येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉ मध्ये पहिल्या फेरीत मुलांच्या गटात अव्वल मानांकित हर्ष नागवानी याने आर्य पवारचा 6-4, 6-4 असा तर, तिसऱ्या मानांकित अहान जैनने अर्जुन बेंद्रेचा 6-1, 6-1 असा सहज पराभव केला. क्वालिफायर स्वराज भोसलेने अगस्त्य तापकीरचे आव्हान 6-0, 7-6(4) असे मोडीत काढले.पाचव्या मानांकित छत्तीसगडच्या अहान भट्टाचार्यने महाराष्ट्राच्या अभिमन्यू चव्हाणला 6-1, 6-1 असे पराभुत केले.

मुलींच्या गटात सातव्या मानांकित आदिरा भगत हीने समायरा ठाकूरवर 6-4, 6-4 असा विजय मिळवला. चौथ्या मानांकित सतेश्री नाईक हीने वल्लभा शिंदेचा 6-1, 6-0 असा पराभव केला.

अस्मिता हॉकी स्टेट लीग

# पुण्याचे जळगाव संघावर २० गोल



**पुणे :** मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर-पिंपरी येथे सुरू असलेल्या अस्मिता हॉकी स्टेट लीगमधील ज्युनियर कॅटेगरीमध्ये सोमवारी यजमान पुण्याने पहिल्या दिवशी मोठा विजय मिळवला. पुण्याने जळगाववर २०-० असा विजय मिळवला, हा आतापर्यंतचा स्पर्धेतील सर्वात मोठा विजय ठरला. पुण्याच्या एकतर्फी विजयात तनुश्री कदू हिने (१', १५', १९', ३६', ४२', ४९') सहा तर सानिका माने हिने (५', २२', २८', ३३', ४६') पाच गोल करताना मोठा वाटा उचलला.

दीक्षा शिंदेने (६', २५', ३४', ४८') हिने चार, सायमा तांबोळीने (५२', ५९') दोन तसेच गौरी कोलापे (३'), सुकन्या धावरे (४') आणि संजना खेतावतने (३७') प्रत्येकी एक गोल करताना त्यांनी चांगली साथ दिली. मध्यंतराला, पुण्याने १०-० अशी आघाडी घेतली आणि दुसऱ्या सत्रात त्यात तितकीच भर घातली. त्यापूर्वी, अ गटामध्ये, साताऱ्याने नागपूरवर एकतर्फी विजय मिळवला. वेदिका वाघमोरेने (१८', ५३', ५८') तीन आणि अनुराधा ठोंबरे (२२'), श्रुतिका भोसले (३३') आणि श्रुती भोसले (५२') यांनी पेनल्टी कॉर्नरवर गोल केल्याने सातारने नागपुरवर ६-० अशी मात केली.

सकाळच्या सत्रात, अ गटात परिणिता चव्हाण (१४', ३७') हिने कोल्हापूरला औरंगाबादवर २-० असा विजय मिळवून दिला. त्यानंतर मुंबई सिटीने रोशनी पटेल (5', 48') आणि अविष्का परब (42', 54') आणि तृषा गुंटुक (41') आणि माधवी म्हात्रे (49') यांच्या गोलच्या बळावर अहमदनगरला 6-1 असे हरवले. अहमदनगरकडून दीक्षा वाटणे (15') हिने एक गोल केला.

# जी पी सहस्रबुद्धे चषक कॅरम एकेरी स्पर्धा २० मार्च पासून

**पुणे :** एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संघातर्फे दरवर्षी जी पी सहस्रबुद्धे चषक एकेरी कॅरम स्पर्धा घेण्यात येतात. या वर्षीच्या हा कॅरम स्पर्धा २० मार्च ते २३ मार्च २५ ह्या कालावधीमध्ये एरंडवणे येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहामध्ये घेण्यात येणार आहेत. स्पर्धेमध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील ६० वर्षांवरील सर्व स्त्री पुरुष ज्येष्ठ नागरिक भाग घेऊ शकतील. प्रथम क्रमांक विजेत्यास रुपये तीन हजार व जी पी सहस्रबुद्धे चषक,द्वितीय क्रमांक विजेत्यास रुपये दोन हजार,तृतीय व चतुर्थ क्रमांक विजेत्यास रुपये एक हजार रुपये आणि क्रमांक पाच ते आठ खेळाडूंना रुपये पाचशे प्रत्येकी अशी पारितोषिके देण्यात येतील. अधिक माहिती व स्पर्धेत नाव नोंदणीसाठी शिरीष जोशी कॅरम स्पर्धा प्रमुख (9822843106),पंकज कुलकर्णी(9011072950),सतीश सहस्रबुद्धे (9028332736)यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन एरंडवणे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अजित गोखले यांनी केले आहे.

रॅकेट लीग २०२५ स्पर्धेत

# अय्यर- बदामीकर कोल्टसला विजेतेपद




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित आठव्या पीवायसी विनसिस रॅकेट लीग स्पर्धेत अंतिम फेरीत अय्यर- बदामीकर कोल्टस संघाने आपली विजयी मालिका कायम ठेवत रावेतकर मस्कीटर्स संघाचा 12-08 असा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या टेबल टेनिस, टेनिस व बॅडमिंटन कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीच्या लढतीत टेबल टेनिसमध्ये पराग चोपडा, नितीन कोनकर, देवेंद्र चितळे, संजीव आगाशे, जया पाटणकर, नितीन पेंडसे, आदित्य गांधी, पराग टेपण यांच्या विजयी कामगिरीच्या जोरावर रावेतकर मस्कीटर्स संघाने अय्यर बदामीकर कोल्ट्स संघाचा 4-3 असा पराभव करून एक गुणांची नाममात्र आघाडी घेतली. बॅडमिंटनमध्ये केदार नाडगोंडे, आर्य देवधर, विमल हंसराज, अमर श्रॉफ, कर्णा मेहता, ईशान भाले, रिआन करंदीकर, वरद चितळे, क्षितिज कोतवाल, ईशान पारेख यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर अय्यर- बदामीकर कोल्टस संघाने रावेतकर मस्कीटर्स संघाचा 5-2 असा पराभव करून दोन गुणांची आघाडी मिळवली. अखेरच्या टेनिस प्रकारात अय्यर- बदामीकर कोल्टस संघाने रावेतकर मस्कीटर्स संघाचा 4-2 असा पराभव करून विजेतेपद पटकावले. विजयी संघाकडून संजीव घोलप, साकेत गोडबोले, इशान भाले, यश शहा, कर्णा मेहता यांनी अफलातून कामगिरी केली.

'लायन्स् प्रौढ करंडक' (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धा

# रिस्क्राईब, रायगड वॉरीयर्स संघांनी उद्घाटनाचा दिवस गाजवला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित लायन शंतनु सिद्धा स्मृतीप्रित्यर्थ तिसऱ्या 'लायन्स् प्रौढ करंडक' (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धेत रिस्क्राईब आणि रायगड वॉरीयर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेचा उद्घाटनाचा दिवस गाजवला.

येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत मनोहर पाटील याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर रिस्क्राईब संघाने गार्गी एज्युकॉन संघाचा ७ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना गार्गी एज्युकॉनने १२१ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये तनिष्क ठक्कर याने ३७ धावांचे योगदान दिले. मनोहर पाटील याने १७ धावांमध्ये ५ गडी बाद करून गार्गी एज्युकॉन संघाचा डाव मर्यादित ठेवला. हे लक्ष्य रिस्क्राईब संघाने १७.४ षटकात व ३ गडी गमावून पूर्ण केले. नितीन कुचेकर याने ५४ धावांची तर, अरविंद चौहान याने ४७ धावांची खेळी करून संघाला विजयी सलामी दिली.

सिकंदर पाटील याने केलेल्या फलंदाजीच्या जोरावर रायगड वॉरीयर्सने एलिट क्रिकेट क्लब संघाचा ९ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना एलिट क्रिकेट क्लबने १३६ धावांचे लक्ष्य उभे केले. नवनाथ साठे (४६ धावा), विवेक लोंढे (२७ धावा) आणि नवनाथ पाटील (नाबाद २७ धावा) यांनी संघाच्या डावाला आकार दिला.

# लोकेश राहूलने नाकारली कर्णधारपदाची ऑफर



**पुणे :** इंडियन प्रीमिअर लीग २०२५ मध्ये नवीन कर्णधाराच्या नेतृत्वाखाली बरेच संघ खेळणार आहेत. रिषभ पंत लखनौ सुपर जायंट्सचा, श्रेयस अय्यर पंजाब किंग्सचा नवा कर्णधार असणार आहे. आयपीएल २०२५ मध्ये सहभागी १० पैकी ९ संघांनी त्यांचे कर्णधार जाहीर केले आहेत. रजत पाटीदार हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा नवा कर्णधार म्हणून या पर्वात मैदानावर दिसणार आहे. अशात आणखी एका भारतीय खेळाडूला मिळालेली कर्णधाराची ऑफर त्याने नाकारली आहे. दिल्ली कॅपिटल्सने अद्याप कर्णधार जाहीर केलेला नाही. ते अक्षर पटेल व लोकेश राहुल या दोन नावांमध्ये अडकले आहेत. पण, हाती आलेल्या वृत्तानुसार लोकेशने कर्णधारपदाची ऑफर नाकारली आहे आणि त्यामुळे अक्षर पटेलच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. अक्षरने चॅम्पियन्स ट्रॉफीतही दमदार कामगिरी करून त्याचं नाणं खणखणीत वाजवलं आहे.

दिल्लीने अक्षरला १६.५० कोटी रुपयांत कायम राखले होते, तर लोकेश राहुलला १४ कोटींमध्ये आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले होते. लोकेशने यापूर्वी पंजाब किंग्स व लखनौ सुपर जायंट्सने नेतृत्व खेले आहे. अक्षरने आयपीएल संघाचे पूर्णवेळ नेतृत्व केले नसले तरी, तो सय्यद मुश्ताक अली ट्वेंटी-२० ट्रॉफीत गुजरातचा कर्णधार होता. लोकेशने माघार घेतल्याने अक्षरचं नाव निश्चित झालं आहे. लोकेशने फलंदाज म्हणून हातभार लावणार असल्याचे फ्रँचायझीला कळवले आहे. 'अक्षर पटेल कर्णधार होण्याची शक्यता वाढली आहे.दिल्ली कॅपिटल्स फ्रँचायझीने सुरुवातीला लोकेश राहुलला कर्णधारपदासाठी विचारले होते, परंतु त्याने फलंदाजीवर लक्ष केंद्रीत करून संघासाठी हातभार लावण्याची इच्छा व्यक्त केली,'असे सूत्रांनी सांगितले. राहुलने ६४ आयपीएल सामन्यांत ३१ विजय आणि ३१ पराभवांसह संयुक्तरित्या आठव्या क्रमांकाचा सर्वात यशस्वी कर्णधार म्हणून ओळख मिळवली आहे

# रमणबाग फायटर्स संघाला विजेतेपद!!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** पुनित बालन ग्रुप तर्फे आयोजित पुण्यातील गणपती मंडळ, नवरात्र मंडळ, ढोल-ताशा पथकांच्या संघांचा समावेश असलेल्या चौथ्या 'फ्रेंडशिप करंडक' क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत प्रज्योत शिरोडकर याने फटकावलेल्या नाबाद ६० धावा आणि प्रसाद घारे (नाबाद ४२) यांच्या फलंदाजीच्या जोरावर रमणबाग फायटर्स संघाने रंगारी रॉयल्स् संघाचा १० गडी राखून सहज पराभव केला आणि स्पर्धेच्या विजेतेपदावर पहिल्यांदाच आपले नाव कोरले.


सहकारनगर येथील ल.रा. शिंदे हायस्कूल येथील मैदानावर झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यामध्ये पहिल्यांदा फलंदाजी करताना रंगारी रॉयल्स् संघाने १० षटकामध्ये १०३ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये स्पर्धेचा सर्वोत्कृष्ठ खेळाडू ठरलेला निलेश साळुंखे याने ३५ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांसह ६३ धावांची खेळी केली. त्याला विशाल मुधोळकर याने १६ धावा करून साथ दिली. हे लक्ष्य रमणबाग फायटर्स संघाने ७.२ षटकात व एकही फलंदाज न गमवता पूर्ण केले. सामन्याच्या दुसऱ्या डावामध्ये वर्चस्व गाजवताना रमणबाग संघाच्या प्रज्योत शिरोडकर याने २० चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ६० धावाची खेळी केली. प्रसाद घारे याने दुसऱ्या बाजुने नाबाद ४२ धावांची खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुनितदादा बालन, जान्हवी धारीवाल-बालन आणि अभिनेता आकाश ठोसर यांच्या हस्ते करण्यात आले.

दिक्षा यादव, सौरभ पाटीलची पदक हॅटट्रिक

# मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये महाराष्ट्राला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक पदकांची बाजी मारून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. महिलांच्या टेट्रार्थलॉनमध्ये दिक्षा यादवने वैयक्तिक व सांघिक गटात सुवर्णयशाला गवसणी घातली. मिश्र प्रकारातही दिक्षा यादव व सौरभ पाटीलने रूपेरी यश संपादून पदकांची हॅटट्रिक पूर्ण केली.

नुकत्याच संपलेल्या या स्पर्धेत मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये महिलांच्या टेट्रार्थलॉनमध्ये महाराष्ट्राची दीक्षा यादवने चमकदार कामगिरी केली. तिने 946 गुणांसह अव्वल स्थान पटकावले. तिची सहकारी मुग्धा वाव्हळ 921 गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिली. उत्तराखंडची भार्गवी रावत 916 गुणांसह कांस्यपदकाची मानकरी ठरली. सांघिक प्रकारात दीक्षा संदीप यादव, मुग्धा वाव्हळ आणि दिप्ती काळमेघने 2749 गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

# टेबल टेनिस मधील महिला गटात महाराष्ट्राला रौप्य



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उत्कंठापूर्ण लढतीत महाराष्ट्राला टेबल टेनिस मधील महिलांच्या सांघिक अंतिम सामन्यात पश्चिम बंगाल संघाकडून १-३ असा पराभव पत्करावा लागला त्यामुळे त्यांना ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

अटीतटीने झालेल्या या लढतीमधील पहिल्या सामन्यात महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिला सुतीर्था मुखर्जी हिच्याकडून ८-११, ११-६,१२-१४,११-२, ५-११ असा पराभव पत्करावा लागला. कर्णधार दिया चितळे हिन अहीका मुखर्जी हिच्यावर १२-१०, ११-६, ११-६ असा विजय मिळवित १-१ बरोबरीसह सामन्यातील उत्कंठा वाढविली.

डब्लू.एस.पी.एल.चा विजेता ठरला शिवनेरी स्ट्राईकर्स संघ;उपविजेता लोहगड लायन्स

# आय.पी.एल.च्या धर्तीवर वाघोलीत सोसायटी क्रिकेट स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** डब्लू.एस.पी.एल.अर्थात वाघोली सोसायटी प्रिमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा ही वाघोली सोसायट्यामधील खेळाडूंसाठी एक नवी पर्वणी ठरली असून यामुळे सोसायट्या मधील खेळाडूंसाठी एक नवी संधी स्पर्धेचे आयोजक सोमनाथ कटके,युवराज कटके यांच्यामुळे खरे तर मिळाली आहे. ही स्पर्धा वाघोलीतील नव्हे तर सर्वोत्कृष्ट आयोजन नियोजन असलेल्या आय.पी.एलच्या धर्तीवर वाघोली सोसायटी प्रिमियर लीग स्पर्धा नावारूपास येऊन स्पर्धेचे यशस्वी नियोजन केल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पिडीसिसी बँकेचे संचालक प्रदिप कंद यांनी केले.कंद म्हणाले,यातून दर्जेदार खेळाडू तयार होत असून या स्पर्धेतून वाघोलीतील सर्वच सोसायटीतील खेळाडू एकत्र येत आहे.

वाघोली-आव्हाळवाडी येथे राजगड स्पोर्ट अॅकॅडमीच्या ग्रीन ग्रास क्रिकेट ग्राउंडवर युवराज(भैया) कटके सोशल फाउंडेशन व वाघोली सोसायटी क्रिकेट कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्य आयोजक सोमनाथ कटके व युवराज कटके यांच्या नियोजन व नेतृत्वाखाली वाघोली सोसायटी प्रिमियर लीग अर्थात WSPL क्रिकेट महासंग्राम(पर्व ३) या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा विजेता अंकुर पोतदार,प्रतीक सिंग यांच्या मालकीचा शिवनेरी स्ट्राईकर्स संघ ठरला तर उपविजेता अनिल दातार,सुनील दातार यांच्या मालकीचा लोहगड लायन्स हा संघ ठरला आहे.

या डब्लू.एस.पी.एल.क्रिकेट स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा पिडीसिसी बँकेचे संचालक प्रदिप कंद,वाघेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी उपसरपंच राजेंद्र सातव पाटील,शासन नियुक्त स्वीकृत नगरसेवक शांताराम कटके,भाजप युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष गणेश कुटे,वाघोली पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक पंडित रजितवाड,ज्येष्ठ नेते दत्तात्रय कटके,स्पर्धेचे मुख्य आयोजक सोमनाथ कटके,युवराज कटके यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी चेअरमन सोमनाथ आव्हाळे,राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष प्रकाश जमधने,युवा सेनेचे राज्य उपाध्यक्ष विशाल सातव पाटील,राजगड क्रिकेट ग्राउंडचे मालक योगेश सातव,संदिप सातव,नवनाथ गाडूते,,ए. के.47 इव्हेंटचे मालक अशोक खांडेकर,स्पर्धेचे नियोजक प्रकाश लोले,पंडित डोंगरे,समालोचक प्रवीण कामटकर,समाधान अवचट, तुषार मेटे,आदी उपस्थित होते.

#रा